21 DEC TO 27 DEC 2020 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 19/12/2020 9:10 PM Page 1

CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : ५३ सोमवार दि. २१ डिसेंबर २०२० ते रविवार दि. २७ डिसेंबर २०२० पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## कर्जबाजारी शिक्षक पत्नीची हत्या करून फसला पवित्र शिक्षकी पेशालाच काळीमा लावून बसला!

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

पैशाची हाव खूप वाईट असते. त्यामुळे पैसा मिळवण्यासाठी माणूस शॉर्ट कट शोधतो. त्यासाठी कमी वेळेत आणि कोणतीही मेहनत न करता त्याला पैसा हवा असतो. शेअर मार्केटमध्ये गुंतवलेल्या पैशाचा चांगला परतावा मिळतो म्हणून सोलापूर येथील एका शिक्षकाने शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवायला सुरवात केली. पण शेअर मार्केट मधील गुंतवणूक हा एक प्रकारे जुगारच असतो. आली तर लाट नाहीतर भैय्याची खाट! असा प्रकार असतो. विकास हरवाळकर या शिक्षकाने लोकांकडून कर्ज कडून शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवले. पण त्यात त्याचे मोठे नुकसान झाले आणि तो कर्जबाजारी झाला. तीन कोटीच्या कर्जाचा डोंगर डोक्यावर चढतच त्याचे मानसिक स्वस्थ बिघडले आणि त्याला दारूचे व्यसन लागले त्याची पत्नीही शिक्षिका होती. पण पतीचे कर्ज आणि दारूचे व्यसन. यामुळे दोघांमध्ये भांडणे होऊ लागली आणि एकेदिवशी रागाच्या भरात विकासने त्याच्या पतीनीच्या डोक्यात वरवंटा घालून तिला ठार मारले आणि स्वतःही विष पिवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेने सोलापूर शहर हादरले आहे. कारण एका शिक्षकी पेशात काम करणाऱ्या दांपत्याच्या जीवनात हि शोकांतिका घडलीय.



दुर्दैवी अर्चना



आरोपी विकास

अक्कलकोट येथील मुळचा विकास हरवाळकर याने गेल्या सात आठ वर्षापूर्वी अर्चना हिच्याशी प्रेमविवाह केला होता. लग्नांनंतर ते दोघे ही सोलापूर जुळे येथील चंदननगर येथील नीता रेसिडेन्सीमध्ये प्लॅट घेऊन राहु लागले होते. या दोघांना ही ६ वर्षाचा वेंदात नावाचा मुलगा आहे. त्याचा संसार सुखा समाधानाने चालला होता. तो ही अक्कलकोट येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम करत होता. तर अर्चना ही जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होती. अलीकडे या दोघा नवरा बायकोचे दररोज भांडण होत होते. प्रेमविवाह झालेली जोडपी ही तशी शांत आणि संयमी असतात. कारण ते दोघे ही एका विचाराने आणि एक दिलाने एकत्र आलेले असतात. त्यांच्यात कधीच ताण तणास नसतो. ते दोघे ही कुठल्याही संकटाला सामोरे जाताना विचारानेच जात असतात. आणि त्यातून मार्ग काढत असतात. त्या दोघांचे आचार विचार आणि स्वभाव जुळालेला असल्याने त्या दोघांनी प्रेमविवाह केलेला असतो. परंतु विकास याचे मात्र या उलट स्वभाव झालेला होता. तो भांडणात पत्नी अर्चना हिला समजून घेत नव्हता.याला कारण ही तसेच होते. त्याला गेल्या काही वर्षापासून शेअर मार्केटमध्ये पैसे ... पान २ वर

## ओळखीचाच कुणीतरी घरामध्ये शिरला ब्युटीशियन महिलेचा गळा त्याने चिरला



मयत लक्ष्मीबाई



भिवंडी/अभिजित हिरे

अत्यंत संवेदनशील म्हणून ओळखले जाणारे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहर हे गुन्हेगारीचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. कारण युपी बिहार किंवा अन्य राज्यातून आलेले काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोकं इथे बस्तान बसवून आहेत. त्यामुळे कधीकाळी यंत्रमाग नागरी अशी ओळख असलेले भिवंडी शहर आता मात्र क्राईम सिटी म्हणून ओळखले जात आहे. याचा क्राईम सिटीमध्ये एका ब्युटीशियन महिलेची रहस्यमयरित्या गळा चिरून हत्या करण्यात आल्याने मोठी खळबळ माजली आहे. पोलीस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

शहरातील तीनबत्ती परिसरात असलेल्या हाफसनआळी परिसरात एका ३८ वर्षीय महिलेची धारदार शस्त्राने धारधार शस्त्राने सपासप निघृण हत्या केल्याची घटना शनिवारी सकाळी घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लक्ष्मीबाई भुरला (वय ३८) असे हत्या झालेल्या महिलेचे नाव असून सदर महिला ब्युटी पार्लरचा व्यवसाय करत असल्याची माहिती मिळत आहे. शनिवारी सकाळी सदर महिला राहत असलेल्या घरात एकटी असतांना एका अज्ञात मारेकरूने महिलेच्या शरीरावर ९ ते १० वार करत गळा चिरून या महिलेची हत्या केली आहे. मयत महिलेचा मुलगा रात्रपाळीचे काम आटपून सकाळी घरी आला असता घरचा दरवाजा लॉक असल्याने त्याने उघडून बघितले असता घरात रक्ताच्या थारोळ्यात... पान २ वर

## चारित्र्याच्या संशयाने मती गुंग झाली पत्नीला ठार मारून आत्महत्या केली

औसा/शिवाजी मोरे



मयत अनुराधा

दारूची नशा करी जीवनाची दुर्दशा असे म्हणतात ते काही खोटे नाही. कारण एकदाका माणसाला दारूचे व्यसन लागले कि त्याचे काम धंद्यावरून घर संसारावरून लक्ष उडते आणि मग दारूसाठी तो कुटुंबातील लोकांना त्रास देऊ लागतो. खास करून त्याचा सर्वाधिक त्रास त्याच्या पत्नीला होत असतो. महादेव पारधे याच्या बाबतीत सुद्धा असेच झाले. त्याला दारूचे भयंकर व्यसन होते, म्हणून त्याची पत्नी मुलांना घेऊन माहेरी गेली. मात्र महादेवसुद्धा तिच्या मागे आला आणि सासुरवाडीत राहू लागला. तिथे कामधंदा करू लागला. दारू पिणेही त्याने कमी केले, पण आता तो पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला आणि याचा संशयातून त्याने पत्नीला ठार मारून स्वतःही आत्महत्या केली. त्यामुळे महादेव आणि अनुराधाची ५ मुले अनाथ झाली आहेत.








आरोपी

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिचा बतई सारख्या तीक्ष्ण हत्याराने गळा चिरून निर्घृण हत्या करत आरोपी पतीने स्वतः हा गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना भादा पोलिस ठाणे हद्दीतील आशीव (ता.औसा) येथे घडली आहे. याप्रकरणी मयत विवाहीतेच्या वडीलांनी दिलेल्या फिर्यादिवरून पती विरोधात भादा पोलीसात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या बाबत आधिक माहीती अशी की, आरोपी महादेव प्रकाश पारधे (वय ४५) हा मुळचा उस्मानाबाद ... पान २ वर

## वाहिनीवरचा राग त्याने पुतण्यावर काढला निरागस बालकाला विहिरीत ढकलून मारला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



दुर्दैवी आयुष

सुडाने पेटलेला माणूस कुठल्या थरला जाईल याचा नेम नसतो, अशा वेळी कधी कधी माणसाला रक्ताच्या नात्याचा सुद्धा विसर पडतो आणि मग एखाद्या नात्यातल्याच माणसाचा सूड घेण्यासाठी त्याच्या मुलाबाळांचाही जीव घ्यायला माणूस मागे पुढे पाहत नाही. जळगाव जिल्ह्यातील वडगावमध्ये दीर आणि वाहिनी यांच्यात पैशावरून वाद होता. याच वादातून वाहिनीने दिराची चार चौघात इज्जत काढली होती. त्याचा राग मनात धरून दिराने वाहिनीच्या तीन वर्षांच्या मुलाला म्हणजेच आपल्या पुतण्याला विहिरीत ढकलून ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी चुलत्यास अटक केली आहे.



आरोपी निलेश

आयुष हा अवघा तिन वर्ष वयाचा बालक होता. आई वडीलांचा तो लाडका मुलगा होता. घरातील सर्व जण त्याचे खुप कोडकौतुक करत असत. मागास समाजात जन्मलेल्या आयुषचे आईवडील अशिक्षीत होते. त्यांना साधे रुपये - पैसे देखील मोजता येत नव्हते. जळगाव जिल्ह्याच्या भडगाव तालुक्यातील वडगाव (सतीचे) या लहानशा गावात आयुष आपल्या आईवडीलांसह रहात होता. आयुषचे वडील दिपक रामदास गायकवाड यांच्यासह त्यांचे एकुण आठ भाऊ आहेत. दिपक गायकवाड यांच्यासह त्यांच्या सात भावांचे घर जवळ जवळ आहेत. मात्र निलेश नावाचा भाऊ थोडा वेगळा आणि लांब रहात होता. तापट स्वभावाच्या निलेश यास लगेच राग येत असे.

आयुषची आई व त्याचा काका निलेश या दिर-भावजयमधे बचत गटाच्या पैशावरुन काहीतरी आर्थिक व्यवहार होता. या व्यवहारात आयुषच्या आईला दिर निलेशकडून पैसे घेणे होते. निलेश ते पैसे देण्यास टाळाटाळ करत असेल म्हणून आयुषची आई त्या ... पान २ वर

## लॉकडाऊनमुळे त्याचा रोजगार गेला पोटासाठी टीव्ही कलाकार ठकसेन झाला

मुंबई/राजेंद्र वेदांते



कोरोनाचा प्रकोप रोखण्यासाठी सरकारने जो लॉकडाऊन केला होता. त्यात अनेकांचे रोजगार गेले. लोकांवर उपाशी मारण्याची पाळी आली. त्यामुळे काहींनी आत्महत्या केल्या तर काहीचोर लुटारू बनले. मात्र टीव्ही सिरीयलमध्ये काम करणाऱ्या एका कलाकारावर लॉकडाऊनच्या काळात बेरोजगार होण्याची पाळी येताच तो चक्क तोतया पोलीस बनला कलाकार असल्याने त्याला अभिनयाची चांगलीच जान असल्याने आणि सावधान इंडिया सारख्या क्राईम सिरीयलमध्ये त्याने काम केलेले असल्याने वेगवेगळे गुन्हे कसे केले जातात, याची त्याला चांगलीच माहिती होती आणि त्याच्याच आधारे त्याने अनेकांना गंडा घातला. मात्र हा शतीर दिमाग कलाकार अखेर पोलिसांच्या जाळ्यात सापडला आणि त्यानंतर त्याच्या साथीदारांनाही अटक करण्यात आली.

पोलीस असल्याची बतावणी करत सामान्य नागरिकांना लुबाडणाऱ्या एका टीव्ही कलाकाराला मुंबई ... पान २ वर

## दुसऱ्या लग्नाचा प्लान भावोजीने केला मेव्हण्याच्या हातून जीवानिशी मेला



बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

बहिणीच्या अपघाती मृत्यू नंतर भावोजीने दुसरे लग्न करण्याचे ठरवल्यामुळे त्याने आपल्या बहिणीला घातपात करूनच मारले असावे असा संशय आलेल्या मेव्हण्याने कट रचून आपल्या भावजीचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.







बुलढाणा जिल्ह्यतील मोताळा या तालुक्याच्या ठिकाणी राजू शामराव मिरटकर हा तरुण पाटे वरवंटे तयार करण्याचे काम करत होता. पत्नी विमलबाई व तिन मुले अशी त्याच्या संसाराची दुनिया होती. मोताळा तालुक्यातील कोथळी हे त्याचे सासर होते. त्याच्या शालकाचे नाव सुनिल रामेश्वर गायकवाड असे होते. राजुचा शालक अर्थात त्याच्या पत्नीचा भाऊ सुनिल गायकवाड हा सध्या नांदुरा येथे रहात होता. सुनिल अधुनमधून त्याची बहिण विमलबाई व मेहुणा राजु मिरटकर यांना भेटण्यास मोताळा येथे येत असे. राजूच्या तिघा मुलांना मामा सुनिलचा लळा लागलेला होता. अशा प्रकारे राजूचे एकंदरीत सर्व काही व्यवस्थित सुरु होते. सर्व काही व्यवस्थीत सुरु असतांना अचानक राजूच्या जिवनात ... पान ६ वर

## दारूच्या नशेत दोस्ती यारी विसरून गेले पत्नीबद्दल बोलताच मित्रालाच ठार केले

नेरळ/क्राईम रिपोर्टर



मयत सुशील

दारूच्या नशेत असलेल्या माणसाला कशाचेही भान नसते. अशा वेळेस तो नशेत काहीही बोलून जातो. पण कधी कधी दारूच्या नशेत त्याच्या तोंडून निघालेलं वाक्य त्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरू शकते आणि जेंव्हा मित्र मंडळी दारूच्या पार्टीत एकत्र येतात, तेंव्हा दारूची नशा जास्त झाल्यावर ते एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काडतात. त्यातून शिवीगाळ आणि हाणामारी सुद्धा होते. नेरळमध्ये तीन मित्र एकत्र बसून दारू प्यायले. मात्र एकाने दारूच्या नशेत दुसऱ्याच्या बायकोच्या चारित्र्यावर संशय घेताच दोन मित्राने त्याची हत्या करून त्याच्या मृतदेहाचे तुकडे करून सुटकेसमध्ये भरून गटारात टाकले. पण अवघ्या २४ तासात पोलिसांनी त्यांना अटक केली.

एका खासगी बँकेत रिलेशनशिप मॅनेजर म्हणून काम करणाऱ्या ३१ वर्षीय सुशीलकुमार सरनाईक यांची निर्घृण हत्या करण्यात आली. सुशीलकुमार सरनाईक याचा मृतदेह नेरळमध्ये ... पान २ वर

## शुल्लक वाद विकोपाला गेला शेजाऱ्याच्या हातून बजरंग मेला




सातारा/क्राईम रिपोर्टर

शेजाऱ्यांमधील भांडणे हि काही नवी नाहीत. कुठल्याना कुठल्या कारणावरून शेजाऱ्यांमध्ये भांडणे होताच असतात. खास करून लहान मुलांवरून हि भांडणे अधिक होतात. अशावेळी दोघांनीही समजूतदारपणा दाखवल्यास हे वाद मिटू शकतात. पण काही लोक शुल्लक भांडणावरून मनात अशी काही खुन्नस ठेवतात कि त्या खुन्नस पायी ते एखाद्याचा जीव घ्यायला सुद्धा मागेपुढे पाहत नाहीत. सातारा येथे राहणाऱ्या बल्लाळ आणि गावडे कुटुंबात असाच वाद होता. त्यातच चिकनचे खरकटे पाणी फेकण्यावरून भांडण झाले होते आणि हाणामारी सुद्धा झाली. बल्लाळ हा भाड्याच्या खोलीत राहत होता, तर गावडे याचे स्वतःचे घर होते. मात्र गावडे बरोबरच्या भांडणामुळे बल्लाळ याला भाड्याचे घर खाली करावे लागले होते आणि हाच राग मनात धरून बल्लाळ याने गावडेची हत्या केली. मात्र पोलिसांनी अवघ्या दोन तासात बल्लाळ याला अटक केली. ...पान ६ वर

## महिलांच्या विनयभंगाची लागली होती चटक स्त्री लंपट लांडग्याला ९ वर्षांनी झाली अटक




मुंबई/राजेंद्र वेदांते

सुंदर महिलांचे आकर्षण असलेलेला माणूस एखाद्या लांडग्या सारखा असतो आणि सतत आपली शिकार शोधात असतो. गेल्या ९ वर्षात तब्बल ५० महिलांचा विनयभंग करणारा एक नराधम पोलिसांना सतत गुंगारा देत महिलांचे विनयभंग करीत फिरत होता. त्यामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण होते, तर त्या नराधमाचा मात्र आत्मविश्वास वाढला होता. मात्र त्याह्या याच फाजील आत्मविश्वासामुळे त्याने रस्त्यात एका महिलेचा विनयभंग करून नंतर तिच्या घरात घुसला दिंडोशी पोलिसांनी या गुन्ह्याची गंभीर दाखल घेऊन अखेर त्याला शिधून काढले असता त्याने गेल्या ९ वर्षात ५० पेक्षा अधिक महिलांचा विनयभंग केल्याचे उघडकीस आलेय. ... पान २ वर

## विवाहित महिलेवर दोघांचे जीव जडले मित्रानेच मित्राला यमसंदानी धाडले

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

दोन मित्रांच्या मैत्रीच्या मध्ये जेंव्हा एखादी सुंदर महिला येते आणि तिच्याविषयी जेंव्हा दोघांच्याही मनात सारखेच आकर्षण निर्माण होते, तेंव्हा तिच्यावरून दोघांच्या मैत्रीत मिठाचा खडा पडतो. यापूर्वीही एका बाईमुळे दोन मित्र एकमेकांचे शत्रू बनून एकमेकांच्या जीवावर उठल्याच्या घटना घडल्या आहेत. अमळनेर मधील सचिन पंडित या तरुणाचे गावातल्याच एका विवाहीतेशी अनैतिक संबंध होते. मात्र एकदा सचिनचा मित्र गणेश याने दोघांना रंगेहात पकडले. त्यामुळे आता गणेशला सुद्धा तिचा उपभोग हवा होता. पण सचिन मात्र त्याला तसे करायला देत नव्हता. त्यामुळे दोन मित्रांमध्ये वाद सुरु झाले आणि याचा वादातून गणेश सचिनला ब्लॅकमेल करीत होता. त्यामुळे या ब्लॅकमेलिंगला कंटाळून सचिनने गणेशची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सचिन व त्याच्या साथीदाराला अटक केली आहे.



अमळनेर येथील गणेश मिसाळ आणि सचिन पंडित हे दोघे जवळचे मित्र होते. त्यातूनच त्या दोघांचे उठणे बसणे चालू असायचे दोघे ही फिरायला, दारूच्या पार्टीला एकत्र असायचे. ते दोघे ही जीवश्य कठंश्य मित्र असल्याने त्या दोघांना ही एकमेकाच्या नाड्या माहित होत्या. दोघांचे पान एकमेकाशिवाय हलत नव्हते. त्यातच सचिन याचे गेल्या काही वर्षापासून वनिता (काल्पनिक नांव) या ... पान ६ वर

CMYK

पान १ वरून....

## कर्जबाजारी शिक्षक पत्नीची हत्या...

गुंतविण्याचा नाद लागलेला होता. सुरूवातीला त्याला या मार्केटमधून चांगला परतावा आणि फायदा ही मिळू लागला होता. म्हणून तो परत परत यामध्ये आपली रक्कम गुंतवत होता.परंतु शेअर मार्केट मध्ये एखादी व्यक्ती मालामाल ही होते. आणि काही दिवसानंतर ती कंगाल सुध्दा होते.हा एक सट्टा बाजारच असतो. शेअरमार्केट मधील चढ उतारामुळे अनेकजण रस्त्यावर ही आलेले आहेत. तिच अवस्था विकास याची झालेली होती.दिवसे दिवस तो यातून कर्जबाजारी होत चालला होता. शेअर मार्केटमधील या सट्टा बाजारामुळे त्याचे जवळपास २ कोटी ८० लाख रूपयांचे नुकसान झालेले होती. एवढी मोठी रक्कम त्याने मित्राकडून तेसच शाळेतील सहकारी शिक्षकाकडून उचललेली होती. प्रत्येक शिक्षकाकडून त्याने लाख दीड लाख रूपयांची उसनवारी केलेली होती. त्याचे शिक्षक मित्र ही तो व त्याची पत्नी शिक्षिका असल्याने त्याला त्यांनी ती रक्कम दिलेली होती. आता विकास हरवाळकर हा कर्जाच्या जंजाळ्यात अडकत चालला आहे याची कल्पना त्याला उसने रक्कम दिलेल्या मित्रांना व शिक्षिकांना आलेली होती.म्हणून ते आपली रक्कम त्याच्याकडे परत मागत होते. तो कर्जात अडकला असल्याने त्याचे पैसे परत देवू शकत नव्हता. जवळपास ४६ शिक्षक मित्राकडून त्याने प्रत्येकी लाख दीड लाख रूपये त्यांना चांगला परतावा देण्याचे अमिष दाखवून घेतले होते.शिवाय तो आपल्या मित्रांचा ग्रुप तयार करून एक भिशी ही चालवत होता.अलिकडे त्याने बॅकेकडून ही मोठया प्रमाणात कर्ज घेतले होते.

यातूनच तो अंदरबट्टयात आलेला होता. त्याने उसनवार केलेली रक्कम ही जवळपास ३ कोटीच्या घरात जात होती.आता त्याला लोकांच्याकडून घेतलेली रक्कम परत देणे शक्य होत नव्हते. त्यामुळे तो कायम टेन्शनमध्ये राहत होता.यातूनच त्याचे पत्नी अर्चना सोबत सतत भांडण होत होते.तो तिला कर्ज काढून दे मागे लागला होता. या अगोदर देखिल तिने नवऱ्याला यातून बाहेर पडण्यासाठी मदत केली होती.पण तो काही यातून बाहेर पडला नव्हता. उलट तो शेअर मार्केटमध्ये जास्तच अडकत चालला होता. त्याचा पाय कर्जाच्या गाळात रूतत चालला होता. अर्चना ही त्याला किती मदत करणार होती? तिने त्याला यातून बाहेर पडण्याची विंनती करून काही तरी मार्ग काढू या असे सांगितले होते. परंतु त्याला पैसे देणाऱ्याचा ससेमीरा इतके वाढला होता. की त्याच्या पैसे मागण्याच्या तगाद्याने तो वैतागलेला होता. हल्ली तो दारू पिऊन घरी येवू लागला होता. शाळेत ज्ञानदानाचे काम करत असताना त्याचा पाय चुकीच्या वाटेवर पडला होता. त्याच्याकडे सर्व काही होते. सोन्या सारखी चांगली नोकरी होती.

पत्नी ही सुंदर सुशिल आणि नोकरी करणारी होती. संसारवेलीवर एका मुलाचा जन्म ही झालेला होता. सगळे काही व्यवस्थीत चालू असताना त्याला शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवण्याचा सल्ला त्याच्याच एका नातेवाईकाने दिलेला होता. त्याच्यावर विश्वास ठेवून त्याने शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवयाला सुरूवात केली होती. त्याचा थोडाफार फायदा त्याला होत होता. गुंतवलेल्या पैशाचा परतावा चांगला मिळू लागल्याने त्याला आधिकाधिक पैसे मिळवण्याचा नाद लागला, त्यासाठी तो इतर ठिकाणाहुन पैसे कर्जाऊ स्वरूपात घेऊ लागला होता. त्यांना ही तो चांगल्या परताव्याची गॅरेंटी देत होता. यातूनच त्याचे कर्ज वाढत चालले होते. येथेच त्याची फसगत झाली होती. कर्जातून बाहेर पडण्याचा त्याला काहीच मार्ग दिसत नव्हता.एवढी मोठी रक्कम ही लगेच परत देणे त्याला शक्य होत नव्हते. तो पत्नी अर्चनाला आणखीन कर्ज काढूया असे सांगत होता. पण ती त्याला तयार होत नव्हती.यातूनच त्या दोघात वाद आणि भांडण होत होते. तो आता जीवनाला वैतागलेला होता. काही करून यातून आपण बाहेर पडू शकत नाही म्हणून त्याच्या डोक्यात आत्महत्येचा विचार येत होता. त्याला एकप्रकारे नैराश्यनेच ग्रासलेले होते. घरात सारखी नवरा बायकोची भांडणे ही होत होती.

सोमवार दि.१४ डिसेंबर २०२० रोजी पहाटेच्या ५ ते ६ च्या सुमारास ती आपले सगळे आवरून शाळेत जायला निघाली होती. मुलगा वेंदात हा दुसऱ्या रुममध्ये झोपला होता. त्याच्या आदल्या रात्री ही त्याने याच कारणातून तिच्याशी भांडण काढले होते. याचा राग तिला ही आलेला होता. त्यानंतर पहाटे उठून त्याने परत त्याच विषयाला हात घातल्याने तिच्या रागाचा पारा चढला होता. त्या भांडणात ती त्याला म्हणाली. काय म्हणून मी तुमच्यावर प्रेम केले आणि तुमच्याशी प्रेमविवाह केला. यातच माझी फसगत झाली. तुम्ही स्वत: कर्जबाजारी झालात. आणि मला देखील कर्जात नेलात अशी ती बडबडत होती. तो सुरूवातीला शांत होता. तिला शाळेत जायला उशिरा होत असल्याने ती आपले सगळे आवरत होती. पण तो तिला मला यातून बाहेर काढ.मला तुझ्या नावावर आणखीन कर्ज मिळवून दे. म्हणून सांगत होता.पण ती त्याचे काहीच एक ऐकायला तयार नव्हती. मुळात ती त्याच्याकडे लक्षच देत नव्हती. याचा राग त्याला आलेला होता. त्याचा संयम सुटत चालला होता. पत्नी ही अडचणीच्या काळात साथ देत नाही म्हणून तो निराश झालेला होता.त्या भांडणात त्याने मागचा पुढचा विचार न करता पत्नी अर्चनाच्या डोक्यात ती बेसावध असताना घरातील वरंवटा घेतला आणि तिच्या डोक्यात जोरात हाणला होता. यासरशी तिच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने ती जागीच कोसळली होती. आणि मोठयाने ओरडली होती. तिच्या ओरडण्याचा आवाज ऐकून त्या रेसिडेन्सिमधील शेजारचे लोक धावून आले होते. पण त्यापूर्वीच विकास याने पत्नी अर्चना हिला रक्ताच्या थारोळ्यात पडलेली बघून आता आपल्या ही जीवनात काही नाही असे समजून घरातील विषारी द्रव्याची बाटली घेऊन त्यातील विष पिले होते. पण त्याचा अंमल लवकर होत नव्हता म्हणून त्याने घरातच गळफास लावून घेण्याचा प्रयत्न चालविला होता.

बाहेरून शेजारी ओरडत होते. या सगळ्या गोंधळात एका अज्ञात व्यक्तीने या घटनेची माहिती लगेच विजापूर नाका पोलीसांना दिली होती. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने पाच मिनिटात त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन फाशी घेत असलेल्या विकास याला खाली उतरवून घेऊन बाजुला केले होते. त्याच्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला होता. घरात रक्ताचा सडा पडला होता. पोलीसांनी विकास याला तातडीने उपचारासाठी सरकारी रुग्णालयात दाखल केले.तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याचा जीव वाचला होता. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून अर्चना हरवाळकर हिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला होता. विकास याला उपचारानंतर पोलीसांनी ताब्यात घेतले होते.त्याच्याकडे या घटनेची माहिती पोलीसांनी घेतली असता.त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.पोलीसांनी त्याला अटक करून पत्नी अर्चना विकास हरवाळकर (वय ३४) हिच्या खुन प्रकरणी व आत्महत्येचा प्रयत्न केला म्हणुन विजापूर पोलीस स्टेशनमध्ये विकास विश्वनाथ हरवाळकर (वय ३७) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ आणि इतर कलमा अन्वये गुन्हा दाखल केला. त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.

पोलीस कोठडी दरम्यान त्याच्याकडून माहिती घेत असताना गुन्हयात वापरलेला वरवंटा ही जप्त करण्यात आला होता. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त बापू बांगर, डॉ.वैशाली कडूकर, जेल रोड पोलीस ठाण्याचे व सध्या विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत याच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा पुढील तपास विजापूर नाका पोलीस करत आहेत. अभासी दुनियेत जगत असताना वास्तव दुनियेला विसरून चालत नाही. स्वप्नांचे इमले तयार करताना त्यासाठी लागणारा पैसा हा शॉर्टकटने मिळत नसतो. एक चुकीचे पाऊल माणसाला चुकीच्या मार्गाला घेऊन जात असते. आणि त्यातच त्याची दिशा चुकत असते. चांगल्या माणसांची दिशा बदलली की त्याची दशा ही बदलते. म्हणूनच चुकीच्या मार्गाने न जाता सरळ मार्गाने गेले तर चांगले होते. परंतु ही गोष्ट समजणाऱ्याला आहे. शेअर मार्केटमधून पैसा मिळाला असता तर अनेकजणांची जीवनाची झडी विस्कटली नसती.या फिल्डमध्ये खरे तर टोप्या घालणारेच जास्त असतात. सट्टा बाजाराचा किंग अर्थात बिग बुल हर्षद मेहता हा पळून गेला नसता हे समजण्यासारखे आहे. हिच गोष्ट विकास हरवाळकर याला समजून आली नाही तो दिवसे दिवस कर्जाच्या बोजात अडकत गेला.आणि त्यातून त्याला नैराश्यने गाठले आणि त्याच्या हातून पत्नीचा खून झाला हेच या घटनेवरून दिसून येते.

## ओळखीचाच कुणीतरी घरामध्ये ...

आईचा मृतदेह पाहून मुलाला धाकच बसला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून घटनास्थळी पोलीस व फॉरेंसिक लॅबचे पथक दाखल होऊन पंचनामा करून या घटनेचा सखोल तपास सुरु असून हि हत्या नेमकी का करण्यात आली याची माहिती अजूनही मिळाली नाही. विशेष म्हणजे घराचा दरवाजा आतून उघडण्यात आला असल्याने व घरातील वस्तूंची चोरी झाली नसल्याने हि हत्या ओळखीच्या एखाद्या व्यक्तीने केली असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून शहर पोलीस सखोल तपास करीत आहेत.

## चारित्र्याच्या संशयाने मती गुंग...

जिल्ह्यातील मंगरूळ येथील रहिवासी होता. १३ वर्षापुर्वी त्याचा विवाह औसा तालूक्यातील आशीव येथील लिंबराज कांबळे यांची मुलगी अनूराधा सोबत झाला होता. लिंबराज कांबळे यांनी मोठ्या थाटामाटात रितरीवाजाप्रमाणे आपल्या मुलीचे कन्यादान केले होते. लग्नानंतर अनूराधा सासरी नांदावयास गेली. काही वर्ष महादेव आणी अनूराधाचा संसार सुखात गेला. महादेव उस्मानाबाद येथे मिळेल ते काम करून आपल्या कुटूंबाचा गाडा हाकत होता. अनूराधाही मिळेल ते काम करून आपल्या पतीला हातभार लावत होती. दरम्यान पारधे दाम्पत्याला २ मुले व ३ मुली झाल्या. अधून-मधून दारू पिणाऱ्या महादेवला अशातच दारूचे अति व्यसन जडले. दररोज नित्य नियमाने महादेव दारू पिवू लागला. त्यामुळे घरातील शांतता भंग पावली. शुल्लक शुल्लक कारणावरून महादेव आणी अनूराधा यांच्यात भांडण सुरू झाले. महादेव आपल्या पित्नीच्या चारीत्र्यावर सारखा संशय घेवू लागला. त्यामुळे घरात सतत कौटुंबिक भांडणे होवू लागले. अनूराधाने या सगळ्या गोष्टी आई-वडींना बोलून दाखवल्या. मात्र अनूराधाच्या आई-वडीलांनी तिची समजुत काढून आज नाही तर उद्यातरी बर होईल असा विश्वास व्यक्त करत तिची समजूत काढली. महादेव आणी अनूराधा यांच्यात दररोज याना त्या खटके उडू लागले. महादेवने संसारातुन लक्ष काढून घेतले होते.त्यामुळे संसाराचा सगळा भार अनूराधावर पडला होता. अनूराधाला सासरकडील मंडळीचीही मदत मिळत नव्हती. त्यामुळे अनूराधाने माहेरी जाण्याचा निर्णय घेतला. ती आपल्या पाच लेकरासह माहेरी अशीव या गावी राहण्यासाठी आली. दरम्यान महादेवपण सोबत आला. आशीव गावात महादेव आणी अनूराधा आपल्या लेकरांसह राहू लागले. महादेव शेतात लागले ते काम करू लागला. दिवस चांगले जात आसल्याने आता आपल चांगल होईल अशी स्वप्न रंगवणाऱ्या अनूराधाचा अनंद जास्त काळ टिकला नाही. परत महादेव तिच्या चारीत्र्यावर संशय घेवून तिच्यासोबत भांडू लागला. दरम्यान दि.१७ डिसेंबर रोजीच्या पहाटे आरोपी महादेव पारधे यांनी पत्नीसोबत किरकोळ वाद घालत घराच्या मागे असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये आणून तिचा घरातील भाजीपाला कापणाऱ्या बतईसारख्या तीक्ष्ण हत्याराने गळा चिरून खून केला. यानंतर पत्नीचा खून केलेल्या महादेव पारधे यांनी पत्नीच्या प्रेताजवळच आसलेल्या शेडच्या लाकडी आडूला दोरीच्या साह्याने गळफास लावून आत्महत्या केली. सकाळी घरातील मुलाला आई रक्ताच्या थारोळ्यात पडलेली तर वडील हे गळफास लावून आत्महत्या केल्याच्या अवस्थेत आढळून आले व घरात आरडाओरडा सुरू झाला.या घटनेची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरली. गावातील दक्ष नागरीकांनी या घटनेची माहीती भादा पोलीस स्टेशनचे स.पोलीस निरीक्षक संदिप भारती यांना दिली. घटनेचे गांभिर्य ओळखून भादा पोलिस ठाण्याचे सपोनि संदिप भारती, पोलीस उपनिरीक्षक महेश मुळीक व पोलिस कर्मचारी यांनी धाव घेतली. दरम्यान औशाचे उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांनी घटनास्थळाला भेट देवून घटनेचा आढावा घेतला. पोलीस उपनिरीक्षक महेश मुळीक व पोलिस कर्मचारी यांनी घटनास्थळी पंचनामा करून आरोपी महादेव पारधे यांनी पत्नी अनुराधा हिचा गळा चिरून खून केलेले तीक्ष्ण हत्यार जप्त केले.व दोन्ही मृतदेहांचे उजनी प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले. सदरील घटनेवरून चारित्र्याचा संशय घेवून पत्नीचा गळा चिरून निर्घृण हत्या केल्याप्रकरणी लिंबराज कांबळे यांच्या फिर्यादीवरून महादेव पारधे याच्या विरोधात भादा पोलीसात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास सपोनी संदिप भारती करित आहेत.

## वाहिनीवरचा राग त्याने पुतण्यावर ...

पैशांसाठी तगादा लावत होती. एके दिवशी आयुषच्या आईने दिर निलेश यास भर रस्त्यावर चार चौघात ते पैसे मागीतले. केवळ मागीतलेच नाही तर चार चौघात त्याला शिवीगाळ करत त्याची चांगलीच इज्जत घेतली. आपल्या भावजयीने भर रस्त्यावर आपल्या इज्जतीचा पंचनामा केल्यामुळे निलेशच्या मनात तिच्याविषयी राग निर्माण झाला होता. आयुषच्या आईला कायमची चांगलीच अद्दल घडवायची हे निलेशने मनाशी ठरवले होते. १४ डिसेंबरच्या दुपारी निरागस बालक आयुष हा त्याचा काका निलेशसोबत होता. यावेळी निलेशच्या मनात त्याच्या भावजयीविषयी राग घोळत होता. त्याच वेळी तिचा मुलगा आयुष हा त्याच्या सोबत होता. नेमकी ही संधी आणि मनातील राग यांचा संयोग जुळून आला. बोलत बोलत निलेशने आयुष यास विहीरीजवळ आणले. विहीरीच्या काठावर आयुष उभा होता. आपला काका निलेशच्या मनात काय विचारचक्र सुरु आहे याची कल्पना निरागस बालक आयुषला नव्हती.

आयुष विहीरीच्या काठावर उभा असतांना त्याच्या आईविषयी निलेशच्या मनातील राग उफाळून आला. त्याने संतापाच्या भरात निष्पाप बालक आयुषच्या पार्श्वभागावर जोरदार लाथ हाणली. काकाची लाथ बसल्यामुळे पुतण्या आयुष विहीरीत पडला. विहीरीला त्याच्या मानाने भरपूर पाणी होते. चिमुकल्या आयुष यास विहीरीच्या पाण्यात पोहता येत नव्हते. त्यामुळे तो बुडू लागला. विहीरीत पडलेला आयुष मनातून खुप घाबरला. त्याने आयुषने आपला जीव वाचवण्यासाठी खुप आरडाओरड केली. मात्र त्याचा आवाज ऐकण्यासाठी कठोर काळजाच्या निलेशव्यतिरीक्त दुसरा कुणीही नव्हता. अखेर पाण्यात बुडून आयुषने जिव सोडला. त्याच्या आयुष्याची दोरी बळकट नसल्यामुळे ती तेथेच संपली. दरम्यान सायंकाळ झाली तरी आयुष घरी परत आला नाही म्हणून त्याचे आईवडील बेचैन झाले. त्यांनी त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. आपला मुलगा कुठे गेला असेल व काय करत असेल त्याने काही खाल्ले असेल किंवा नाही असे एक ना अनेक प्रश्न त्याच्या आईवडीलांच्या मनात निर्माण झाले होते. आपल्या मुलाला कुणीतरी पळवून नेल्याप्रकरणी आयुषच्या वडिलांनी भडगाव पोलिस स्टेशनला १४ डिसेंबर रोजी फिर्याद दाखल केली. त्यांच्या फिर्यादीनुसार भडगाव पोलिस स्टेशनला गु.र.न. ३२०/२० भा.द.वि.३६३ नुसार अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. अशोक उतेकर व त्यांचे सहकारी करत होते. बेपत्ता आयुष यास शेवटचे कुणी कुणी पाहीले याबद्दल प्राथमिक स्वरुपातील तपास करण्यात आला. या तपासातून त्याचा काका निलेश याचे नाव पुढे आले. त्यामुळे संशयाची सुई निलेश गायकवाड याच्याकडे जावू लागली. त्याच्या हालचालीवर पोलिस पथकाने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटत होत्या. बेपत्ता आयुषच्या आईने निलेश यास भर रस्त्यावर चार चौघात पैशांच्या कारणावरुन शिवीगाळ करत त्याच्या इज्जातीचा पंचानामा केल्याचे लोकांच्या चर्चेतून पोलिस पथकाला समजले होते.

अखेर पो.नि. अशोक उतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकातील कर्मचा-यांनी निलेश यास चौकशीकामी पो.नि. अशोक उतेकर यांच्यासमक्ष हजर केले. पो.नि. अशोक उतेकर यांनी सुरुवातीला त्याची प्रेमाने विचारपुस केली. मात्र निलेशच्या बोलण्यात संशय दिसून येत होता. आयुष यास आपण पाहिले नाही असे तो सुरुवातीला सांगत होता. नंतर तो पाय घसरुन विहीरीत पडला असे तो सांगू लागला. त्याच्या बोलण्यात तफावत पडत होती. तो उडवा उडवीची उत्तरे देत असल्याची बाब पो.नि. अशोक उतेकर यांच्या पारखी नजरेतून सुटली नाही. अखेर त्यांनी त्याला पोलिसी खाक्या दाखवला. पोलिसी खाक्या दिसताच त्याने आपला गुन्हा कबुल केला.

आयुषच्या आईने भर रस्त्यात पैशाच्या वादातून आपल्याला अतिशय खालच्या स्तरावरील शिवीगाळ केली होती. त्यामुळे त्याच्या आईबद्दल आपल्या मनात राग निर्माण झाला होता अशी कबुली निलेशने दिली. त्या रागातून आपण आयुषच्या पार्श्वभागावर लाथ मारुन त्याला विहीरीत ढकलून दिल्याची कबुली दिली. त्याने कबुली दिल्यानंतर रात्रीच्या अंधारात अथक प्रयत्नाने आयुषचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. तो मृतदेह जळगाव सामान्य रुग्णालयात उत्तरीय तपासणीकामी नेण्यात आला. अशा प्रकारे अगोदर अपहरण व नंतर विहीरीत ढकलून देत हत्या केल्याचा घटनाक्रम उघडकीस आला. अवघ्या चोवीस तासात बालकाच्या मृत्यूचे गुढ उलगडण्यात पो.नि. अशोक उतेकर व त्यांच्या पथकाला यश आले. निलेश गायकवाड यास अटक करण्यात आली. वैद्यकीय अहवाल तसेच पोलिसांच्या ताब्यातील निलेश गायकवाड याने दिलेला कबुली जबावानुसार या गुन्ह्यात भा.द.वि. ३०२ व ३६४ असे वाढीव कलम लावण्यात आले. या गुन्ह्याच्या तपासकामी पो.नि. अशोक उतेकर व त्यांचे सहकारी हे.कॉ. कैलास गिते, पो.ना.लक्ष्मण पाटील, पो.ना. नितीन राऊत, पो.कॉ. स्वप्नील चव्हाण, इश्वर पाटील, दत्तात्रय पाटील यांनी अथक परिश्रम घेतले.

## लॉकडाऊनमुळे त्याचा रोजगार गेला...

पोलिसांनी अटक केली आहे. तो टीव्ही अॅक्टर होता. सावधान इंडिया सारख्या नावारुपाला आलेल्या मालिकांमधून त्याने छोट्या मोठ्या भूमिका साखारल्या होत्या. त्यावेळी त्याची चलती होती. जोपर्यंत काम मिळत होते तोपर्यंत ठिक होते. परंतु देशात लॉकडाऊन झाले आणि त्याचे सर्व गणित डोलमडले. त्याची आर्थिक चणचण सूरू झाली. भिक मागायची वेळ आली त्याच्यावर बोलतात ना सगळी सोंग करता येतात पण पैशाचे सोंग करता येत नाही. अखेर या कलाकाराने अखेर चोरीचा फंडा सूरू केला. हात सफाई करून आपली कडकी सुधरवण्याची त्याने तयारी सुरू केली. शातीर चोरट्याला लाजवेल असे काम त्याने केले खरे. त्यात त्याला भरपूर पैसा हि मिळाला. परंतु तो या कृत्यामुळे मुंबई पोलीसांच्या रेकॉर्डवरचा गुन्हेगार ठरला. आर्थिक टंचाईवर मात करण्यासाठी तो भामटा चोर बनला. एवढ्यावरच तो गप्प नाही बसला. त्याने पोलीसांचा खराखूरा वाटणारा बनावट युनिफार्म हि गुन्हा करताना वापरला होता. तोतया पोलीस बणून त्याने अनेक गुन्हे केले असावेत असा पोलीसांना संशय आहे.

पोलीसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी त्याने अनेक प्रयत्न केले. परंतु अखेर तो पोलीस कोठडीत पोहचलाच. कोण आहे हा शातीर आरोपी? त्याने कसा गंडा घातला आणि कसा अट्टल चोरटा बनला त्याची हि कथा आहे. वेळ माणसाला त्याची खरी जागा दाखवते हेच खरे. टीव्ही मालिकेत काम करणाऱ्या एका अभिनेत्याला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. या अभिनेत्याचं नाव सलमान जाफरी (वय ४०) आहे. हा अभिनेता पोलिसांच्या वेशात सामान्य माणासांना फसवत असे. या अभिनेत्याने छत्रपती राजा शिवाजी, सावधान इंडिया अशा काही मालिकांमध्ये काम केलं आहे. सलमान जाफरी या टीव्ही कलाकाराने उत्तराखंडमधल्या देहरादून इथे राहणाऱ्या वयोवृद्ध महिलेला पोलीस असल्याचे सांगत तिच्याकडील ५ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरले होते. याप्रकरणी देहरादूनच्या पटेल नगर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंदवण्यात आला होता. आरोपी मुंबईतील अंधेरी ओशिवरा येथे राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पटेल नगर पोलिसांनी यासंदर्भात मुंबई पोलिसांच्या क्राईम ब्रँच युनिट आठला आरोपींना अटक करण्यासाठी विनंती केली होती. यासंदर्भात पोलिसांनी कारवाई करत आरोपींना अटक केली तेव्हा त्या आरोपींपैकी एक टीव्ही कलाकार असल्याचं निष्पन्न झालं आहे. चंदीगड, उत्तराखंड येथे पोलीस बनून हा टीव्ही कलाकार लोकांची फसवणूक करत होता.

सलमान जाफरीने चित्तोडगड की राजकुमारी, छत्रपती राजा शिवाजी, सावधान इंडियासारखे सिरीयल, गुलमकाई, बहन चोर सारख्या चित्रपटांमध्येसुद्धा त्याने सहकलाकार म्हणून काम केलं आहे. पोलिसांना सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरं देणाऱ्या या आरोपीने आपला चोरीशी काही संबंध नसल्याचं पोलिसांना सांगितलं होतं. मात्र, पोलिसांनी त्यांचा खाक्या दाखवताच सलमान अन्सारी पोपटासारखा बोलू लागला. सलमान चोरीसाठी विमानाने परराज्यात प्रवास करायचा. देहरादून, चंदीगड, उत्तर भारतातील इतर राज्यांमध्ये जाण्यासाठी सलमान मुंबईतून विमानाने प्रवास करायचा. देहरादून, चंदीगड, उत्तर भारतातील काही राज्यात पोलीस असल्याचं सांगून नागरिकांना लुटल्यानंतर तो पुन्हा विमानाने मुंबईत यायचा. सलमान जाफरीची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का? हे पोलिसांनी तपासले असता त्याच्यावर नागपूरमध्ये ३, उत्तराखंड राज्यांमध्ये २ असे गुन्हे दाखल आहेत. सलमान जाफरी आणि त्याच्या साथीदारांना अटक केल्यानंतर त्यांना डेहराडून पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आलं आहे.

## महिलांच्या विनयभंगाची लागली होती...

मुंबईत सीरियल मॉलेस्टरला बेड्या, ९ वर्षात ५० पेक्षा जास्त महिलांचा विनयभंग. मुंबई पोलीसांची झोप उडवणारा आणि महिला व तरूणींसाठी कर्दनकाळ ठरलेला हा आरोपी आहे तरी कोण? महिलांची छेडछाड करणे हा एक गंभीर गुन्हा आहे. महिलांच्या सुरक्षतेसाठी पोलीस दिवस-रात्र डोळ्यात तेल घालून लक्ष लक्ष देत असतात. तरीही महिलावर होणाऱ्या अत्याचाराची मालिका सुरूच आहे. अलीकडे पादचारी महिलांचा विनयभंग करणारा एक कुकर्मा मोकाट सुटला होता. अनोळखी महिला व तरूणीला भर रस्त्यात अडवून तिच्या बरोबर अश्लील कृत्य करणे, अश्लील हावभाव करणे, अश्लील इशारे करणे हे हा या आरोपीचा व्यवसायाच बनला होता. दिंडोशी पोलीस ठाण्यात या आरोपीच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर या पोलीस ठाण्याचे एक विशेष पथक याच्या मागे लागले होते. परंतु हा आरोपी पोलीसांना सतत हुलकावणी देत होता. महिलांसाठी, तरूणींसाठी हा आरोपी काळ बनला होता. त्याच्यासाठी हा आरोपी धोक्याची घंटा होता. म्हणून पोलीसांनी या आरोपीच्या मुसक्या आवळण्यासाठी खूप आटापिटा केला होता. कारण असे माथेफिरु समाजासाठी घातक असतात, अशा नराधमांची जागा हि पोलीस कोठडीतच असते.

दिंडोशी पोलीस एका माथेफिरु आरोपीच्या मागे लागले होते. मुंबई पोलीसांसाठी हा आरोपी मोस्ट वॉन्टेड सारखाच होता. त्याच्या विरुद्ध ५० पेक्षा अधिक गुन्ह्यांची नोंद झाली होती. खास करून हा आरोपी महिला व तरूणींसाठी कर्दनकाळ बनला होता. महिलांवरील हा धोका टाळण्यासाठी पोलीसांनी इतर गुन्ह्याच्या तपासाला बगल देऊन पोलीस या आरोपीच्या मागे लागले होते. दिंडोशी पोलीसांनी कल्पेश देवधर याला बेड्या ठोकल्या आहेत. कल्पेशने गेल्या ९ वर्षात ५० पेक्षा जास्त महिलांचा विनयभंग केला आहे. आता या आरोपी विरूद्ध तक्रार करण्यासाठी पोलीसांनीच आवाहन केले आहे. १२ डिसेंबरला कल्पेशने एका महिलाची छेड काढली होती. महिलेकडे बघून अश्लील कृत्य हि केले. ऐवढे सगळं होऊनही तो काही काळ तिथेच उभा होता. तिथेच त्याने एका पादचारी महिलेला अडवले. तिच्याशी संवाद साधद तिला आपल्या दुचाकीवर बसण्यासाठी जबरदस्ती ही केली. तरूणीने याकडे दुर्लक्ष केल्यावर हा आरोपी थेट तिच्या घरात घुसला होता. या गुन्ह्याची तक्रारीची दिंडोशी पोलीसांनी गंभीर दखल घेत आरोपी कल्पेच्या पोलीस मागे लागले होते. दिंडोशी पोलीसांचे ठाण्याचे एक विशेष पथक कल्पेचा दिवसरात्र शोध घेत होते. अखेर एका संध्याकाळी कल्पेश पोलीसांच्या हाती लागलाच.

पोलिसांनी जेंव्हा या आरोपीच्या मुसक्या आवळून त्याला अटक केली तेंव्हा पोलीसांना समजले की या आरोपीने पवई पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अशाच प्रकारचा गुन्हा २०१७ मध्ये केला होता व त्या गुन्ह्यात कल्पेशला अटक झाली होती अशी माहिती दिंडोशी पोलीसांना मिळाली. म्हणून पोलिसांनी त्याची कुंडली शोधून काढली पोलीसांच्या लक्षात आले आरोपी कल्पेश हा रेकॉर्डवरचा गुन्हेगार आहे. तो वाहन चालक आहे. त्याच्या या कृत्यामुळे त्याच्या कुटुंबियांनी हि त्याच्याशी संबध तोडले आहेत.

## दारूच्या नशेत दोस्ती यारी विसरून ...

सापडला असून त्याच्या मृतदेहाचे दहा ते बारा तुकडे करण्यात आले होते. सुशीलकुमार हे वरळी येथील राहणारे असून त्यांच्या बेपत्ता झाल्याची तक्रार वरळी पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली होती. १२ डिसेंबरला सकाळी ७.१५ वाजता सुशीलकुमार बँकेतील मित्रांबरोबर विरार येथे पिकनिकला जात असल्याचे सांगून घरातून निघाला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यत येतो असं सुशीलकुमार याने घरच्यांना सांगितलं. पण जेव्हा दुसऱ्या दिवशी सुशिलकुमार घरी आला नाही तेव्हा त्याची आई यल्लम्मा सरनाईक यांनी वरळी पोलीस स्टेशन येथे बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली.

सुशील कुमार याने घरी सांगितलं की तो विरारला जात आहेत. मात्र, तो विरारला न जाता त्याचा मित्र चार्ल्स सोबत नेरळ येथे गेला आणि दोघेही मद्यपान करू लागले. त्यातच सुशील याने चार्ल्सच्या पत्नी संदर्भात काही वक्तव्य केली. याचा राग मनात धरून चार्ल्सने सुनील वर चाकूने वार केले. सुशीलची हत्या केल्यानंतर चार्ल्स त्याची पत्नी आणि मुलांसोबत हॉटेलमध्ये राहायला गेला. दुसऱ्या दिवशी बाजारात जाऊन चार्ल्स कटर घेऊन आला. सुशीलचा मृतदेह ज्या घरात होता तेथे येऊन चार्ल्सने सुशीलच्या मृतदेहाचे दहा ते बारा तुकडे केले आणि दोन वेगवेगळ्या बॅगेत भरले.

त्यानंतर त्याने नेरळच्या रेल्वे ट्रॅक जवळ असलेल्या नाल्यात फेकून दिला. नेरळ पोलिसांना घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी पोहोचले. नाल्यात पडलेली बॅग ताब्यात घेऊन त्यांनी परिसराची झडती सुरू केली. तसेच सीसीटीव्हीच्या मदतीने त्यांनी चार्ल्सचा शोध लावला. चार्ल्सला ताब्यात घेतल्यानंतर त्याने सुशीलचा खून केल्याची कबुली दिली.

21 DEC TO 27 DEC 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 19/12/2020 9:12 PM Page 1



## थोडक्यात वृत्तांत

### वाड्यात बँक कर्मचाऱ्याची आत्महत्या

वाडा : वाडा तालुक्यातील कुडूस येथील युनियन बँकेच्या शाखेमध्ये काम करणारे २८ वर्षीय नेनावथ दिलीप कुमार नाईक यांनी शनिवारी दुपारच्या सुमारास भाड्याने राहत असलेल्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. मात्र या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. युनियन बँकेच्या कुडूस शाखेत कार्यरत असलेल्या नेनावथ नाईक हे मैत्री अपार्टमेंटमध्ये एका सहकाऱ्या सोबत राहत होते. दुपारच्या सुमारास या सहकाऱ्याने दरवाजा बाहेरून उघडला असता नेणावथ याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्याने लागलीच पोलिसांना कळवले. वाडा पोलिस स्टेशनअंतर्गत कुडूस पोलिस दूरक्षेत्रचे पोलिस पुढील तपास सुरू आहे.

### अनोळखी मयत इसमाच्या वारसांचा शोध सुरु

भिवंडी : शहरातील प्रसिद्ध वऱ्हाळा तलावात २५ ते ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह ११ मार्च २०२० रोजी आढळला आहे. मात्र नऊ महिने उलटूनही या मृत तरुणाची अजूनही ओळख पटली नसल्याने शहर पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद करून या घटनेच्या तपासाबरोबरच मृत इसमाच्या नातेवाईकांची शोध मोहीम सुरु केली आहे . मृत तरुणाचा रंग सावला असून अंगाने सडपातळ असून अंगावर काळ्या रंगाची फुल जिन्स पॅन्ट व कमरेला पट्टा असे वर्णन नोंदविण्यात आले आहे . सदर अनोळखी मृत इसमा बाबत अथवा त्याचे वारसाबाबत माहिती मिळाल्यास भिवंडी शहर पोलीस स्टेशन फोन नं ०२५२२ २५०१५० अथवा भिवंडी नियंत्रण कक्ष ०२५२२ २५३७०० या क्रमांकावरती संपर्क करावा असे आवाहन शहर पोलिसांनी केली आहे.

### लातूरमध्ये अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा

लातूर : जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात आला. या अल्पसंख्यांक हक्क दिवस कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश महाडिक, जिल्हा नियोजन अधिकारी श्री. दुशिंग, सहाय्यक नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी उपस्थित होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांनी जिल्हयात अल्पसंख्यांक समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची कामे संबंधित अधिकारी वर्गाने ताबडतोबीने पूर्ण करतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मार्गदर्शन केले. प्रारंभी सहायक निवडणूक अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी प्रस्ताविकात जिल्हा अल्प संख्यांक विषयी राबवित येत असलेल्या योजनाची माहिती पीपीटीव्दारे विषद केली.यावेळी अल्पसंख्यांकचे प्रतिनिधी म्हणून जाफर कादरी यांचा निवासी उपजिल्हाधिकारी ढगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.जिल्हा नियोजन अधिकारी दुशिंग यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले.

### मा. नगरसेवक पांडुरंग गोराडकर यांचे निधन



भिवंडी : भिवंडी नगर पालिकेचे माजी अपक्ष नगरसेवक पांडुरंग गोराडकर यांचे आज सकाळी दुःखद हृदयविकाराचा धक्याने निधन झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.त्यांच्या पश्चात दोन मुले, पत्नी व मुलगी नातवंडे आहेत. भिवंडी शहरातील ब्राह्मण आळी अंबिका नगर येथे राहणारे पांडुरंग गोराडकर (७२) हे सामाजिक कार्यकर्ते म्हणून लोकप्रिय असल्याने ते भिवंडी नगरपालिकेत दोन वेळा अपक्ष नगरसेवक व स्थायी समीतीचे सदस्य पदावर होते. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख स्व.आनंद दिघे यांच्याशी त्यांचे जवळचे सहकारी मित्र म्हणून ओळखले जात. आज सकाळी ७ वा मॉनिंग वॉक करून घरी आले असता त्यांचे हृदयविकाराचा धक्याने उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले. आज दुपारी हिंदू चिरशांती स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विजयकुमार ढगे यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत दि. १७ डिसेंबर २०२० रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते दि. ३१ डिसेंबर २०२० रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

### भिवंडीत आठ किलो गांजा जप्त

भिवंडी : भिवंडीत नाशिक येथून अवैध गांजा घेऊन येणार असल्याची खबर कोनगाव पोलिस कल्याणच्या बाजार पेठ पोलिसांना लागली असता याबाबत खात्री करून करून मंबई नाशिक महामार्गावरील भिवंडी बायपास येथील बासुरी हॉटेलजवळ सापळा लावला असता तीन इसमांकडून तब्बल आठ किलो गांजा जप्त करण्यात आल्याची घटना बुधवारी घडली आहे . याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अब्दुल उर्फ बबलू इब्राहिम पिंजारी (वय ३१ रा. अहमदनगर) राहुल उर्फ सैराट आण्णा रहिले (वय २७ रा. डोंबिवली पूर्व) राजेंद्र आण्णा माळी (वय २६ रा . डोंबिवली) असे गांजा प्रकरणी अटक केलेल्या इसमाची नावे आहेत. त्यांच्याकडून एक लाख साठ हजार रुपये किंमतीचा आठ किलो गांजा व तीन मोबाईल असा एकूण एक लाख ७६ हजार किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून याप्रकरणी कोंगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक डी एम शेणवी करीत आहेत.

# सीसीटीएनएस आणि आयसीडीएस प्रणालीतील वैयक्तिक उत्कृष्ट कामगीरीमध्ये पोलीस हवालदार इकबाल रशिद शेख महाराष्ट्रात व्दितीय





**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

केंद्रीय गुन्हे अभिलेख केंद्र, नवी दिल्ली यांचेकडून सन २०२० मध्ये उत्कृष्ट अभ्यास, सीसीटीएनएस व आयसीडीएस प्रणालीमध्ये वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रशस्तीपत्रक व बक्षीस देण्यात येते. सदर स्पर्धेमध्ये पोलीस हवालदार १४६५ इकबाल अ. रशिद शेख, सीसीटीएनएस विभाग सोलापूर ग्रामीण यांनी महाराष्ट्र राज्यातून व्दितीय क्रमांक पटकावून कोल्हापूर परिक्षेत्र व सोलापूर ग्रामीण जिल्हयाचे नाव महाराष्ट्र राज्यात लौकीकास आणले आहे. त्याबद्दल कोल्हापूर परिक्षेत्र चे विशेष पोलीस महानिरीक्षक मनोजकुमार लोहीया यांनी पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण येथे पार पडलेल्या वार्षिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देवून गौरव केले आहे. सदर बैठकीमध्ये सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपूते, अप्पर पोलीस अधीक्षक अतूल झेंडे सोलापूर ग्रामीण व सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी व सोलापूर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

पोलीस हवालदार १४६५ इकबाल अ. रशिद शेख यांनी यापूर्वीही अनेक स्पर्धेमध्ये भाग घेवून ८ सुवर्ण, ७ रौप्य व १० कास्य पदकांसह भारत देशात प्रथम क्रमांक येण्याचा मान मिळविलेला आहे. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी शुभेच्छासह कौतुकाचा वर्षाव केला आहे. महाराष्ट्र राज्यात सन २०२० मध्ये सदर स्पर्धेचे आयोजन राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून दिनांक २३ ऑक्टोबर २०२० रोजी करण्यात आले होते व निवड करण्यात आलेल्या स्पर्धकांची गुणवत्ता तपासणी परिक्षा रंजन कुमार शर्मा विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे अध्यक्षतेखाली संदिप दिवान पोलीस अधीक्षक, बर्गे पोलीस अधीक्षक व कदम पोलीस उपअधीक्षक यांचे समिती मार्फत घेण्यात आली होती. त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातून पोह/१४६५ इकबाल अ. रशिद शेख सी.सी.टी.एन.एस. विभाग, सोलापूर ग्रामीण यांनी व्दितीय क्रमांक पटकविला आहे. रंजन कुमार शर्मा, विशेष पोलीस महानिरीक्षक गुन्हे अन्वेशण विभाग, तथा समन्वय अधिकारी सी.सी.टी.एन.एस. प्रकल्प महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी डिसेंबर २०२० मध्ये केंद्रीय गुन्हे अभिलेख केंद्र, नवी दिल्ली येथे होणाऱ्या स्पर्धेकरीता महाराष्ट्र राज्यातून वैयक्तिक उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी मध्ये पोलीस हवालदार १४६५ इकबाल अ. रशिद शेख सी.सी.टी.एन.एस. विभाग, सोलापूर ग्रामीण यांचे महाराष्ट्र राज्यातून निवड करून केंद्रीय गुन्हे अभिलेख केंद्र, नवी दिल्ली यांचेकडे डिसेंबर २०२० मध्ये केंद्रीय स्तरावरील होणाऱ्या स्पर्धेकरीता नामनिर्देषन पाठविण्यात आलेले आहे.

## भिवंडीत ड्रेनेज लाईनच्या खड्ड्यात पडून दोन जण जखमी; नागरिकांच्या सुरक्षेकडे ठेकेदाराचे दुर्लक्ष!



**भिवंडी/प्रतिनिधी**

ड्रेनेज लाईनच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याची चर्चा शहरामध्ये होत असतांनाच आता ड्रेनेजलाईनच्या ठेकेदारांच्या दुर्लक्षित कारभार चव्हाट्यावर आला आहे. ड्रेनेज लाईन साठी खोदलेल्या खड्ड्यांमध्ये पडून दोन जण जखमी झाल्याची घटना शुक्रवारी पद्मानगर परिसरात घडली आहे. विशेष म्हणजे या खड्डया भोवती ठेकेदाराने नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही खबरदारी घेतली नसल्याने रोजच या खड्ड्यामध्ये नागरिक पडत आहेत. नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी ड्रेनेज लाईनचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडे असतांनाही स्वतः च्या फक्त फायद्याचा विचार करणाऱ्या ठेकेदारांकडून नागरिकांच्या सुरक्षिततेची कोणतीही काळजी येथे घेतली जात नसल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे राजरोसपणे ठेकेदारांची कामांमध्ये हलगर्जीपणा होत असतांनाही मनपा प्रशासनाचे या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष होत असल्याने महापालिका प्रशासनाविरोधात नागरिक तीव्र संताप व्यक्त करीत आहेत. दरम्यान ड्रेनेज लाईनच्या खड्ड्यात पडलेल्या दोघा जखमींना स्थानिकांनी बाहेर काढले . मात्र या खड्ड्यात नागरिक पडल्याचा व्हिडीओ समाज माध्यमांवर चांगलाच व्हायरल झाला असल्याने मनपा प्रशासनाचा दुर्लक्षित कारभार देखील चव्हाट्यावर आला आहे. ड्रेनेज लाईन ठेकेदारांच्या या व अशा हलगर्जी कारभाराकडे मनपा प्रशासन आतातरी लक्ष देणार का ? अशी चर्चा सुज्ञ नागरिक करीत आहेत.

## शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहरराव धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी येथे अखिल भारतीय वीरशैव शिवा युवक संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष, प्रा मनोहर धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार दि. १७ डिसेंबर रोजी दुपारी बैठक संपन्न झाली. यावेळी प्रा. मनोहर धोंडे यांनी लातूर जिल्ह्यातील पदाधिकारी व समाजबांधव, शिवकीर्तनकार यांच्याशी अनेक सामाजिक प्रश्नावर, विषयांवर सखोल चर्चा करुन अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. व शिवा संघटनेच्या माध्यमातून २५ वर्षापासून केलेल्या कार्याचा उल्लेख करत समाजाच्या न्यायहक्कासाठी शिवा संघटना नेहमीच खंबीर असल्याचे स्पष्ट केले. यावेळी जेष्ठ शिवकीर्तनकार राम लखादिवे गुरुजी, गोरोबा काका शिवणे, लक्ष्मण गुरुजी विभूते, धनराज बुलबुले महाराज, कैलास महाराज जामकर, बालाजी येरोळकर, संगमेश्वर महाराज ,सोमनाथ बिरादार, स्वामी चांदेगावकर, शिवसांब स्वामी चांदेगावकर, कावेरीताई मुतखेडे, पद्मीनीताई खराडे, आनंद अंकुलगे, महेश पाटील, शिवा डोंगरे, प्रकाश बिरादार, युवराज बिराजदार, पांडुरंग सातापुरे, बस्वराज ब्याळे, उमाकांत नागराळे, राजेश्वर स्वामी, आदिंसह शिवा संघटनेचे लातूर जिल्ह्यातील बहुसंख्य पदाधिकारी, समाजबांधव, शिवकीर्तनकार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# माऊली शुगर्स कारखान्यात एक लाख क्विंटल साखर पोत्यांचे पूजन



**सोलापूर/प्रतिनिधी**

अक्कलकोट तालुक्यातील तडवळ येथील १०० टक्के ऑटोमायझेशन असलेला आणि १०० टक्के सल्फर फ्री साखर उत्पादन करणारा माऊली शुगर्स ली. ने चालू गळीत हंगामात आतापर्यंत उत्पादित केलेल्या १ लाख क्विंटल साखर पोत्यांचे पूजन कारखान्याचे संस्थापक चेअरमन सीए व्ही.पी.पाटील यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी माऊली शुगर्स कारखान्याचे संचालक आणी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्णतः अद्यावत तंत्रज्ञान तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या तडवळ तालुका अक्कलकोट येथील माऊली शुगर्स या कारखान्यात यावर्षी पहिल्या दिवसापासून विक्रमी कार्यक्षमतेचा वापर करीत गळीत हंगामाची सुरुवात झाली आहे. संपूर्णतः ऑटोमायझेशन असलेला माऊली शुगर हा राज्यातील एकमेव साखर कारखाना असून १०० टक्के सल्फर मुक्त साखर तयार करणाराही महाराष्ट्रातील पहिलाच साखर कारखाना म्हणून माऊली शुगर्सची ओळख निर्माण झाली आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर आणि संपूर्णतः ऑटोमायझेशन यामुळे कारखान्याची कार्यक्षमता वाढली आहे त्यामुळे प्रति दिन ४५०० मेट्रिक टन गाळप क्षमता असलेल्या या कारखान्यात सदया दररोज ५५०० मेट्रिक टनापर्यंत गाळप होत आहे. याशिवाय कारखान्यात साखर उत्पादन करताना कमीतकमी स्टीमचा वापर होत असल्यामुळे विजेच्या उत्पादनातही वाढ झाली आहे. कारखान्याच्या या वैशिष्ट्यांमुळेच या वर्षीच्या गळीत हंगामात निश्चितपणे ७ ते ८ लाख मेट्रिक टन गाळप होईल असा विश्वास कारखान्याचे चेअरमन सीए व्हि.पी.पाटील यांनी व्यक्त केला आहे. सध्य परिस्थितीत आरोग्याबाबत जागरूकता वाढलेली असल्यामुळे सल्फरमुक्त साखरेला देशात आणि जगभरात मागणी आहे ही बाब लक्षात घेऊन माऊली शुगर्सने सल्फर मुक्त साखर उत्पादन करण्याचा निर्णय घेऊन हा प्लांट उभा केलेला आहे. लवकरच येथे उत्पादित झालेल्या साखरेची देशांतर्गत विक्री आणि बाहेर देशात निर्यात सुरू होणार असल्याचेही चेअरमन सीए व्ही.पी.पाटील यांनी सांगितले.

## सरपंच आणि उपसरपंच आरक्षण सोडत मतदानानंतर ३० दिवसाच्या आत होणार

**लातूर/प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत निवडणूकीची आचार संहिता लागू झालेली आहे. तथापि राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूकीची उद्घोषणा होण्यापूर्वी काही जिल्हयामध्ये सरपंच पदाची आरक्षण सोडत काढलेल्या होत्या व अद्यापही बहुतांशी जिल्हयांमध्ये आरक्षण सोडत कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला नाही. सरपंच पदाचे आरक्षणानंतर संबंधित जातीच्या दाखल्यांची पडताळणी वेळेत न होणे, जातीचा दाखला अमान्य होणे तसेच बनावट प्रमाणपत्र सादर करणे इत्यादी कारणांमुळे निवडणूक रद्द करुन पुनश्च नव्याने निवडणूक घेणे क्रमप्राप्त ठरते.

या पार्श्वभूमीवर वरील बाबींचा सारासार विचार करुन सरपंच आरक्षण सोडतीबाबत एकसमान धोरण असणे व होणारे गैरप्रकारांना पायबंद बसण्याकरिता तसेच योग्य व्यक्तीस न्याय मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने ज्या जिल्हयामध्ये सरपंच पदाची आरक्षण सोडत कार्यक्रम यापूर्वी राबविण्यात आलेला आहे. सदर प्रक्रीया रद्द करुन नव्याने घेण्याबाबत निर्णय घेतला आहे. आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणूक मतदान कार्यक्रम दि. १५ जानेवारी २०२१ रोजी होणार आहे व निवडणूक निकालाची अधिसूचना दि. २१ जानेवारी २०२१ प्रसिध्द होणार आहे.सबब सरपंच आरक्षण सोडत कार्यक्रम तसेच सरपंच व उपसरपंच यांची निवड निवडणूक मतदानानंतर शक्यतो लवकरात लवकरतथापि ३० दिवसाच्या आत राबविण्यात यावा असे ग्राम विकास विभागाचे कक्ष अधिकारी विवेक शिंदे यांनी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## नगरपंचायत निवडणूकीसाठी भाजपाचे प्रभारी नियुक्त

लातूर : लातूर जिल्हयातील होवू घातलेल्या नगर पंचायतीच्या निवडणूकीसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने राहूल केंद्रे, दगडू साळूंके, संजय दोरवे आणि शैलेश गोजमगंडे या चौघांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती भाजपाचे जिल्हा संघटन सरचिटणीस संजय दोरवे यांनी दिली. भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.रमेशअप्पा कराड यांनी जिल्हा अध्यक्षपदाचा कारभार घेतल्यापासून जिल्हाभरात पक्षाअंतर्गत असलेले मतभेद मोडीत काढत सर्वांना सोबत घेवून पक्ष एकसंघ ठेवून जिल्हयात भाजपा मजबूत करण्याच्या दृष्टीने दमदार पावले उचलली आहेत असे सांगून जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे म्हणाले की, जिल्हयाचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड आणि जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली येणा-या काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणूकीत भाजपा यशस्वी होवून लातूर जिल्हा हा भाजपाचा बालेकिल्ला असल्याचे पुन्हा एकदा सिध्द करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

## देवणीत झालेल्या विकास कामाची चौकशीसाठी रासपाचे उपोषण सुरू




**देवणी/प्रतिनिधी**

देवणी नगरपंचायत अंतर्गत जानेवारी ते डिसेंबर २०२० पर्यत झालेल्या विविध योजनेतील विकास कामाची चौकशी करावी या प्रमुख मागणीसाठी मंगळवार दि.१५ डिसेंबर रोजी नगरपंचायत समोर राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने उपोषणाला सुरुवात करण्यात आली असुन शनिवारी पर्यत उपोषणाचा पाचवा दिवस होता. याकडे अद्याप जिल्हा प्रशासनाने कोणत्याच प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे उपोषण कर्त्यांनी सांगितले. विविध योजेनेच्या माध्यमातुन झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करावी. या कामातील भ्रष्टाचारी अधिकारी, नगरअभियंता, कर्मचारी व काम करणारी संस्था यांच्यावर कार्यवाही करावी व तसेच सदरची कारवाई पूर्ण झाल्याशिवाय सदरच्या कामाची देयके काढू नयेत, पुढील कामे तातडीने थांबविण्यात यावे. एक हि काम अंदाजपत्रकानुसार झाले नाहीत, वर्षभरात झालेल्या निकृष्ट दर्जेच्या कामाचा मोबदला, काम केलेल्या संस्थांना एक रुपयाचाही देयक बिल शासनाने देऊ नये, यासह इतर मागण्या उपोषण कर्त्यांनी उपस्थित केलेल्या आहेत. उपोषण कर्त्यात राष्ट्रीय समाज पक्षाचे मराठवाडा संपर्क प्रमुख आनंद जीवने उर्फ पृथ्वीराज पाटील, बिरू कल्याणकर यांच्यासह आदीं उपोषणाला बसले आहेत. यावेळी उद्योगपती विजयकुमार मानकरी हे उपोषण स्थळाला भेट दिली.

# ...तर सरकार कसे टिकेल?

भारतात जेव्हापासून आघाडीची सरकारे चालवण्याची नामुष्की राजकीय पक्षांवर येऊ लागली, तेंव्हापासून लोकशाही आणि लोकांच्या प्रश्नांचा अक्षरशः खेळखंडोबा सुरू झालाय. कारण आघाडीतल्या पक्षांमध्ये फारसा समन्वय असतो. प्रत्येकला सरकारच्या माध्यमातून आपल्या पक्षाचा अजेंडा पुढे रेटायचा असतो आणि त्याच्या माध्यमातून पक्षाचा जनाधार वाढवायचा असतो आणि त्यातूनच आघाडी सरकारमध्ये धुसफूस सुरू होते आणि ही धुसफूस हाताबाहेर गेली की मग सरकारला धोका निर्माण होतो. आणि आघाडी सरकारमधील अशाच टोकाच्या मतभेदामधून अनेक सरकारे कोसळली. आणि त्याची सुरुवात १९७७साली जनता पक्षापासून झाली. काँग्रेसचा पराभव करून सत्तेवर आलेले मोरारजी देसाई यांच्या जनता पक्षाचे सरकार अवघ्या १७ महिन्यात कोसळले आणि तेंव्हापासून केंद्रात संगीत खुर्चीचा खेळ सुरू झाला होता. कोणाचे ११ महिन्यात, कोणाचे ९ महिन्यात, कोणाचे ६ महिन्यात तर कोणाचे १३ दिवसात सरकार कोसळले. मात्र या राजकीय संगीत खुर्चीच्या खेळातून काँग्रेस सारख्या सगळ्यात जुन्या पक्षाने धडा घेऊ नये याचेच दुःख वाटते. हे सर्व या साठीच सांगायचे आहे की महाराष्ट्रात सध्या महाविकास आघाडीचे सरकार आहे. हे सरकार तीन पक्षाचे असल्याने ते फार काळ टिकणार नाही अशी भविष्यवाणी वेळोवेळी विरोधी पक्ष करीत आहे. पण तरीसुद्धा या सरकारने एक वर्ष पूर्ण केले आणि आता तर हे सरकार २५ वर्ष टिकेल असा दावा आघाडीतले तीनही पक्ष करीत आहेत. असे असताना काँग्रेस पशाच्या प्रभारी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी किमान समान कार्यक्रम आणि दलीत आदिवासींच्या विकासाबाबत चार सुत्री कार्यक्रम राबवण्याचा आग्रह धरला आहे. मात्र सध्याची कोरोनाची स्थिती तसेच सरकारची आर्थिक स्थिती पाहता दलीत मागासवर्गीयांसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्याची सरकारची आर्थिक कुवत नाही. हे काँग्रेस पक्षाने आणि सोनिया गांधी यांनी सुद्धा लक्षात ठेवायला हवे. मुळात सध्या देशात काँग्रेसची स्थिती दयनीय आहे. अशावेळी महाराष्ट्र सारख्या मोठ्या राज्यात काँग्रेस सत्तेमध्ये आहे. तेंव्हा आघाडी सरकारमधील आपले सत्तेतले स्थान टिकवण्यासाठी काँग्रेसने स्वतः तसे प्रयत्न करायला हवेत. महाविकास आघाडीतील जे दोन मित्र पक्ष आहेत त्यांच्याशी जुळवून घ्यायला हवे. कारण महाराष्ट्रात काँग्रेसने जनाधार गमावलेला आहे. त्यामुळे निदान पुढील ५० वर्षात तरी स्वबळावर काँग्रेस सत्तेत येईल असे वाटत नाही. अशावेळी अन्य दोन पक्षाच्या मदतीने जी सत्ता मिळाली आहे ते टिकवण्याचे काम काँग्रेसने करायला हवे. त्यासाठी शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या मदतीने महाराष्ट्रात भाजपाविरोधी एक मोठी आघाडी तयार करायला हवी. तरच पुढील निवडणुकीत भाजपला सत्तेपासून रोखता येईल. मात्र तसे न करता आघाडी मध्येच फालतू गोष्टीवरून काँग्रेस काड्या घालायला लागली. तर महाराष्ट्रात काँग्रेसला जो काही थोडा फार जनाधार आहे तोही काँग्रेस गमावून बसेल. तेंव्हा मुख्यमंत्र्यांना अटी-शर्ती घालण्यापेक्षा सरकार टिकवण्यासाठी काय करता येईल याचा विचार काँग्रेसने करायला हवा. कारण काँग्रेसची स्थिती पूर्वीसारखी राहिलेली नाही. पंजाब, राजस्थान, छत्तीसगढसारख्या काही मोजक्याच राज्यांमध्ये काँग्रेस स्वबळावर सत्तेत आहे. पण तिथेही काठावरची स्थिती आहे. एक काळ असा होता की काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष पद मिळवण्यासाठी नेत्यांमध्ये चढाओढ लागत असे. अध्यक्षपदासाठी लॉबिंग केली जायची. आज परिस्थिती अशी आहे की काँग्रेसचे अध्यक्षपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकी असल्याने काँग्रेसला अध्यक्ष मिळेनासा झालाय. कुठल्याही राज्यात काँग्रेसची संघटनात्मक ताकत राहिलेली नाही. त्यामुळे काँग्रेसने स्वबळाची स्वप्ने पाहू नयेत. महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात जे काही मिळाले आहे ते डोळे मिटून खाण्याचा प्रयत्न करावा. मुख्यमंत्र्यांना अटी-शर्ती घालून स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेऊ नये. दलीत आदिवासींची चिंता फक्त काँग्रेसलाच आहे असे नाही, तर महाविकास आघाडीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षाला सुद्धा राज्यातील दलीत आदिवासींची चिंता आहे. पण कोरोनाचे संकट आणि त्यातून राज्याची विस्कटलेली आर्थिक घडी यामुळे सरकार हतबल आहे. अशावेळी सरकार मध्ये सामील असलेल्या काँग्रेसने सरकारची आर्थिक हतबलता समजून घ्यावी आणि नंतरच सरकारला अटी घालाव्यात. महाविकास आघाडीचे सरकार हे भाजपला पर्याय म्हणून सत्तेवर आलेले आहे आणि हा एक भाजपच्या विरोधात प्रयोग आहे आणि हा प्रयोग जर महाराष्ट्रात यशस्वी ठरला तर इतर राज्यांमध्येही त्याच अनुकरण केलं जाऊ शकतं, जेणेकरून मोदींच्या हुकुमशाहीला कुठेतरी रोखता येईल. आज देशातला शेतकरी मोदी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरलेल्या आहे. या शेतकऱ्याला नेतृत्व देण्यात आणि आपल्या बाजूस वळवण्यात जर विरोधी पक्षांना यश आले, तर देशातील ६० कोटी शेतकरीच मोदींची सत्ता उलथवून टाकतील. पण यासाठी विरोधकांची एकजूट हवी. महाराष्ट्रातील तीन पक्षांची एकजूट आणि या एकजुटीतून तयार झालेले भाजपा विरोधी सरकार भाजपला रोखण्याच्या दृष्टीने एक सक्षम पर्याय ठरू शकते. तेंव्हा हे सरकार टिकायला हवे आणि ते टिकवण्याची जबाबदारी अर्थातच आघाडीतील तिन्ही पक्षांची आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीकडून ही जबाबदारी योग्यरित्या पाळली जात आहे, पण काँग्रेस मात्र काहींना काही कारणाने काड्या घालीत आहे, ते त्यांनी थांबवणे सरकारच्या आणि त्याच्याही दृष्टीने महत्त्वाचे आहे.

# धार्मिक ड्रेसकोड!




**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

देश-विदेशातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साईबाबांच्या शिर्डीत आता एका नव्या वादाला तोंड फुटले आहे. महाराष्ट्रात आजवर साई संस्थानच्या भ्रष्टाचाराचीच चर्चा होत असे. साईबाबांच्या नावाने कुणी किती आणि कसे खाल्ले हा महाराष्ट्रात चर्चेचा विषय असायचा. शिर्डीचे साईबाबा देवस्थान हे देशातील क्रमांक दोनचे श्रीमंत देवस्थान! त्यामुळे पैशाला तोटा नाही. लॉकडाऊनमध्ये साई बाबांचे जगभरातील लाखो भक्त जरी मेले तरी साई संस्थांची आर्थिक सुबतता मात्र कायम होती. येवढं साईबाबांचा महिमा आहे. आणि जिथे पैशाच्या राशी असतात तिथे वेगवेगळ्या प्रकारचे वाद सुद्धा असतात. सध्या साई संस्थानाने ड्रेसकोड बाबत जे नियम केले आहेत ते साई भक्तांवर अन्याय करणारे आहे. देवाच्या दर्शनाला कोणी काय घालून जावे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे आणि दर्शनाला जाताना मंदिराचे पावित्र्य कसे राखायचे हे प्रत्येक भाविकाला ठाऊक असते. त्यामुळे त्याला साई संस्थांच्या उपदेशाची गरज नाही. साईबाबांचे भक्त जगभरात पसरले आहेत, अशावेळी काही विदेशी भक्त बर्मुडा किंवा हाप चड्डी घालून दर्शनासाठी येतात आणि ते त्यांच्या देशातील मॉर्डन संस्कृती नुसार पेहराव करून जगभर फिरत असतात. केवळ विदेशीच नाहीत तर आपल्या देशातील काही तरुण वर्ग बरमुडा घालून शिर्डीत दर्शनाला येतो. अशावेळी त्याच्यावर भारतीय पेहरावातच यावे असे बंधन घालण्याचा अधिकार साई संस्थानला कोणी दिला. या देशात धार्मिक स्वातंत्र्य आहे. त्यामुळे प्रत्येकजण त्या त्या धर्मातील चालीरितीनुसर पूजाअर्चा करीत असतो. त्याच्या धार्मिक श्रद्धा जपत असतो. पण कायद्यात कुठेही देवाच्या दर्शनाला जाताना माणसाने कोणते कपडे घालायला हवेत याबाबत कुठलाही नियम नाही. असे असताना शिर्डी साई संस्थांकडून साईभक्तांना ड्रेस कोर्डचे बंधन का? त्याबाबत कशासाठी मंदिराच्या बाहेर नियमांचे फलक लावले आहेत. आणि हे धार्मिक अतिक्रमण हिंदू धर्मातील लोकांना तरी मान्य आहे का? या पूर्वी साई संस्थानच्या लोकांनी साई भक्तांवर कधीच अशी दंडेली लादली नव्हती. पण केंद्रात भाजपचे सरकार आल्यापासून धर्माचं स्तोम माजविणाऱ्या लोकांना जणू काही रान मोकळे मिळाले आहे. बर्मुडा किंवा शॉर्ट स्कर्ट घालून दर्शनाला गेल्याने जर मंदिराचे पावित्र्य नष्ट होते, तर मग पुजारी केवळ सोवल नेसून उघड्या अंगाने देवाची पूजा का करतो! देव दर्शन करणाऱ्या किंवा धार्मिक कार्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्त्री पुरुषाने अंगभर कपडे घालायलाच हवे असे जर धर्म मर्तांडणा वाटत असेल तर मग कुंभ मेळ्यात पूर्णपणे निर्वस्त्र असलेल्या नागा साधू लोकांना प्रवेश का दिला जातो. तिथे तर मोठ्या संख्येने महिला भाविक सुद्धा हजर असतात. नागा साधूंना बघून त्यांच्या मनात लज्जा उत्पन्न होत असेल तर मग त्याबाबत कठोर नियम का केले जात नाहीत. आजकाल धार्मिक स्थळांना पर्यटनाचे स्वरूप आलेले आहे. त्यामुळे तिथे दर्शनासाठी जाणाऱ्या लोकांच्या मनात देवा विषयी जितकी श्रद्धा असते तितकाच पर्यटनाचा सुद्धा आनंद असतो. अशावेळी एखाद्या पुरुषाने किंवा स्त्री भाविकाने थोडीशी मॉर्डन वेशभूषा केली तर कुठे बिघडले. कारण अंगभर कपडे घालून साई दर्शनाला जाणाऱ्या भाविकांच्या मनात साईबाबांच्या बाबत जितकी श्रद्धा असते तितकीच मॉर्डन कपडे घालून दर्शनाला जाणाऱ्या भाविकांच्या मनात सुधा श्रद्धा असते आणि वेशभूषे पेक्षा श्रद्धा आणि भक्तिभाव महत्वाचा आहे. साई संस्थानचे पदाधिकारी जर येवढे कट्टर धार्मिक असतील तर त्यांनी अगोदर शिर्डी मधले अनैतिक धंदे बंद करावेत. शिर्डीतील ६० टक्के हॉटेल्स आणि लॉजमध्ये कोणते धंदे चालतात आणि साईबाबांच्या दर्शनाच्या नावाने शिर्डीत आय्याशीसाठी येणाऱ्यां लोकांमध्ये कोणत्या प्रकारचे लोक असतात याचा अगोदर शोध घ्यावा आणि साईबाबांच्या पावन भूमीतील हे अनैतिक धंदे बंद करावेत. पण तसे ते करणार नाहीत. कारण या बेकायदा हॉटेल्स आणि लॉजच्या धंद्यात शिर्डी संस्थान मधील काही संचालकांनीच भागीदारी आहे. त्यामुळे शिर्डीत खुलेआम् अनैतिक धंदे चालतात. साई संस्थानला शिर्डी मधला व्याभिचार चालतो, मग बर्मुडा घालून दर्शनाला येणारा साईभक्त का चालत नाही? मी नाही त्यातली आणि कडी लावा आतली! अशी साई संस्थांची अवस्था आहे. तेंव्हा ड्रेस कोडची दंडेली मोडून काढण्यासाठी सर्व साई भक्तांनी एकत्र येऊन साई संस्थानाच्या संचालकांना जाब विचारावा आणि मंदिरा समोर यांनी लावलेले उपदेशाचे फलक जाळून टाकावेत अशी संतप्त प्रतिक्रिया काही साई भक्त व्यक्त करीत आहेत. साईबाबा गरिबांचे दाता होते. गोरगरिबांच्या सेवेत त्यांनी हयात वेचली. दहा घरे भिक्षा मागून भुकेल्याना दोन घास भरवले. शेकडो मैल पायी प्रवास करून शिर्डीत आले. त्यांची जात, त्यांचा धर्म, कुणालाच ठाऊक नाही. आज साई संस्थांचे संचालक आलिशान गाड्यांमधून फिरत आहेत. लक्झरी जीवन जगत आहेत. साई संस्थानला विदेशी साई भक्तांच्या लाखोंच्या देणग्या चालतात. पण शॉर्ट स्कर्ट किंवा बर्मुडा मात्र चालत नाही हा विरोधाभास नाही का? तेंव्हा आता साई संस्थांची ही दंडेली मोडून कडने आवश्यक आहे.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# फॉरेन्सिक विज्ञान : गुन्ह्यांचा छडा लावण्याचे तंत्र!



**दिशायन**

फॉरेन्सिक रिपोर्ट हा शब्द आपण अनेकदा बातम्यांमध्ये ऐकला आहे. न्यायालयात गुन्हे खटल्यांमध्ये पुराव्यासाठी फॉरेन्सिक अहवाल महत्त्वाची भूमिका बजावतात. या खटलांमध्ये न्याय देण्यासाठी विज्ञानाची मदत घेतली जाते. रसायनशास्त्र, औषधशास्त्र, जीवशास्त्र, छायाचित्रण, भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांमधील तंत्रे फॉरेन्सिक विज्ञानात येतात. तथापि, अलिकडच्या वर्षात त्याने केवळ आपली तंत्रेच विकसित केली नाहीत तर शाखा देखील विकसित केल्या आहेत, ज्या फोरेंसिक विज्ञानाच्या अधिक किंवा कमी विशिष्ट डोमेन आहेत. फॉरेन्सिक सायन्सची दोन प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे ती बहु-शास्त्रीय तसेच बहु-व्यावसायिक आहेत.

जेव्हा एखादा गुन्हा घडतो, तेव्हा त्या ठिकाणी (गुन्ह्याच्या ठिकाणी) अनेक प्रकारचे पुरावे, खुणा सुटलेल्या असतात. या खुणा किंवा पुरावे म्हणजे काहीही असू शकतं, अगदी काहीही. जसे की- रंग, रक्त, माती, गुन्हेगाराची किंवा बळी गेलेल्या अज्ञात व्यक्तीची थुंकी, शारीरिक घटक, डिजिटल पुरावे, हाड, कागदपत्रं, बोटांचे ठसे इत्यादी. गुन्हा ज्या ठिकाणी घडला त्या ठिकाणी वर नमूद केलेल्याप्रमाणे असे कोणत्याही प्रकारचे पुरावे किंवा खाणाखुणा सापडल्या असतील, तर रसायनशास्त्र (केमिस्ट्री), जीवशास्त्र (बायोलॉजी) आणि भौतिकशास्त्र (फिजिक्स) यांच्या सहाय्याने ते पुरावे शोधणं आणि त्यांचा आढावा घेण्याचं काम फॉरेन्सिक सायन्स करतं. गुन्हेगाराला पकडून देण्यासाठी मदत करण्यात फॉरेन्सिक सायन्सचा वाटा मोठा आहे. त्याचबरोबर न्यायालयात या शास्त्रशुद्ध पुराव्यांच्या आधारे गुन्हेगारांना शिक्षा मिळवून देण्याचं कामही याच फॉरेन्सिक विज्ञानाच्या मदतीने होतं म्हणजेच न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेची महत्त्वपूर्ण भूमिका असते. गुन्हेगारीच्या दरात झपाट्याने वाढ झाल्यामुळे फौजदारी न्याय प्रणालीत फॉरेन्सिक सायन्स महत्त्वाचे ठरत आहे. तसेच फॉरेन्सिक सायन्सची व्याप्ती विस्तृत आहे. एसजीटी युनिव्हर्सिटी सारख्या प्रतिष्ठित संस्था फॉरेन्सिक सायन्स मध्ये पदवी, पदव्युत्तर आणि डॉक्टरेट पदवी प्रदान करते. हे कोर्स आपल्याला आपली कौशल्ये सुधारण्यात आणि आपले ज्ञान वाढविण्यात मदत करतात. आर्किमिडीज यांना फॉरेन्सिक विज्ञानाचे पितामह म्हटले जाते. सातव्या शतकात त्यांनी याबाबत अनेक प्रयोग करून सिद्ध केले होते. १९०९ मध्ये आर्चीबाल्ड रेसने जगातील पहिली फॉरेन्सिक सायन्सची शाळा सुरू केली. ही शाळा लॉसने विद्यापीठाच्या



इंस्टिट्यूट डी पोलीस सायंटिफिकमध्ये करण्यात आली होती. डॉ. एडमंड लोकार्ड हे 'शेरलॉक होम्स ऑफ फ्रान्स' म्हणून ओळखले जाऊ लागले. १९८८ मध्ये फॉरेन्सिक सायन्स लक्षणीयरीत्या लागू केले गेले. इंग्लंडमधील लंडन शहरामधील डॉक्टरांना जखमेच्या नमुन्यांसाठी जॅक द रिप्परच्या पीडितांची तपासणी करण्याची परवानगी देण्यात आली. हे जगातले पहिले प्रकरण मानले जाते, ज्यात फॉरेन्सिक प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली होती. भारतात २ हजार ३०० वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या कौटिल्यांच्या अर्थशास्त्रात फॉरेन्सिक विज्ञानाबाबत उल्लेख आढळतो. यात या विज्ञानाच्या वापराबद्दलही लिहिलेले आहे. एका चिनी हस्तलिखितात दक्षिण भारतीय राज्यांच्या माहितीमध्ये हातांच्या बोटांचे ठसे पुरावा म्हणून वापरत असत, असे नमूद केले आहे. मात्र आधुनिक फॉरेन्सिक विज्ञान ब्रिटीशांनी भारतात आणले. पहिल्यांदा भारतात फॉरेन्सिक लॅब १८५२ साली कोलकाता येथे स्थापन झाली. फॉरेन्सिक लॅबमध्ये मृत्यूचे कारण शोधण्याचे पोस्टमार्टम केले जाते. हे आपण अनेक बातम्या, चित्रपट, मालिकांमध्ये ऐकले आहे. यासाठी शरीराच्या प्रत्येक भागाची तपासणी केली जाते. याचबरोबर ड्रगशी संबंधित तपासण्या केल्या जातात. डिएनएसह पॉलिमेरस अर्थात डिएनएच्या साखळीची जेनेटीक तपासणीही केली जाते. तसेच हाता-पायांच्या बोटांचे ठसे, केस, रक्त, शरीरातील अवयव, शरीरातील विविध रसायने, गुन्ह्यांमध्ये वापरण्यात आलेली साधने इत्यादी गोष्टींवर अभ्यास, विश्लेषण केले जाते. महाराष्ट्रात न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेची स्थापना मुंबईत १९५८ मध्ये झाली. महाराष्ट्र एफएसएल 'संचालनालया'चे मुख्यालय मुंबईतील सांताक्रूझ येथील कलिना परिसरात आहे. पुढे नागपूरमध्ये १९६६, पुणे येथे १९७९, औरंगाबादमध्ये १९८१, नाशिक येथे २००४, अमरावतीत २००८, नांदेडमध्ये २०१५ आणि कोल्हापूरात २०१६ रोजी प्रयोगशाळांची उभारणी करण्यात आली. सध्या ही सात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आहेत. तर चंद्रपूर, धुळे, रत्नागिरी, ठाणे आणि सोलापूर येथे पाच लघु न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आहेत. संचालनालयामध्ये आयपीसी, सीआरपीसी, इंडियन आर्म्स ॲक्ट, एनडीपीएस ॲक्ट, स्फोटक पदार्थ कायदा, पेट्रोलियम कायदा, मुंबई पोलिस कायदा, अत्यावश्यक वस्तूंचा कायदा, बॉम्बे बंदी कायदा, मोटार वाहन अधिनियम, आयटी एक्ट, लाइफ प्रोटेक्शन ॲक्ट, टाडा, मकोका, वाईल्डलाईफ ॲक्ट इ. अशा विविध कायद्यांनुसार विविध गुन्हेगारी प्रकरणांचे विश्लेषण केले जाते. हवाई दलाचे कमिशन ऑफिसर एस. सुरेश कुमार यांची हत्या १७ मे १९९८ रोजी करण्यात आली होती. मात्र या गुन्ह्याबाबत कोणतेच पुरावे मिळत नव्हते. तपास पुढे सरकत नव्हता. अखेर १२ वर्षानी अर्थात २०१२ मध्ये या प्रकरणाचा छडा लागला. यात फॉरेन्सिक विज्ञानाची महत्त्वाची भूमिका ठरली होती. २०१८ मध्ये शिमला येथील कोटखाई समुह बलात्कार प्रकरणात अद्ययावत फॉरेन्सिक तपासणीमुळे गुन्हेगाऱ्यांना शिक्षा झाली. गुन्हेगारांविरोधात कोणतेही पुरावे उपलब्ध नसताना फॉरेन्सिक विज्ञानामुळे खऱ्या गुन्हेगारांपर्यंत पोहोचता आले.

# महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाचे विभागीय केंद्र लातूरसाठी मंजूर

महाराष्ट्र राज्य आणि संपूर्ण देशात शैक्षणिक केंद्र म्हणून नावारूपाला येत असलेल्या लातूर येथे महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाचे विभागीय केंद्र मंजूर करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला घेतला आहे, राज्याचे वैद्यकीय शिक्षण तथा सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांच्या पाठपुराव्यातून हे विभागीय केंद्र मंजूर झाल्याने लातूरच्या एकूण वैभवात भर पडणार आहे. जे जे नवं ते ते लातूरला हवं असा ध्यास असलेल्या लातूकरांमुळे या शहराचा आणि जिल्ह्याचा अत्यंत गतिमान पद्धतीने विकास झाला आहे. विकासाची ही प्रक्रिया कायम सुरू आहे, मागच्या काळात राज्याचे माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांनी लातूरचा लोकप्रतिनिधी या नात्याने या शहरासाठी आणि जिल्ह्यासाठी कोणत्याही मागणीची वाट न पाहता अनेक योजना राबवल्या यातून येथील विकास प्रक्रियेने मोठी गती घेतलेली आहे.लातूर येथील पालक, शिक्षक, संस्थाचालक, विद्यार्थी यांची जिद्द आणि त्यातून निर्माण झालेले शैक्षणिक वातावरण लक्षात घेऊन येथे असंख्य शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या. लातूर शिक्षण क्षेत्राला पोषक वातावरण निर्माण होऊन लातूरचा आदर्शवंत शैक्षणिक पॅटर्न निर्माण झाला, सातत्यपूर्ण शैक्षणिक यशामुळे लातूर एक शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित होत आहे. हे शैक्षणिककेंद्र प्रस्थापित होण्यासाठी शाळा महाविद्यालया बरोबरच महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्चमाध्यमिक मंडळ विभागीय कार्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे उपकेंद्र आणि शिक्षण उपसंचालक कार्यालय लातूर येथे सुरू करण्यात आले, त्या काळात फक्त शैक्षणिक सुविधांची विभागीय कार्यालय लातूरला आली असे नव्हे तर कृषी, पशुसंवर्धन, आरोग्य, परिवहन, सहकार, धर्मादाय, जलसंपदा यासह २५ ते ३० खात्याची विभागीय कार्यालय लातूरला येऊन लातूरची सर्वांगीण प्रगती होत राहिली आहे. आदरणीय विलासराव देशमुख मुख्यमंत्री होण्यापूर्वी ज्या ज्या खात्याचे मंत्री राहिले त्या प्रत्येक खात्याच्या योजनेचा पहिला घास लातूरला मिळाला, शिवाय या प्रत्येक खात्याचे विभागीय कार्यालय लातूरला सूरू झाले. विद्यमान पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी कॅबिनेट मंत्री वैद्यकीय शिक्षणमंत्री म्हणून पदभार सांभाळल्यानंतर त्यांनीही महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाचे उपकेंद्र मंजुर केले आहे. नाशिक येथे सदरील विद्यापीठ सुरू झाल्यानंतर मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर व कोल्हापूर या ५ ठिकाणी विभागीय केंद्र स्थापन करण्यात आली होती. यातील औरंगाबाद विभागीय केंद्राचे विभाजन करून आत्ता ते कार्यालय लातूर येथे विभागीय केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या विभागीय केंद्रामुळे लातूरच्या वैभवात भर पडणार असून लातूरच्या शैक्षणिक विकासासाठी आणखीन गती मिळणार आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

21 DEC TO 27 DEC 2020 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 19/12/2020 9:13 PM Page 1



# सोलापूरमध्ये तीन कोटी किंमतीचे सहा किलो सोने जप्त

## सावळेश्वर टोल नाक्याजवळ स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई





**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर पुणे महामार्गावर सावळेश्वर टोल नाक्याजवळ सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेनी विशाखापट्टणम येथून सोलापूर मार्गे मुंबई कडे नेण्यात येत असलेले सुमारे तीन कोटींचे सहा किलो सोने जप्त करण्यात आली आहे , सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, रविवारी रात्री एका कारमधून आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथून दोन व्यक्ती संशयास्पदरित्या सोने घेऊन सोलापूर मार्गे मुंबईकडे निघाले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सावळेश्वर टोल नाका येथे पोहोचले. पोलिसांनी वेशांतर करून सापळा रचला. सोलापूरकडून मोहोळच्या दिशेने येणाऱ्या वाहनांवर बारकाईने लक्ष केंद्रित केले असता एक पांढऱ्या रंगाची हुंडाई वेन्यू कार (डब्ल्यू बी ०२ ए पी १५९६) टोल नाक्यावर थांबली. त्यावेळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोलिसांनी सदर कारला घेराव घातला. कार मधील दोन संशयित व्यक्तीना कारमध्ये असलेल्या मालाबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे दिली. त्यामुळे त्यांचा जास्त संशय व्यक्त झाल्याने सदर वाहन टोलनाक्याच्या बाजूला असणाऱ्या टोलनाक्याच्या कार्यालयासमोर नेऊन तेथे कारमध्ये काय आहे याची पाहणी केली असता कारमधील चालकाशेजारील सीटच्या खाली असणाऱ्या मॅटिंगच्या खाली कप्प्यामध्ये एका पांढऱ्या रंगाच्या कपड्यामध्ये गुंडाळलेली सोन्याची बिस्किटे (लगड) मिळून आली. कागदामध्ये गुंडाळलेल्या एकूण ६ मोठ्या सोन्याच्या लगड, दोन लहान लगड व तीन लहान तुकडे सापडले आहेत. या सर्व सोन्याचे वजन केले असता त्याचे एकूण वजन ६ किलो ३३९.८१ ग्रॅम झाले. त्याची बाजारभावानुसार एकूण किंमत ३ कोटी १६ लाख ३५ हजार ६४९ रुपये इतकी आहे. तसेच दहा लाखांची हुंडाई वेन्यू कार आणि १४ हजारांचे दोन मोबाईल असा एकूण ३ कोटी २६ लाख ४९ हजार ६४९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कारमधील राजेंद्र हिंदुराव शेवाळे (वय ३९, रा.कामेरी ता वाळवा जि. सांगली) व रघुनाथ मचिंद्र बाबर (वय २८ रा.देशमुखवाडी ता आटपाडी जि.सांगली) या दोघा संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सोने कोणाचे व मुंबई येथे कशासाठी नेण्यात येत होते याचा सखोल चौकशी करण्यात येत आहे.

ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्याम बुवा, सहाय्यक फौजदार शिवाजी घोळवे, संदीप काशीद, पोलीस हवालदार प्रकाश कारटकर, विजय भरले, श्रीकांत गायकवाड, सलीम बागवान, पोलीस नाईक परशुराम शिंदे, लाला राठोड, जयवंत सादुल, पोलीस कॉन्स्टेबल सचिन गायकवाड, अन्वर अत्तार यांनी सदरची कामगिरी बजावली आहे.

दरम्यान सहा किलो सोने जप्त करण्यात आले असून त्याचा मालक समोर न आल्यास या प्रकरणाचा तपास विशाखापट्टणम येथे जाऊन करण्याची परवानगी न्यायालयात मागण्यात येईल. जीएसटी आयुक्तांना देखील पत्रव्यवहार करण्यात येणार आहे. सध्या ताब्यात घेतलेल्या चालक व त्याच्या सहकाऱ्यांकडे मालकाबाबत चौकशी करण्यात येत आहे, असे स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी सांगितले.

# आयोगाकडून ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रम जाहीर

**देवणी/शकिल मनियार**

कोरोनाच्या काळात मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. आता या ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे १५ जानेवारीला मतदान होणार आहे, तर १८ जानेवारीला मतमोजणी करण्यात येणार असून त्यासाठी आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे २३ ते ३० डिसेंबर या कालावधीत स्वीकारली जातील, त्यांची छाननी ३१ डिसेंबर रोजी होईल, नामनिर्देशनपत्रे ४ जानेवारी २०२१ पर्यत मागे घेता येणार असून त्याच दिवशी निवडणूक चिन्ह वाटप होणार आहेत, मतदान १५ जानेवारी २०२१ रोजी तर १८ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुका झाल्या नंतर ग्रामपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम केंव्हा जाहीर होणार यांकडे पुढाऱ्यासह नागरिकांचे लक्ष लागले होते, त्यात अखेर ग्रामपंचायतीच्या निवडणूकीची प्रतिक्षा संपली असून निवडणुक आयोगाने १५ जानेवारी २०२१ ला तालुक्यातील ३४ ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पडणार आहेत. तसेच जनतेतुन सरपंच न निवडता सदस्यातुन सरपंच निवडले जाणार आहेत.

देवणी तालुक्यात ५४ गावे असुन एकुण ४५ ग्रामपंचायतीं पैकी ३४ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे. तालुक्यातील मुदत संपलेल्या ३४ ग्रामपंचायती अंतर्गत प्रभाग रचना, प्रभागनिहाय आरक्षण, मतदार याद्यांचे काम कोरोना टाळेबंदीच्या अगोदरच पूर्ण झाली.त्यानंतर प्रारूप मतदान याद्याचे काम झाले, प्रारूप याद्यावरील हरकती निकाली काढण्यात आल्या असून दि. १० डिसेंबर ऐवजी दि.१४ डिसेंबर रोजी अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे देवणीचे नायब तहसीलदार हिसामोद्दीन शेख यांनि क्राईम संध्याशी बोलताना सांगितले.

## मराठवाड्यातील निजामकालीन शाळांसाठी २०० कोटी रुपये मंजूर

मुंबई : मराठवाड्यातील सन १९६० पूर्वीच्या निजामकालिन जिल्हा परिषदेच्या शाळांचा दर्जा सुधारण्याचा मार्ग मोकळा झाला असून शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्या पाठपुराव्यामुळे २०० कोटी रुपयांचा निधी नुकताच पुरवणी मागणीत मंजूर झाला आहे. मराठवाड्यातील औरंगाबाद येथील १३० शाळा, बीड येथील २९३, हिंगोली येथील ४२, जालना येथिल २०३, लातूर येथील ९४, नांदेड येथील १५७, उस्मानाबाद येथील ५१, परभणी येथील ७५अशा एकुण १ हजार ४५ शाळांमधील सुमारे साडेतीन हजार वर्गखोल्यांचे नवीन बांधकाम या निधीतून करण्यात येणार आहे. मोडकळीस आलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांचे बांधकाम व दुरुस्ती करण्यात येणार असून शासकीय शाळांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. यात पायाभूत सुविधांची उपलब्धता करून देण्याबरोबरच शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अभ्यासक्रमात सुधारणा आणि शिक्षकांचे प्रशिक्षण यावर भर देण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

# सावत्र आईने चिमुकल्याला गरम तव्यावर केले उभे!

**बुलढाणा/प्रतिनिधी**

नऊ वर्षीय चिमुकल्याला सावत्र आईने गरम तव्यावर उभे करून चटके दिल्याची धक्कादायक घटना नांदुरा तालुक्यातील जळका बाजार येथे समोर आली आहे. आर्यन सचिन शिंगोटे असे चिमुकल्याचे नाव आहे त्याला उपचारासाठी अकोला हलवण्यात आले आहे.



आर्यन सचिन शिंगोटे याच्या आईने आत्महत्या केल्याने मुलांचा सांभाळ करण्यासाठी सचिन शिंगोटे ह्याने दुसरे लग्न केले होते. परंतु मुलांचा सांभाळ करण्याऐवजी सावत्र मुलाचा छळ करण्यात येत होता. चार दिवसांपूर्वी आर्यनची सावत्र आई शारदा हिने आर्यनचे हातपाय पकडून त्याला गरम तव्यावर उभे देऊन चटके दिले. त्याने आरडाओरड करू नये म्हणून त्यांचे तोंडही दाबून ठेवण्यात आले होते. तीन दिवसांपासून आर्यन घराच्या बाहेर येत नाही असे दिसल्याने शेजाऱ्यांनी घरात जाऊन बघितल्यावर हा धक्कादायक प्रकार शेजारच्यांच्या लक्षात आला. शेजारच्यांनी त्याला त्वरित खामगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. परंतु प्रकुती चिंताजनक असल्याने त्याला अकोला येथे दाखल करण्यात आले आहे. विशेष म्हणजे आर्यनचे वडील सचिन शिंगोटे हा प्रकार डोळ्याने बघत असूनही त्याने मध्यस्थी केली नाही. याप्रकरणी बोरोखेडी पोलिसांनी नोंद घेतली असून पुढील करवाईसाठी पोलिस पथक अकोला येथे गेले आहे.

## सर्वोत्तम चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने गरजुंना चादर, ब्लँकेट्सचे वाटप

लातूर : येथील सर्वोत्तम चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने कडाक्याच्या थंडीत निवारा अभावी रस्त्यावर उघडे झोपलेल्या गरीब गरजुंना चादर (ब्लँकेट्स) पांघरूण घालून मायेचा उबदार आधार देण्यात आला. लातूर जिल्ह्यात हिवाळा जाणवू लागला आहे. याच थंडीने औराद परिसरात मागील आठवड्यात निवाऱ्या अभावी एकाने थंडीत काकडून आपले प्राण सोडले. सर्वोत्तम टिमने याचा विचार करुन लातूर परिसरातील उड्डाण पुलाखाली, बसस्टँडवर, रस्त्याच्या कडेला, गंजगोलाई परिसरात जे उघड्यावर पडलेले कुटूंब आहेत त्यांना चादर (ब्लँकेट्स) पांघरून घालून मायेचा उबदार आधार दिला. लातूर येथे विविध सामाजिक कार्यात कार्यरत असलेल्या सर्वोत्तम ट्रस्टने सार्वजनीक ठिकाणी निवाऱ्या अभावी राहत असलेल्या गरजूंसाठी मदत केली आहे. या संस्थेच्या वतीने रक्तदान, दिपावली फराळ, कपडे, आर्थिक मदत, बिसलरी पाणी, शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपन अशा विविध सामाजिक कार्यात पुढाकार घेऊन मदत केली जाते.

# वरुड तालुक्यातील ४१ मोर्शी तालुक्यातील ३९ ग्रामपंचायत निवडणूक!

## ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध करण्यासाठी आमदार देवेंद्र भुयार सरसावले

**मोर्शी/प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. वरुड मोर्शी तालुक्यातील बिनविरोध निवडणूक लढविणाऱ्या ग्रामपंचायतींना २५ लक्ष रुपये इतका विकास निधी आमदार देवेंद्र भुयार यांनी देण्याची घोषणा केली आहे. आमदारांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत बक्षिस म्हणून हा निधी देण्यात येणार आहे.

राज्यातील १४ हजार ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून येत्या १५ जानेवारीला वरुड तालुक्यातील ४१ ग्राम पंचायत, मोर्शी तालुक्यातील ३९ ग्रामपंचायत अश्या एकूण तब्बल ८० ग्रामपंचायतींसाठी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यात आचारसंहिताही लागू झाली आहे. कोरोनाच्या संसर्गामुळे गेले ९-१० महिने शेतकऱ्यांसह संपूर्ण ग्रामीण भागातील लोकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच अनेकांना जीवाला मुकावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुका आल्यामुळे प्रथेप्रमाणे गावागावांत भांडणतंटे, ईर्ष्या, चढाओढ पहायला मिळणार आहे. त्यामुळे कोविड विरोधात लढणारे पोलीस, प्रशासन, वैद्यकीय आरोग्य कर्मचाऱ्यांवर फार मोठ्या प्रमाणात ताण वाढणार आहे. हे टाळायचे असेल तर प्रत्येक गावाने आपल्या ग्रामपंचायत निवडणुका बिनविरोध करुन प्रशासनाला सहकार्य करावे, असं आवाहण मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी केले आहे.

ग्रामपंचायती या ग्रामविकासाचा पाया समजल्या जातात, तर ग्रामपंचायत निवडणुकी या लोकशाहीचा पाया समजल्या जातात. आजदेखील राज्यातील विविध गावांमध्ये निवडणुका सोडल्या तर अन्य बाबतीत गट-तट बाजूला ठेवून यात्रा-जत्रा आणि गावाच्या सर्वांगिण विकासाचे उपक्रम राबविले जातात. ग्रामीण भागातील कष्टकरी व शेतकरी वर्गामुळे अजूनही माणुसकी टिकून आहे. तथापि कोणत्याही निवडणुका आल्या की, विशेषत: ग्रामीण भागात ईर्ष्या, चढाओढ, मी मोठा की तू मोठा असे म्हणत निवडणुकांदरम्यान घमासान घडून धुमश्चक्री उडते. प्रसंगी संपूर्ण गावास वेठीस धरले जाते. निवडणुकांमध्ये दुभंगलेली मने पुन्हा कधीही जुळून येत नाहीत. त्यामुळे भावकी गावकीत पिढ्यान्पिढ्या संघर्ष सुरु राहतो. त्यामुळे गावच्या विकासाला मोठ्या प्रमाणावर खीळ बसतेच. परंतू त्यापेक्षाही गावातील निकोप वातावरण गढूळ होते, याची प्रचिती गेली काही दशके संपूर्ण महाराष्ट्र अनुभवतोय. निवडणुका या लोकशाहीचा पाया समजल्या जात असल्या तरी त्या निकोप तसेच स्पर्धात्मक होणे गरजेचे आहे. अलिकडच्या काळातील निवडणुका पाहिल्या तर जवळपास सर्वच गावांत दोन उभे गट पडलेले दिसून येतात. यावर्षीच्या सुरुवातीलाच कोरोना या विषाणुचा संसर्ग संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणावर पसरला. कोरोनाचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी देशासह संपूर्ण राज्यभरात लॉकडाऊन जाहीर करावे लागले. लॉकडाऊन ते अनलॉक या प्रक्रियेमुळे शेतकरी, कष्टकरी वर्ग मेटाकुटीला आलेला आहे.

इच्छा असूनही काही प्रमाणात का होईना कोरोनाच्या सुरु असलेल्या काळात जनतेवर मोठ्या प्रमाणावर बंधने आली. त्यामुळे ग्रामीण भागातील जनता मोठ्या आर्थिक विवंचनेत आहे. अशा परिस्थितीत वरुड मोर्शी तालुक्यातील ८० ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम प्रशासनाने जाहीर केला आहे. ग्रामपंचायत निवडणुका गावपातळीवर असल्याने त्याच्या धुरळा गावातील प्रत्येक घरात उडणार आहेत. आधीच कोरोनाचा संसर्ग, त्यात निवडणुकांचा विसर्ग. त्यामुळे गावांत कोरोना संसर्गाची भीतीही मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. त्या अनुषंगाने हेवे-दावे विरहित, ग्रामस्थांच्या वैचारिक



सहकार्यातून बिनविरोध निवडणुका झाल्यास त्याचे चांगले दूरगामी परिणाम दिसणार आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गावच्या एकीद्वारे घेण्यात आलेल्या निवडणुका म्हणजे गाव करील, ते राव काय करील' ही म्हण सार्थ ठरविण्याऱ्या या निवडणुका संपूर्ण देशाला नवी दिशा देणा-या ठरतील. त्यामुळे हेवेदावे विरहित बिनविरोध निवडणुका कराव्यात, असे आवाहन आमदार देवेंद्र भुयार यांनी केले आहे. त्यामुळे हेवे-दावे विरहित, बिनविरोध निवडणुका विविध गावांतील ग्रामस्थांनी केल्या तर त्यागावांना स्थानिक विकास निधीमधून २५ लक्ष रुपये विकासात्मक निधी उपलब्ध करुन देणार असल्याचे आमदार देवेंद्र भुयार यांनी सांगितले.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण; वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद



वाडाः वाडा तालुक्यातील तिळगाव येथील अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची घटना घडली असून वाडा पोलीस ठाण्यात गुन्हाची नोंद करण्यात आला आहे. तिळगाव येथील पूजा नामदेव बेंडकोळी (वय १७) या अल्पवयीन मुलीचे रात्री घरी झोपली असताना असताना तिचे अपहरण केल्याची घटना घडली असून वाडा पोलीस ठाण्यात २७५/२०२० भादवीस कलम ३६३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील हे करत असून कोणाला याबाबत अधिक माहिती मिळाल्यास ७७७६०००५२४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन वाडा पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोकणातील पर्यटनाला व्यापक चालना देणार -आदित्य ठाकरे

**मुंबई/प्रतिनिधी**



कोकणातील पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी बीच शॅक धोरणाला मंजुरी देण्यात आली आहे. कोकणात पंचतारांकित हॉटेल्स गुंतवणूक करित आहेत. यापुढील काळातही कोकणाच्या पर्यटन विकासासाठी विविध क्षेत्रांच्या अनुषंगाने व्यापक कार्य केले जाईल, असे पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी यावेळी सांगितले. कोकणातील पर्यटनाला चालना देण्यासाठी विविध उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा सिंधुदूर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार विनायक राऊत, आमदार दीपक केसरकर, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर-सिंह, एमटीडीसी'चे व्यवस्थापकीय संचालक आशुतोष सलील, पर्यटन संचालक धनंजय सावळकर उपस्थित होते. आमदार योगेश कदम, रत्नागिरी व सिंधुदूर्गचे जिल्हाधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे म्हणाले की, कोकणात बीच शॅक टुरीजम, टेंट टुरीजम, कॅराव्हॅन टुरीजम यासह कृषी पर्यटनालाही मोठ्या प्रमाणात वाव आहे. होम स्टेच्या माध्यमातून येथे लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळू शकतो. येथील पर्यटनाला चालना देण्यासाठी मुंबईपासून गोव्यापर्यंतच्या विविध पर्यटन ठिकाणांच्या विकासाचा आराखडा करुन त्याला चालना देण्यात येईल. यासंदर्भात वेळोवेळी आढावा बैठक घेऊन कोकणाचा पर्यटन विकास व त्या माध्यमातून रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देऊ, असेही आदित्य ठाकरे यांनी सांगितले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. उदय सामंत म्हणाले की, कोकणातील साने गुरुजी यांचे स्मारक, कविवर्य मंगेश पाडगावकर यांचे स्मारक आदी कामांना मंजुरी देऊन त्यास गती देण्यात यावी. त्याचबरोबर कोकणासह राज्यातील किल्ल्यांच्या विकासाला चालना देण्यात यावी. दुबईच्या धर्तीवर कोकणामध्ये ग्लोबल व्हिलेजसारखा पर्यटन उपक्रम राबविता येऊ शकेल, असे त्यांनी सांगितले.

**औरंगाबादच्या पर्यटन विकासालाही मिळणार चालना**

औरंगाबाद शहर आणि जिल्ह्यातील विविध पर्यटनस्थळांच्या विकाससंदर्भातही पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक झाली. या बैठकीस महसूल आणि ग्रामविकास विभागाचे राज्यमंत्री अब्दुल सत्तार, आमदार अंबादास दानवे, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर-सिंह, एमटीडीसी'चे व्यवस्थापकीय संचालक आशुतोष सलील, पर्यटन संचालक धनंजय सावळकर उपस्थित होते. औरंगाबाद जिल्हाधिकारी ऑनलाईन सहभागी झाले होते. जिल्ह्यातील सर्व पर्यटनस्थळांना जोडणारे रस्त्यांचे जाळे मजबूत असावे. सर्व रस्ते दर्जेदार कसे होतील यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना श्री. ठाकरे यांनी यावेळी दिल्या. पर्यटकांसाठी शहरात सुरु करावयाच्या हॉप ऑन, हॉप ऑफ वाहतूक व्यवस्थेचाही यावेळी आढावा घेण्यात आला. राज्यमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले की, औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा आणि वेरुळ ही दोन्ही जागतिक स्तरावरील पर्यटनस्थळे आहेत. औरंगाबाद-फर्दापूर-अजिंठा लेणी यासह जिल्ह्यातील सर्व पर्यटनस्थळांना जोडणाऱ्या रस्त्यांचा दर्जेदार विकास होणे आवश्यक आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद आदी संबंधीत यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. सोयगांव तालुक्यातील फर्दापूर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याचा मानस असून शिवरायांच्या कार्यातून युवा पिढीला प्रेरणा मिळत रहावी यासाठी हे स्मारक महत्वपूर्ण ठरणार आहे.

यासाठी चालना देण्यात यावी. जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा अधिक विकास होणे, त्याचबरोबर त्यांची प्रचार-प्रसिद्धी होऊन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी एमटीडीसी आणि पर्यटन विभागामार्फत चालना देण्यात यावी, असे निर्देशही सत्तार यांनी यावेळी दिले.

## टाकळी येथे ऑनलाईन मटक्यावर धाड चार लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील टाकळी येथे सोलापूर पोलीस अधीक्षक पथकाने ऑनलाईन मटका जुगारावर धाड टाकून ११ जणांकडून ४ लाख १३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. टाकळी येथील गोपाळ मदुरे यांच्या शेतात पत्राशेडमध्ये काहीजण मोबाईलवर कल्याण नाईट नावाचा मटका जुगार खेळत आहेत अशी गोपनीय माहिती मिळाल्याने पोलीस अधीक्षक च्या विशेष पथकाने तेथे धाड टाकला. त्यावेळी ११ जणांना जागीच पकडले आहे. त्याची चौकशी केली असता त्यांनी मोबाईलवर मटका घेऊन गुगल पे वरून रुपये घेत असल्याचे सांगितले. त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम वेगवेगळ्या कंपन्यांचे मोबाईल फोन, मोटारसायकली, लेसर प्रिंटर, दहा वह्या, पाच रजिस्टर असा एकूण ४ लाख १३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक पथकातील पोलीस कर्मचारी दत्तात्रय राजेंद्र झिरपे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सतीश गोपाळ मदुरे (वय २९), लक्ष्मण रामचंद्र झेंडेकर (वय ३०) लक्ष्मण आळप्पा केरूर (वय २९), तम्माराय बंडप्पा कुंभार (वय २८), विनायक गोवर्धन झेंडेकर (वय १८), सुनील सिद्राम झेंडेकर (वय १८), नागनाथ बसवराज कुंभार (वय २४), सिद्राम मनोहर मदुरे (वय ३५), परशुराम रामगोंडा कोळी (वय ३५), जटेप्पा चिदानंद कोळी (वय ३८), संतोष गोपाळ मदुरे (वय ३० रा.सर्वजण टाकळी ता दक्षिण सोलापूर जि. सोलापूर) या ११ जणांवर मंद्रुप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, ही कारवाई सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक पथकाचे पोलीस निरीक्षक विजय बहिर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस कर्मचारी मदने, भुईटे व हेमाडे यांनी केली आहे.

## पान १ वरून....

### दुसऱ्या लग्नाचा प्लान भावोजीने ...

दुर्दैवाचा एक फेरा आला. गेल्या सहा ते सात महिन्यापुर्वी राजु त्याची पत्नी विमलबाई व रोशन नावाचा मुलगा असे तिघेजण दुचाकीने ट्रिपलसिट वाशीम येथे जात होते. त्याची इतर दोन मुले त्यावेळी घरीच होती. वाशीम येथे दुचाकीने ट्रिपल सिट जात असतांना अचानक त्याच्या वाहनाचा अपघात झाला. या रस्ता अपघातात राजूची पत्नी विमलबाई व मुलगा रोशन असे दोघे जण मयत झाले. काही क्षणात होत्याचे नव्हते झाले होते. या रस्ता अपघातात राजूची पत्नी व मुलगा असे दोघे जण काळाच्या पडद्याआड गेले, मात्र राजू सुदैवाने बचावला होता. त्याची अर्धांगीनी विमलबाई व मुलगा रोशनच्या अपघाती निधनामुळे राजूवर मोठे आभाळ कोसळले होते. मात्र हे दुख: पचवण्याची शक्ती देखील त्याच्याकडे होती. अपघाताच्या वेळी राजूची इतर दोन मुले घरी असल्यामुळे ती बचावली होती. मात्र त्या मुलांना आईचे प्रेम मिळणे आता कठीण होते. तसेच त्यांची देखभाल करणारी त्यांची आई या जगात नव्हती. त्यामुळे त्यांची देखभाल व्यवस्थीत होणे गरजेचे होते. त्यामुळे त्याची दोन्ही मुले मामाच्या घरी अर्थात सुनिल रामेश्वर गायकवाड याच्याकडे नांदुरा येथे राहण्यास गेली. त्या दोन्ही मुलांचा सांभाळ सुनिल गायकवाड करु लागला. या अपघाती घटनेनंतर राजू मिरटकर काही प्रमाणात सावरला. त्याचे वय २८ वर्ष होते. तो एकदम तरुण होता. त्याच्या पुढे अजून बरेच आयुष्य पडलेले होते. त्यामुळे त्याने दुसरा विवाह करण्याचे मनाशी ठरवले. त्याची दोन्ही मुले मामाच्या गावी रहात असल्यामुळे तो एकटाच होता. तसे बघता शालकाकडे राहणा-या दोन्ही मुलांकडे त्याचे एक प्रकारे दुर्लक्षच झाले होते. मोताळा येथे तो एकटा रहात असल्यामुळे आता आपल्याला एका अर्धांगीनीची गरज असल्याची जाणीव त्याला होत असे. त्या दृष्टीने तो मुलगी बघण्याच्या कामाला लागला होता.

आपली बहिण व एक भाचा यांचे निधन झाल्यानंतर दोन्ही भाचांचा सांभाळ करणा-या सुनिल गायकवाड यास मेहुणा राजु मिरटकर दुसरे लग्न करण्याच्या विचारात असल्याची माहिती समजली. सुनिलची बहिण विमलबाई व तिच्या एका मुलाचे अपघाती निधन झाल्यानंतर अजून काही महिनेच झाले होते. त्यांच्या निधनाला अजुन वर्ष देखील पुर्णपणे उलटले नव्हते. अशा परिस्थितीत राजु दुसरे लग्न करणार असल्याचे समजताच शालक सुनिल गायकवाड याला राजुच्या वागण्याबद्दल शंका येवू लागली.

दुसरे लग्न करण्यासाठीच राजुने आपल्या बहिणीला व भाचाला जिवे ठार केले असा त्याला संशय येवू लागला. या संशयातून तो बेचैन राहू लागला. आपल्या बहिणीला व भाचाला राजूने हेतू पुरस्सर अपघाती ठार केले असा मनोमन संशय सुनिल घेवू लागला. या संशयाला दुसरे कारण म्हणजे सुनिलकडे राहणाऱ्या त्याच्या दोन्ही मुलांकडे तो अजिबात लक्ष देत नव्हता. त्यामुळे सुनिलचा राजूवरील संशय गडद झाला होता. त्याने त्याच्या मनातील संशय त्याचा मावसभाऊ रमेश रामदास पवार यास बोलून दाखवला. रमेश रामदास पवार हा भुसावळ तालुक्यातील कंडारी येथे रहात होता. दोघे मावसभाऊ एकत्र आल्यावर त्यांनी संशयातून राजू मिरटकर याचा कायमचा काटा काढण्याचे अर्थात त्याला जिवनातून बाद करण्याचे विचार सुरु केले. आपले दोन्ही शालक सुनील गायकवाड आणि रमेश पवार आपल्या जीवावर उठणार आहेत याची राजू यास अजिबात कल्पना नव्हती. तो आपल्या दुसऱ्या लग्नाच्या तयारीने कामाला लागला होता. इकडे त्याचे दोन्ही शालक सुनिल व रमेश त्याला संपवण्याच्या तयारीने कामाला लागले होते. दोघांनी त्याच्या खूनाचा कट रचण्यास सुरुवात देखील केली होती. राजूची बहिण भुसावळ येथील यावल नाका परिसरात रहाते. राजू एकटा असल्यामुळे तो गेल्या दोन महिन्यापासून त्याच्या भुसावळ येथील बहिणीकडे राहण्यास आला होता. राजूचा मावस शालक रमेश पवार भुसावळ तालुक्यातील कंडारी येथे रहात होता. राजू भुसावळ येथे त्याच्या बहिणीकडे रहात असल्याचे रमेश पवार यास समजले होते. सुनिल व रमेश या दोघा मावसभावांनी राजूच्या हत्येचा कट रचला होता. त्या कटाचा भाग म्हणून रमेश हा राजुच्या बहिणीकडे त्याला भेटण्यासाठी आला. रमेशने राजूला म्हटले की तुझ्या पत्नीच्या अपघाताचे पैसे गावी मोताळा येथे आले आहेत. आपल्याला कागदपत्रांवर सह्या करण्यासाठी मोटार सायकलने मोताळा येथे जायचे आहे. अशाप्रकारे पैसे घेण्याचा बहाणा करत रमेशने राजुला मोटार सायकलवर बसवून मोताळा येथे येण्यास भाग पाडले. रमेशच्या मोटारसायकलवर राजु डबलसीट बसला. दोघे जण मोताळा येथे जाण्यासाठी निघाले. अगोदरच नियोजन केल्यानुसार रमेशने राजू यास वाटेत नांदुरा येथे सुनिलच्या घरी नेले. आपण पत्नीच्या नावे असलेले पैसे घेण्यास जात नसून साक्षात मृत्यूच्या दाराशी यमाकडे जात असल्याचे राजूला माहीत देखील नव्हते. त्याला अंधारात ठेवण्यात आले होते. वाटेत नांदुरा येथे सुनिलच्या घरी ९ ऑक्टोबर रोजी गेल्यावर तिघांनी काहीवेळ गप्पाटप्पा केल्या. त्यानंतर पाटे वरवंटे तयार करण्याच्या जागी निर्जन ठिकाणी त्याला नेण्यात आले. तेथे गोड बोलून त्याला दारु पाजण्यात आली. दारुचा अर्थात मद्याचा अंमल राजुवर होण्यास वेळ लागला नाही. राजुवर मद्याचा अंमल सुरु झाल्यानंतर सुनिल व रमेश या दोघा मावस भावांनी त्याला जळगाव जामोद नजीक भेंडवळ गाव शिवारात नेले. त्याठीकाणी दोघांनी त्याला लोखंडी सांडशीने मारहाण सुरु केली. याशिवाय दोघा मावस भावांनी त्याला लाथा बुक्क्यांनी देखील बेदम मारहाण केली. या मारहाणीत राजुने आपला जिव सोडला. राजु जिवानिशी गेल्याचे लक्षात आल्यावर दोघा मावस भावांनी राजुला भेंडवळ गावाच्या जंगलात बेवारस सोडून देत पलायन केले. काही दिवसांनी राजुचा बेवारस मृतदेह कुजण्यास सुरुवात झाली. त्याच्या मृतदेहाचे लचके पशु पक्षांनी तोडण्यास सुरुवात केली होती. हळूहळू त्याच्या मृतदेहाची हाडे व कवटी शिल्लक राहिली. या सर्व घटनाक्रमानंतर रमेश आपल्या गावी भुसावळ (कंडारी) येथे परत आला मात्र राजु परत आलाच नाही. त्यामुळे यावल नाका परिसरात राहणारी राजूची बहिण सुनिता पवार हिने राजु कुठे आहे? अशी रमेशला विचारणा केली. त्यावर त्याने सुनीता हिस उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. रमेशच्या उत्तराने सुनिताचे समाधान झाले नाही. त्यामुळे तिने काही नातेवाईकांना सोबत घेत मोताळा गाठले. तेथील बोराखेडी पोलिस स्टेशनला त्यांनी रमेश विरुद्ध भा.द.वि. ३६५ (अपहरण) प्रमाणे राजुच्या अपहरणाबाबत तक्रार दाखल केली. रमेश याने राजुला भुसावळ शहर पोलिस स्टेशन हद्दीतून नेले होते. त्यामुळे बोराखेडी पोलिसांनी तो गुन्हा भुसावळ शहर पोलिसांकडे वर्ग केला. भुसावळ शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक बाबासाहेब ठोंबे यांनी या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक संदिप दुनगहू यांच्याकडे सोपवला. स.पो.नि. संदिप दुनगहू यांनी आपले सहकारी समाधान पाटील यांच्या मदतीने या तपासाला सुरुवात केली. तपासाचा भाग म्हणून बुलढाणा जिल्हा नियंत्रण कक्षाकडे या कालावधीत दाखल दाखल झालेल्या अकस्मात मृत्यूबाबत चौकशी करण्यात आली. दरम्यान ३१ ऑक्टोबर रोजी भेंडवळ गावाच्या जंगलात एका बेवारस मृतदेहाच्या हाडांचा सापळा जळगाव जामोद पोलिसांना मिळून आला होता. या प्रकरणी जळगाव जामोद पोलिस स्टेशनला ६७/२० या क्रमांकाने अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली होती. या अकस्मात मृत्यूमधील मृतदेहाचा हाडांचा सांगाडा तेवढा शिल्लक राहिला होता. त्यामुळे या सांगाड्याची ओळख पटणे कठीण झाले होते. या अकस्मात मृत्यूचा तपास पोलिस उप निरिक्षक रमेश धामोळे करत होते. या अकस्मात मृत्यूच्या मिळालेल्या माहितीनुसार भुसावळ शहर पोलिस स्टेशनचे स.पो.नि. संदिप दुनगहू यांनी तेथील तपास यादी तपासकामी मागवून घेतली. त्या तपास यादीवरील फोटो राजुची बहिण सुनीता पवार व तिच्या भावांना दाखवण्यात आला. तपास यादीवरील मयताच्या हाडांचा सांगाडा असलेला फोटो सुनीता पवार हिने तो फोटो तिचा भाऊ राजु मिरटकर याचा असल्याचे ओळखले. त्यामुळे सुनिता पवार हिच्यासह तिच्या नातेवाईकांना तपासकामी जळगाव जामोद येथे नेण्यात आले. मयताचे कपडे व इतर वस्तू त्यांना दाखवण्यात आले. ते कपडे त्यांनी राजुचे असल्याचे ओळखले. अशा प्रकारे मयताचा सापळा व फोटो हा राजु मिरटकर याचा असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर संशयीत म्हणून कंडारी येथील रमेश पवार यास अटक करण्यात आली. त्याला पोलिसी खाक्या दाखवला असता त्याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या रमेश पवार याची बहिण विमलबाईचे लग्न राजु मिरटकर याचे सोबत झाले होते. रस्ता अपघातात त्याच्या सोबत मोटारसायकलवर विमलबाई व एक मुलगा रोशन यांचे निधन झाले होते. मात्र राजु बचावला होता. राजुने हेतू पुरस्सर पत्नी विमलबाई व मुलगा रोशन यांना ठार केले असल्याचा रमेश यास संशय होता. शिवाय रमेश त्याच्या दोन्ही मुलांचा सांभाळ करत होता. त्या दोन्ही मुलांकडे राजु अजिबात लक्ष देत नव्हता. तसेच तो दुसऱ्या लग्नाचा विचार व त्या दृष्टीने नियोजन करत होता. दुसरे लग्न करण्यासाठीच त्याने आपली बहिण विमलबाई व भाचा रोशन यांना रस्ता अपघातात ठार केले असल्याचा संशय रमेश यास होता. त्यामुळे त्याने त्याचा मावसभाऊ सुनिल गायकवाड याच्या मदतीने राजुला ठार केल्याचे कबुल केले.

पोलिस चौकशीत व तपासात रमेशने त्याचा मावसभाऊ सुनिल गायकवाड याचे नाव पुढे आणले. त्यामुळे त्याला देखील ताब्यात घेत अटक करण्यात आली. त्याने देखील आपला गुन्हा कबुल केला. ९ ऑक्टोबर रोजी सदर घटना बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद शिवारातील भेंडवळ गावाच्या जंगलात घडली होती. त्यानंतर ३१ ऑक्टोबर रोजी राजुच्या मृतदेहाचा सांगाडा आढळून आल्यामुळे अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. २० नोव्हेंबर रोजी भुसावळ शहर पोलिस स्टेशनला दाखल झालेल्या या गुन्ह्याचा पुढील तपास पो.नि. बाबासाहेब ठोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. संदिप दुनगहू व त्यांचे सहकारी समाधान पाटील यांनी सुरु केला. सुरुवातीला या गुन्ह्यात रमेश पवार याच्या विरुद्ध बोराखेडी पोलिस स्टेशनला भा.द.वि.३६५ (अपहरण) नुसार गुन्हा दाखल होता. त्यानंतर तपासात झालेल्या प्रगतीनुसार रमेश पवार आणि सुनिल गायकवाड यांच्याविरुद्ध भा.द.वि.३०२ (खून), १२० (ब) (कट रचणे), ३६४ (जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने अपहरण) अशी कलमे वाढवण्यात आली. या गुन्ह्याचा तपास पो.नि. बाबासाहेब ठोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.संदिप दुनगहु व पो.कॉ.समाधान पाटील यांनी पुर्ण केला. तपासकामी हवालदार मोहम्मद अली सैय्यद, पो.कॉ. मोहन पाटील, जितू सोनवणे यांचे सहकार्य लाभले. सध्या या गुन्ह्याचा तपास जळगाव जामोद (जिल्हा बुलढाणा) यांचेकडे वर्ग करण्यात आला असून तपास पोलिस उप निरिक्षक रमेश धामोळे करत आहेत.

### विवाहित महिलेवर दोघांचे जीव ...

विवाहित महिलेशी विवाहबाहय संबंध होते.तो तिला चोरून भेटत होता. वनिता ही दिसायला सुंदर देखणी होती. तिचा नवरा गावातील प्रतिष्ठीत होता. सुरूवातीला सचिनने वनिताशी त्याचे असलेले संबंध इतरापासून लपवून ठेवले होते.परंतु असे संबंध कितीही झाकले तरी ते एक ना एक दिवस या ना त्या कारणाने उघड होतात आणि त्यावेळी त्याचा बोभाटा होत असतो हे खरे असल्याने बऱ्याच वेळेला अशा संबंधात अडकलेले विवाहित जोडपी असे संबंध झाकून ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. तसेच सचिनने आणि वनिताने ही केले होते. सचिनने वनिताशी त्याचे असलेल्या संबंधाची वाच्यता गणेशकडे कधीच केलेली नव्हती. त्याला त्याचा स्वभाव होता. तो मोकळ्या स्वभावाचा, बोलघेवडा असल्याने त्याच्या तोंडात कोणतीच गोष्ट राहत नाही याची त्याला कल्पना होती. म्हणून त्याने ही गोष्ट गणेशपासून लपवून ठेवली होती. परंतु एकदा तो सहजच सचिनच्या घरी गेला होता.त्याच्या घरचा दरवाजा बाहेरून फक्त लावलेला होता. सचिन घरी एकटाच होता. आतून कोणताही आवाज येत नसल्याने तो सचिनला हाका मारू लागला होता. दार तर पुढे केले होते. बाहेर सचिनचे चप्पल आणि एक लेडिज चप्पल दिसत होते. तो आवाक झाला होता.कारण सचिनचे तरी अजून लग्न झाले नव्हते. मग हे लेडिजचे चप्पल कुणाचे असा प्रश्न त्याला पडला. आतील बेडरूममध्ये त्याने बघितले तर सचिनच्या बेडरूममधून उसासे घेत असल्याचा एका महिलेचा आवाज त्याच्या कानावर पडू लागला. तो कान टवकारून आत बघू लागला तर एक महिला आणि सचिन त्या कामात मग्न होते. ते दोघे ही पूर्ण नग्न होते. सचिनच्या उरावर बसुन ती झोके घेत होते. मागेपुढे करत होती. तर सचिनने तिची कंबर घट्ट आवळुन धरले होते. त्या दोघांचा तो कार्यक्रम ऐन रंगात आला होता. त्यावेळी नेमका गणेश हाका मारत आत आला होता. त्याच्या हाका मारण्याने ते दोघे भानावर आला होते. त्यावेळी त्या दोघांनी कसा बसा आपला कार्यक्रम आवरता घेतला. तो पर्यत गणेश बाहेरच उभा होता. काही वेळाने ती महिला कपडे घालून बाहेर पडत असताना गणेशने तिला ओळखले होते. ती गावातीलच वनिता होती. ही आपल्या मित्राला चिकटली असल्याचे बघून त्याला ही आश्चर्य वाटले.कारण गावात वनिता ही चालू असल्याचे बोलले जात होते. तिच्या लग्नाला बरीच वर्ष झाली तरी तिला अद्याप मुलबाळ झालेले नव्हते. तिचा नवरा हा साधा सरळ आणि प्रामाणिक होता. तिचे कुंटूंब म्हणजे गावातील एक प्रतिष्ठीत कुंटूंब म्हणून ओळखले जात होते. तिचा कमसीन आणि सेक्सी बांधा बघून गावातील अनेक तरूण तिच्यामागे लाळ घोळीत होती. तशी ती सचिनला लागली असल्याने ती त्याला चोरून भेटायला येत होती, त्याच्याकडून आपली कामवासना भागवून घेत होती. तिला ही तिच्या नवऱ्याकडून जे मिळत नव्हते. ते तिला सचिनकडून मिळत होते. म्हणूनच ती त्याला चिकटलेली होती. ती गेल्यानंतर सचिन बाहेर आला होता. त्यावेळी त्या दोघांच्या गप्पा झाल्या, त्यानंतर ते दोघे नेहमीप्रमाणे एका बारला जावून बसले.तेथे त्यांनी मनसोक्त दारू ढोसली होती. गणेशला ही त्या कामासाठी वनिता पाहिजे असल्याने काही दिवसांनी तो सचिनच्या मागे लागला की मला ही एकदा ती त्या कामासाठी पाहिजे, तु माझी भेट तिच्याशी करून दे. म्हणून मागे लागला होता. परंतू सचिनला ती लागली असल्याने तिला तो आपल्या मित्राबरोबर कसे काय शेअर करू शकणार होता. ती काही त्याची खाजगी प्रॉप्रटी नव्हती. त्यातूनच दिवसामागून दिवस जात होते. गणेशला मात्र ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो सचिनच्या मागे लागला होता. हल्ली तर गणेश दारूच्या नशेत सचिनला त्या दोघांचे संबंध उघड करण्याची जाहिर करण्याची धमकीच देत होता. त्याच्या या धमकीला सचिन वैतागलेला होता. जवळचा मित्रच घात करायला निघाला होता. त्याने जर हे संबंध उघड केले तर वनिताची आणि तिच्या नवऱ्याची गावातील इज्जत जाणार होती. शिवाय बदनामी होणार ती वेगळीच, त्यामुळे सचिन घाबरलेला होता. त्याला काय करावे काय नको ते सुचत नव्हते. त्याने गणेशला याबाबत बऱ्याच वेळेला समाजावून सांगण्याचा प्रयत्न केला होता. पण तो काही त्याचे काही ऐक ऐकायला तयार नव्हता. गणेश हा सचिनला वारंवार त्याचे नाजूक संबंध उघड करण्याची धमकी देवू लागला होता. सचिनने गणेशच्या माघारी एक वेगळीच योजना आखली होती.त्याला आपल्या मार्गातून कायमचे गणेशला बाजुला करायचे होते. म्हणून त्याने आपला दुसरा मित्र पप्पू बुट्टे याला गणेशच्या बाबात सांगून गणेशला आपल्या मार्गातून बाजुला करायचे आहे त्यासाठी तू मदत कर, असे सांगितले. त्यावर पप्पू ही तयार झाला होता. त्यानंतर त्या दोघांनी ही एक प्लॅन केला. दि.५ ऑक्टोंबर २०१९ रोजी सचिनने गणेशला फोन लावून तुला वनिताची भेट घालून देतो असे सांगून आपल्या घरी बोलावून घेतले. वनिताला भेटण्याच्या आणि उपभोगण्याच्या हेतून गणेशही त्यावेळी सचिनच्या घरी गेला होता. त्यावेळी त्याच्या घरात सचिन आणि पप्पू हे दोघेच होते. गणेशने सचिनला ती कुठे आहे असे विचारले,तर तो त्याला म्हणाला तू बस.ती येईल म्हणत त्याला बसवून घेतले.त्यावेळी ती येईपर्यत त्या तिघांनी दारूचा एक एक पेग रिचवला.बराच उशिर झाला तरी ती येईना म्हणून गणेशच्या जीवाची घालमेल वाढली होती.तो सारखा सचिनला विचारू लागला होता.त्यातूनच ती येईना म्हणून गणेश सचिन बरोबर भांडण करून परत त्या दोघांचे ते संबंध आता उघडच करतो आणि तुमची बदनामी करतो अशी धमकी देवू लागला,त्यावेळी सचिनला या गोष्टीचा राग आला.त्या रागाच्या भरात सचिनने आणि पप्पुने गणेशवर धारदार शस्त्राने वार केला.त्यासरशी गणेश हा रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर पडला.परत त्या दोघांनी त्याच्यावर धारदार शस्त्राने वार केला.आणि त्याच्या गळ्याभोवती दोरीचा फास टाकून तो फास आवळला.त्यासरशी गणेश हा तडफडतच जागीच गतप्राण झाला.तो मेल्याची खात्री झाल्यावर त्या दोघांनी त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे ठरवले.त्यांनी लगेच रातोरात त्याचा मृतदेह अमंळनेर येथे ते राहत असलेल्या गावातील एकाच्या शेतात खड्डा काढून पुरून टाकला. त्या दिवशी घराबाहेर गेलेला गणेश हा लवकर परत आला नसल्याने त्याच्या घरच्या लोकांनी त्याचा शोध सुरू केला होता.पण तो कुठेच मिळून येत नसल्याने. त्याच्या घरच्या लोकांनी गणेश दामोदर मिसाळ (वय २९) रा.अमंळनेर हा बेपत्ता असल्याची तक्रार गंगापूर पोलीस स्टेशनला ८ ऑक्टोंबर २०२९ रोजी नोंदवली होती. तेव्हापासून या घटनेचा तपास गंगापूर पोलीस करत होते. परंतु त्याच्या हाताला मात्र काहींच लागत नव्हते. बेपत्ता गणेशच्या मोबाईल कॉलचे लोकेशन देखील पोलीस तपासत होते. तसेच त्याच्या जवळच्या मित्राकडे ही त्याची चौकशी करत होते. तो बेपत्ता होऊन चौदा महिने झाले तरी पोलीसाना काहीच सुगावा लागत नव्हता. तर इकडे सचिन आता वनिताचा बिनधास्त उपभोग घेऊ लागला होता.त्याने व त्याच्या मित्राने केलेले गणेश काम तमाम झाल्याचे त्यांना वाटत होते. वर्ष उलटून गेल्यानंतर आता आपल्यावर कोणतेच बालंट येणार नाही असे सचिनला वाटत असताना अचानक १२ डिसेंबर २०२० रोजी गंगापूर पोलीसांना एका खबऱ्याने गणेशच्या बेपत्ता होण्याची माहिती देऊन गणेशचा खून करून त्याचा मृतदेह पुरून टाकल्याचे पोलीसांना दिली. आणि यातील संशयीत सचिन पंडित आणि पप्पू बुट्टे यांची नावे दिली होती. पोलीसांनी मिळालेल्या माहितीवरून लगेचच कारवाई करत सचिन पंडित आणि पप्पु बुट्टे यांना ताब्यात घेऊन त्याच्याकडे या गणेशच्या बेपत्ता होण्याची चौकशी करू लागल्यावर त्यांनी पोलीसांना खरी माहिती माहिती देवून गणेश मिसाळ याचा खून केल्याची माहिती देवून त्याचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या हेतून अमंळनेर येथील एका शेत शिवारात पुरला असल्याची माहिती दिली. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी अमंळनेर येथील पाडुरंग गाडे याच्या शेत शिवारातील जमीनीत खड्डा काढून पुरलेला गणेश याचा मृतदेह जेसीबीच्या साहाय्याने उकरून बाहेर काढला. तो फक्त सापळाच होता.पोलीसांनी त्याचा पंचनामा करून पुढील कारवाईसाठी रासायनिक प्रयोग शाळेत पाठवून दिला. गणेश दामोदर मिसाळ (वय २९ रा.अमंळनेर) याच्या खून प्रकरणी त्याचा मित्र सचिन ज्ञानेश्वर पंडित (वय २५) पप्पू ऊर्फ रविंद्र कारभारी बुट्टे (वय २२)रा.दोघे ही अमंळनेर याच्या विरोधात भा..दं.वी.कलम ३०२,२०१,३६४,३६५(१२०ब) या कलमाअन्वये गुन्हा दाखल करून त्या दोघांना मा.कोर्टासमोर उभे केले असता.मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेचा तपास गंगापूर पोलीस स्टेशनचे पो.निरी.मच्छिंद्र सुरवसे, स.पो.नी.प्रल्हाद मुंढे, पो.हे.कॉ.कैलास निभोरंकर, विजय भिल्ल, पो.ना.संदीप डमाळे, गणेश खंडागळे, सोमनाथ मुरकुटे, लक्ष्मण पुणी, मनोज बेडवाल, गणेश लिमणे, दतात्रय गुंजाळ यांनी केला. गुन्हेगार कितीही चालाख असले तरी पोलीस त्यांच्या पुढे दोन पावले असतात. त्यातून त्यांनी केलेले कृत्य लपत नसते.ते एक ना एक दिवस उघडकीस येतेच शिवाय विवाह बाहयसंबंध ही कितीही झाकले तरी ते एक ना एक दिवस उघडकीस येतात.आणि त्यातून खूनासारखी अघटित अशी घटना घडते.हेच यावरून दिसून येते.

### शुल्लक वाद विकोपाला गेला...

सातारा शहरात मंगळवार पेठेत आकाश बल्लाळ हा भाडयाने घर घेऊन राहत होता. त्याच्या शेजारीच बजरंग गावडे हा ही स्वत:च्या घरात राहयला होता. दोघेही शेजारी शेजारी राहत असल्याने तसे त्याचे संबंध चांगले नव्हते. त्या दोघांच्या कुंटूबात नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडणे ही होत होती. शेजार जर भांडखोर असेल तर शेजारी शेजारी राहणाऱ्या कुंटूंबात वाद आणि मारामारी ही होत असते. त्याप्रमाणे त्या दोघांच्या कुंटूंबात झाले होते. ते दोघे राहत असलेल्या ठिकाणी रस्ता ही लहान होता.त्यातूनच त्या दोघांच्या घरासमोरून कॉमन अशी गटार होती. वरच्या आळी पासून त्या गटारीत पाणी येत होते.प्रत्येक जण आपल्या घरासमोरील घाण, खरकाटे पाणी त्या गटारीत ओतत होते. नगरपालिकेचे कर्मचारी ती गटार वेळच्या वेळी साफ करत होते. परंतू दिवसभर पुन्हा त्या गटारीत कचरा पडत होता. आकाश बल्लाळ याच्या घराच्या वरच्या बाजूला बजरंग गावडे राहत असल्याने त्यांनी गटारीत टाकलेली गहाण, कचरा आकाश याच्या घरासमोर येऊन राहत होते. तसेच बजरंग गावडे याचा पशुपालनचा व्यवसाय होता. तसेच चिकनचा ही तो धंदा करत होता. कधी कधी चिकनचे खरकटे तो या गटारीत टाकत होता. या कारणातून त्या दोन्ही कुंटूंबात सारखे भांडण,मारामारी होत होती. त्याचा हा वाद बऱ्याच वेळेला पोलीस स्टेशन पर्यत गेला होता. आकाशला या गोष्टीचा राग येत होता. त्यातच आकाश याची ओळख आणि मैत्री ही सराईत गुन्हेगारी लोकांशी होती. तो बजरंग याला त्या लोकांच्या जीवावर धमकी देत होता. दोघेही सख्ये शेजारी, मात्र त्या दोघांत विस्तव ही जात नव्हता. साध्या किरकोळ वादातून ते दोघे ही एकमेकांकडे खून्नशी नजरेने बघत होते. त्यातच गेल्या वर्षभरापूर्वी आकाश बल्लाळ याच्या घरासमोर बजरंग गावडे याने चिकनचे खरकटे टाकले या कारणातून त्याच्यात मारामारी झाली होती. खरे तर बजरंग यांनी चिकनचे खरकटे हे गटारीत टाकले होते. ते पुढे आकाश बल्लाळ याच्या घरासमोरील दरवाज्यातील गटारीत येऊन अडकले होते. बजरंग गावडे हे त्या गल्लीत स्थानिक असल्याने व त्याचे स्वतःचे घर असल्याने आणि आकाश हा भाडयाने राहत असल्याने गावडे हे माझेच म्हणणे बरोबर आहे. त्याचे कुंटूंब ही मोठे होते. त्याचा एक भाऊ मिलट्रीत नोकरीला आहे. तो सध्या जम्मु काश्मीर येथे कार्यरत आहे. गेल्या काही दिवसापूर्वी तो सुट्टीवर आला होता. त्यामुळे आकाश ही जरा दबकुनच होता. तरीही आकाश याला तंबी देत होते. त्यावेळी त्यांनी आकाश याला मारहाण करून चिकनचे खरकटे गटारीतून बाहेर काढायला लावले होते. त्यावेळी झालेल्या मारामारीत आकाश बल्लाळ याने बजरंग गावडे याच्या विरोधात खूनाचा प्रयत्न केल्याची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेली होती. तर गावडे यांनी ही आकाश विरोधी परस्पर विरोधी तक्रार दाखल केली होती. या भांडणातूनच पुढे आकाश याला तो राहत असलेले भाडयाचे घर तेथून सोडावे लागले होते. तेथून तो दुसरीकडे आपल्या कुंटूंबासह राहयला गेला होता. तो जरी दुसरीकडे राहयला गेला तरी त्याच्या मनातील खुन्नस कमी झालेली नव्हती. तो बजरंग गावडे याच्यावर चिडून होता.त्याला कायमचा धडा शिकविण्याचा त्याचा विचार होता. गावडे याच्यामुळे आपल्याला मंगळवार पेठेतील घर सोडावे लागले असा त्याने गैरसमज करून घेतला होता. चिकनचे खरकटे टाकल्याचा वाद हा कुठल्या कुठे पोहोचला होता. आकाश याने ही घटना आपल्या जवळच्या मित्रांना सांगितलेली होती. बजरंग गावडे याचा मला बदला घ्यायचा आहे. त्यासाठी मला तुमची मदत पाहिजे असे त्याने मित्रांना सांगितले होते. तो आणि त्याचे मित्र हे गावडे यांना टपकविण्याची संधीच शोध होते. पण गेल्या वर्षभरात त्यांना तशी संधी मिळत नव्हती. ते त्याच्या मागावरच होते.गावडे हे ही तसे अनभिज्ञ नव्हते. ते नेहमी सतर्क राहत होते. त्याचा ही ते राहत असलेल्या परिसरात वट होता. त्यामुळे ते सहसा कुणाला घाबरत नव्हते. जशास तसे उत्तर देण्याची त्याची तयारी होती. ही गोष्ट आकाश याला माहित होती. बजरंग गावडे याचा आपण एकटयाने काटा काढू शकत नाही याची त्याला कल्पना होती. म्हणूच त्याने याकामासाठी मित्रांची मदत घेण्याचे ठरविले होते. त्याच्या मित्रांनी ही मदत करण्याचे कबुल केले होते. गेल्या वर्षभरापूर्वी झालेल्या भांडणाचा राग आकाश याच्या मनात होता.काही करून त्याला बजरंग गावडे याचा काटा काढायचा होता. तो तशी संधीची वाट पाहत होता. मंगळवार दि.१५ डिसेंबर रोजी रात्री साडे दहाच्या दरम्यान बजरंग गावडे हे आपल्या मोटार सायकलीवरून मंगळवार पेठेत असणाऱ्या समर्थ कॉर्नर अपार्टमेटजवळील जनावरांना चारा घालण्यासाठी चालले होते. त्यावेळी ते बोगद्याजवळ आले असता. समर्थ मंदिर परिसरात त्यावेळी आकाश बल्लाळ व त्याच्या मित्रांनी त्यांची गाडी आडवून त्यांना खाली पाडले. रात्रीच्या अंधारात त्या रस्त्यावर गर्दी कमी होती. याचाच फायदा घेत आकाश व त्याच्या मित्रांनी बजरंग यांना मारहाण करत त्याचे मानेवर, चेहऱ्यावर, खांद्यावर, अंगावर आपल्याकडील कोयत्याने व तलवारीने वार करायला सुरूवात केली होती. त्याच्यावर वार होत असताना ते मला वाचवा, वाचवा म्हणून ओरडत होते. आकाश याच्याबरोबर त्यावेळी त्याचे मित्र अमन सय्यद, तुषार धोत्रे, आकाश शिंदे हे होते. या चौघांनी मिळून त्याच्यावर कोयत्याने आणि तलवारीने हल्ला चढविला होता. त्यात त्यांच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला होता.या घटनेनंतर या परिसरातून आकाश बल्लाळ व त्याचे मित्र पळून गेले होते. ही घटना मंगळवार पेठेत गावडे राहत असलेल्या जवळच बोगद्या परिसरात घडली होती. या घटनेची माहिती मिळताच बजरंग याचा भाऊ शंकर गावडे, शिवाजी गावडे, पत्नी रेश्मा शेजारी राहणारे अक्षय शेंडगे. सुनिल मोरे, अशोक कदम, बजरंग याचा साडू दत्ता हे सर्वजण घटनास्थळी धावत पळत आले होते. बजरंग यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेले बघून त्यांच्या नातेवाईकांनी मोठयाने आक्रोश केला होता. या घटनेची माहिती सातारा शहर पोलीस स्टेशनला देण्यात आली होती. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा चालु केला होता. घटनास्थळी मृतदेहापासून थोडया अंतरावर बजरंग याची मोटार सायकल पडली होती. तर रक्ताच्या थारोळ्यात त्यांचा मृतदेह पडला होता. घटनास्थळावरील चित्र पूर्णपणे विदारक होते.बजरंग याच्या चेहऱ्यावर वार करण्यात त्याचा चेहरा विद्रुप झाला होता. तर शरीराची संपूर्ण चाळण झाली होती. या घटनेची माहिती मयत बजरंग गावडे याचा भाऊ शंकर लक्ष्मण गावडे यांनी सातारा शहर पोलीसात दिली होती. व तशी त्यांनी फिर्याद ही दाखल केली होती. या फिर्यादीत त्यांनी संशयीत म्हणून आकाश बल्लाळ याचेवर संशय व्यक्त केला होता. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करत असताना सुरूवातीला गावडे कुंटुंब ही त्यांना सहकार्य करत नव्हते. मयत बजरंग गावडे यांची कधीच कोणाशी वैर अथवा भांडण झाल्याचे त्यांनी पोलीसांना सांगितले होते. जर त्याचे कुणाशीस कसलेच वैर नसेल तर त्याची हत्या इतक्या निर्घृणपणे का करण्यात आली याचा तपास पोलीस करत होते. पोलीस सर्व शक्यता पडताळून पाहत होते या घटनेतील संशयीत आरोपी पळून गेले होते. सातारा शहर स्थानिक गुन्हे प्रकटीकरणचे पोलीस ही या घटनेचा तपास करत होते. या घटनेसंदर्भात पोलीसांना पुसटशी माहिती बाहेरून मिळाली होती. मयत बजरंग गावडे याचा सन २०१७ मध्ये चिकनचे खरकटे टाकल्याच्या कारणातून आकाश बल्लाळ याचेशी वाद झाला होता. आणि यातूनच त्यावेळी पोलीस स्टेशनला दोघांनी ही परस्पर विरोधी तक्रारी दाखल केल्या होत्या. याच संशयातून या घटनेनंतर अवघ्या दोन तासात या घटनेतील मुख्य संशयीत आकाश बल्लाळ याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे बजरंग गावडे याच्या हत्येविषयी चौकशी केली, सुरूवातीला तो आढेवेढे घेत होता.पण पोलीसांनी त्याला पोलीसी खाक्या दाखवताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती देऊन या गुन्हयातील आपल्या इतर मित्रांची ही नांवे सांगितली. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या घटनेतील इतर तिघांना लगेच ताब्यात घेतले होते. शंकर गावडे याच्यां फिर्यादीवरून पोलीसांनी बजरंग लक्ष्मण गावडे (वय ३०रा. मंगळवार पेठ सातारा) याच्या खूनप्रक्ररणी आकाश नितीन बल्लाळ(वय २३) अमन ईस्माइल सय्यद (वय२०) तुषार प्रल्हाद धोत्रे (वय २१) आणि आकाश उदयसिंह शिंदे (वय २३) रा.सर्व मंगळवार पेठ याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ सह इतर विविध गुन्हयाखाली गुन्हा नोंदवून त्याना अटक करून मा.कोर्टासमोर उभे केले असता.मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता,व तलवार आणि त्याच्या दोन दुचाकी गाडया जप्त केले होते.साहाय्यक पोलीस अधिक्षक आचल दलाल,सातारा शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे,गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस निरीक्षक नानासाहेब कदम, पो.उप. निरी.अनिल पाटील,शाहुपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौ.विश्वास कडव,पोलीस हवा. अजित जगदाळे,प्रशांत शेवाळे, हवा.सणस, पो.नाईक शिवाजी भिसे, अविनाश चव्हाण, अरूण दगडे, पो.कॉ.गणेश घाडगे, अभय साबळे, गणेश भोग, विशाल धुमाळ यांनी केला. या घटनेचा पुढील तपास सातारा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस करत आहेत. मागील भांडणाचा राग एकदा का एखाद्याच्या सनकी डोक्यात बसला की त्यातून खूनासारखी घटना घडते.या गंभीर घटनेत केवळ चिकनचे खरकटे टाकल्याचा राग होता की अन्य कोणत्या कारणातून आकाश बल्लाळ व त्याच्या साथीदारांनी बजरंग गावडे याची हत्या केली याचा शोध पोलीस घेत आहेत. खूनासारख्या घटनेला कारण जरी किरकोळ वाटत असले तरी त्यामागे ही मोठे कोणते तरी कारण हे दडलेले असणार याची शक्यता धरून पोलीस या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## पान ८ वरून....

### विकासप्रकल्प कालबद्ध मर्यादेत ...

असल्याचे, नागपूर येथे मुलींसाठी संत चोखामेळा वसतीगृह उभारण्यात येत असल्याचे त्यांनी सादरीकरणादरम्यान सांगितले. बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्रीनिवासन, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे उपस्थित होते.

### पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या...

प्रा. संजयादेवी गोरे, प्रिया नाईक, युगा कनामे, सुरज पाटील, वैभव डोळे, शुभम आवाड, प्रमोद वरपे, बाळासाहेब बावणे, कुंदन सरवदे, ड. पवन नावंदर, नागसेन कांबळे, विक्रांत भुमकर, पवन नावंदर, पृथ्वीराज पवार, कृष्णा वंजारे, विजयकुमार कठारे, नितीन पांचाळ, संतोष पाटील, तोसिफ सय्यद यांनी परिश्रम घेतले.

### भाजप पालघर जिल्हाच्या महिला ...

जिल्ह्याच्या महिला आघाडी सरचिटणीस पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे त्या बद्दल वरिष्ठांचे मनःपूर्वक आभार, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डाजी, मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत पाटील, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष उमा खापरे पालघर जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील यांना अभिप्रेत असलेले संघटन बनविण्यासाठी जिल्ह्यातील सर्वांना एकत्र करुन पक्षाची ध्येय धोरणे व कार्यक्रम राबवितांना सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्ष मजबुतीसाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करेन.

### कर्जत-जामखेड पोलिसांना मिळालेली...

राबवावेत व आपल्या मतदार संघात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस दलाच्या बळकटीकरणात पुढाकार घ्यावा.आमदार रोहित पवार यांच्या एकात्मिक विकास संस्थेच्यावतीने पोलिसांसाठी देण्यात आलेल्या दोन जीप व चार मोटरसायकलचे लोकार्पण करण्यात आले. कर्जत व जामखेड पोलीस स्टेशन हद्द भौगोलिकदृष्ट्या मोठी आहेत. चार जिल्ह्याच्या सीमा या दोन तालुक्यांना आहेत. तसेच या भागात शाळा व महाविद्यालय जास्त असून शाळेमध्ये येणाऱ्या मुलींची संख्याही लक्षणीय आहे. दोन्ही तालुक्याची हद्द मोठी असल्यामुळे येणाऱ्या अडीअडचणीवर मात करुन गस्त घालणे सोयीचे होईल यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीद्वारे ही वाहने देण्यात आल्याचे पवार यांनी सांगितले. या पुढेही माता भगिनींच्या रक्षणासाठी पोलीस विभागाला मदत केली जाईल, असेही ते म्हणाले. जिल्हा पोलीस अधीक्षक मनोज पाटील यांनी वाहने दिल्याबद्दल एकात्मिक विकास संस्थेचे, आभार मानले तसेच या वाहनांचा उपयोग नागरिकांच्या सुरक्षितेसाठी करण्यात येईल असे सांगितले. या कार्यक्रमास पोलीस उप विभागीय अधिकारी अण्णासाहेब जाधव तसेच जामखेडचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, कर्जतचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव उपस्थित होते.

# वीर जवान अमित पाटील यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



**जळगाव/प्रतिनिधी**

'वीर जवान अमित पाटील अमर रहे' च्या जयघोषात सीमा सुरक्षा दलाच्या १८३ बटालियन मध्ये कार्यरत असलेले जवान अमित पाटील यांच्या पार्थिवावर आज दुपारी बारा वाजून पन्नास मिनिटांनी त्यांच्या मूळगावी वाकडी, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. बुधवार, १६ डिसेंबर २०२० रोजी जम्मूमधील पूंछ भागात अमित पाटील यांना वीरगती प्राप्त झाली. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी वाकडी येथे शोकाकुल वातावरणात हजारो नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी मंत्री तथा आमदार गिरीश महाजन, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण, चाळीसगावचे उपविभागीय अधिकारी लक्ष्मीकांत साताळकर, उपविभागीय पोलिस अधिकारी ईश्वर कातकडे, तहसीलदार अमोल मोरे, गटविकास अधिकारी वाय.एन.वाळेकर, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे प्रतिनिधी वाकडे यांच्यासह पाटील कुटुंबीय व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरुवातीस वीर जवान अमित पाटील यांच्या पार्थिवास सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी मानवंदना देऊन पुष्पचक्र अर्पण केले. त्यानंतर आमदार सर्वश्री गिरीश महाजन, सुरेश भोळे, मंगेश चव्हाण, उप विभागीय अधिकारी साताळकर, उपविभागीय पोलिस अधिकारी कातकडे, तहसिलदार मोरे यांच्यासह मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. तत्पूर्वी सकाळी नऊ वाजता अमित यांचे पार्थिव घरी आणण्यात आले. कुटूंबिय व नातेवाईकांनी अंत्यदर्शन घेतले. त्यानंतर फुलांनी सजविलेल्या वाहनातून शोकाकूल वातावरणात त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली.

अंत्ययात्रेच्या पुढे तिरंगा धरून तरूण पुढे चालत होते. फुलांनी सजविलेल्या वाहनातून त्यांची अंत्ययात्रेस सुरुवात झाली. वाकडी गाव व परिसरातून अंत्ययात्रा मोकळ्या मैदानात आली. त्यानंतर त्यांना पोलिस दल व सीमा सुरक्षा दलातर्फे हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर त्यांच्या पार्थिवास त्यांचे लहान बंधू यांनी अग्नीडाग दिला. वीर जवान यांच्यामागे वडील साहेबराव पाटील, आई सकुबाई पाटील, पत्नी वैशाली, एक मुलगा, एक मुलगी, एक बहिण, एक भाऊ असा परिवार आहे. यावेळी अनेक मान्यवर व्यक्ती, संस्थाच्यावतीने वीर जवान अमित यांना श्रध्दांजली अर्पण केली.

# देवणी येथील बैल बाजारास प्रारंभ



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील प्रसिद्ध बैल बाजारास युवा उद्योगपती विजयकुमार मानकरी यांच्या हस्ते गुरुवारी प्रारंभ करण्यात आला. देवणी येथील बैल बाजार दर बुधवार व गुरुवारी भरत असतो. या बैल बाजारात देवणी जातीच्या वळू बैल व गाईच्या खरेदी- विक्रीसाठी शेजारच्या कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाणा या राज्यातून शेतकरी व व्यापारी मोठ्या प्रमाणात येत असतात. देवणी जातीच्या वळूची राज्यातच नव्हे तर देशात ओळख आहे. दर बाजारी येथे आकर्षक बैलजोडी येथे खरेदी विक्री होत असतात. यावेळी वैजनाथ लुल्ले नगराध्यक्ष वैजनाथ अष्टुरे, माजी सरपंच देविदास पतंगे, धनराज गिरी, काँग्रेस चे जेष्ठ नेते रशीद मल्लेवाले, युवराज विरादार, धनराज जीवने, प्रकाश धनुरे, करीम शेख, आयुब येरोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# अखेर ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण रद्द

## गावपुढाऱ्यात कमालीची अस्वस्थता तर सरपंचपदाचे सस्पेंस कायम!

**देवणी/शकिल मनियार**




देवणी तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना ग्रामपंचायतीच्या राजकारणाचा उलटफेर करणारा निर्णय राज्य सरकारने घेतला असून ग्रामपंचायत निवडणुकीनंतर सरपंचपदाची आरक्षण सोडत होणार असल्याचे जाहिर केले. त्यामुळे निवडणुक पुर्वी सरपंचपदाचं आरक्षण जाहीर झालेले आरक्षण या नव्या निर्णयामुळे रद्द होणार असल्याने आरक्षण सोडत होईपर्यंत सरपंपदाचे सस्पेंस कायम राहणार. मागच्या सरकारने सरपंचपदाच्या निवडणुका थेट जनतेतून घेतल्या होत्या, त्या थांबवत या महाआघाडी सरकारने थेट निवड थांबवून निवडून आलेल्या सदस्यांमधूनच सरपंचाची निवड करण्याचा निर्णय घेतला, त्यात देवणी तालुक्यातील ४५ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहिर केले. त्यातील ३४ ग्रामपंचायतीची रणधुमाळी सुरू झाली असताना सरपंचपदासाठी जाहीर केलेले आरक्षण रद्द करून अगोदर निवडणुका व त्यानंतर जानेवारीमध्ये सरपंचपदासाठीचे आरक्षण सोडतीचा निर्णय जाहिर झाल्यामुळे सर्वांचे लक्ष नव्या आरक्षण सोडतीकडे लक्ष लागले आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून लांबणीवर पडलेलाग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला व ग्रामपंचायतींची निवडणूक १५ जानेवारी रोजी होणार असल्याचे जाहिर केल्यामुळे तालुक्यातील ३४ ग्रामपंचायतींच्या निवडणुका होवून लवकरच नवीन कारभारी निवडले जातील असे वाटत असताना सरपंचपदाचे सुटलेले आरक्षण रद्द करून ती निवडणुकीनंतर होणार या निर्णयामुळे मोर्चेबांधणीत व्यस्त झालेले नेते व गाव पुढारी अस्वस्थ झाले असून या निर्णयासंबंधी तालुक्यात विविध प्रतिक्रीया व्यक्त केली जात आहेत. या अगोदर सरपंच पदाचे आरक्षण सुटून त्यानंतर निवडणुका व्हायच्या, त्यामुळे सरपंच पदासाठीचे उमेदवार निवडणुका आधीच कळायचे पण या निर्णयाने पहिल्यांदाच ग्रामपंचायतीच्या निवडणुका संरपचपदाच्या आरक्षणाविना होणार आहेत. त्यामुळे आरक्षण सुटलेल्या इच्छुक सरपंचपदाच्या उमेदवारांमध्ये नाराजी तर ज्यांची संधी हुकली होती, ते मात्र उत्साही दिसत असून सरपंच होवू शकतो या कल्पनेने सर्वसामान्यांच्या आशा मात्र पल्लवित झाल्या आहेत. ग्रामीण भागात अत्यंत अतितटीच्या होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकामध्ये उमेदवार उभा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते, त्यात इच्छुक सरपंच पदाचे किंवा उपसरपंच पदाचे उमेदवार पॅनल उभा करून निवडणुकीचा पुर्ण खर्च करत असत, पण या निर्णयामुळे सरपंच कोण होणार हे गुलदस्त्यात असल्यामुळे निवडणुक कशी लढवावी, उमेदवार कोण द्यावेत, निवडून आल्यावर कोणत्या प्रवर्गातील आरक्षण निघणार व मुख्य म्हणजे निवडणुकिसाठीचा खर्च कसा व कोणी करावा यासाठी पॅनलप्रमुखामध्ये अस्वस्थता पसरली आहे हे मात्र नक्की.

# ग्रामीण रुग्णालयासाठी मंत्रीगणाला वलांडीकरांचे साकडे

## मंत्र्याची भेट घेवुन मांडली आरोग्य सुविधेची कैफियत!



**देवणी/शकील मनियार**

तालुक्यातील सिमा भागातील वलांडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देवुन या भागातील आरोग्य सुविधा सुलभ व्हाव्यात यासाठी वलांडी नागरीकांच्या वतीने राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्याकडुन आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे सुतोवाच शिष्टमंडळास दिले. वलांडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत आठ उपकेंद्रासह ३३ गावाची आरोग्य सुविधा पुरवली जाते. शिवाय सिमाभागातील कर्नाटक राज्यातील नागरिकांचा लोंढाही या रुग्णालयाकडे येतो. उद्दिष्टापेक्षा जास्त होणाऱ्या कुटुंब शस्त्रक्रिया होत असतात. कोरोनासारख्या महाभयंकर अजारावर प्रतिबंध करताना येथे झालेली गर्दी अपुरे वैद्यकीय अधिकारी कर्मचारी, औषधाचा अभाव यामुळे रुग्णाची नेहमीच हेळसांड होत आहे. यासर्व बाबी परवा वलांडी येथील शिष्टमंडळाने मुंबई येथे भेट देऊन प्राथमिक आरोग्य केंद्रास ३० खाटाचे ग्रामीण रूग्णालयास मंजुरी द्यावी अशी मागणी आरोग्यमंत्री राजेश टोपे, लातुरचे पालकमंत्री अमित देशमुख, राज्यमंञी संजय बंनसोडे, बाळासाहेब थोरात यांना भेटुन आरोग्याची कैफियत मांडली व निवेदन हि देण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. यावेळी वलांडीचे राष्ट्रवादी महाराष्ट्र सहसचिव मोहम्मद रफी सय्यद, माजी सभापती गोविंदराव भोपणीकर, मधुकर लाडंगे यांनी वलांडीचे प्रतिनिधित्व करत निवेदन सादर केले.

वलांडी येथे ग्रामीण रुग्णालय व्हावे यासाठी २९ सप्टेंबर २०१८ रोजी जि.प कडे ठराव पाठवण्यात आला.याची दखल घेत जि.प.च्या सर्वसाधारण बैठकीत ठराव पारीत करुन ३ सप्टेबंर १९ रोजी आरोग्य मंत्रालयाकडे पाठवण्यात आला आहे. संजय बनसोडे हे हेर विधानसभा मतदार संघातुन आमदारकीसाठी इच्छुक होते. या भागाचे लोकप्रतिनिधी होता आले नसले तरी आता जिल्ह्याचे मंत्री अन वलांडीसाठी असलेले प्रेम म्हणुन ग्रामीण रुग्णालय मंजुरी करण्याची जबाबदारी संजय बनसोडे यांनी स्वीकारली अशी माहिती शिष्टमंडळाने दिली.



# महाराष्ट्राची भाग्यरेषा : कोयना जलविद्युत प्रकल्प!

कोयना जल विद्युत प्रकल्पाला 'महाराष्ट्राची भाग्यरेषा' म्हणून ओळखले जाते. या जलविद्यूत केंद्रावर राज्यातील अनेक उद्योग व्यवसाय आधारलेले आहेत. कोयना जलविद्युत प्रकल्प हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा विद्युतप्रकल्प आहे. पावसाळ्यात वाहणारे पाणी एका धरणात साठवले जाते, व नंतर तेच पाणी उन्हाळ्यात वापरले जाते. साधारणतः धरणाच्या उंचीपासून किंवा पाण्याच्या पातळीपासून जनित्रापर्यंतची उंची २५ ते २५०० मीटर इतके असते. या विद्युत प्रकल्पामुळे कोणत्याही प्रकारचे प्रदूषण उद्भवत नाही, यामुळे या प्रकल्पाचा पर्यावरणास कोणत्याही प्रकारचा धोका नाही. या विद्युतप्रकल्पाची एक त्रुटी ही आहे, की या प्रकल्पास फार मोठी जागा लागते. तसेच धरणात साठवलेल्या पाण्याचे मोठ्या प्रमाणात बाष्पीभवन होते. जास्तीत जास्त उंचीवरुन वाहणाऱ्या पाण्याला विद्युत जनित्रातून वाहू दिल्यास वीजनिर्मिती होते. जितकी जास्त उंची तितकी जास्त वीजनिर्मिती असे त्याचे तत्त्व आहे. कारण या प्रकारात स्थितिज ऊर्जा ही गतिज ऊर्जेत बदलते. या तऱ्हेने केलेल्या विद्युतनिर्मितीला जलविद्युत उर्जा असे म्हणतात.

जलविद्युतप्रकल्प म्हटला म्हणजे एखाद्या नदीवर धरण बांधून, पाणी अडवून, मोठा जलाशय निर्माण केला जातो. मग त्या जलाशयातील पाणी पाइपाने टर्बाइनपर्यंत नेऊन त्याच्या जोरावर टर्बाइन फिरते व नंतर ते पाणी त्या नदीच्याच पात्रात सोडले जाते. टर्बाइनने फिरवलेल्या जनित्रामुळे विद्युतनिर्मिति होते. कोयना ही पूर्ववाहिनी नदी अशा ठिकाणी आहे कीं तेथून महाराष्ट्रातील उत्तर-दक्षिण सह्याद्रि घाटमाथा जवळ आहे. येथे बांधलेल्या धरणाने प्रचंड मोठा जलाशय निर्माण झाला आहे. सह्याद्रीच्या पोटातून बोगदे काढून हे पाणी, पोटातच गुहेप्रमाणे खोदलेल्या भल्यामोठ्या पॉवरहाउसपर्यंत जाते व टर्बाइन्स फिरवून मग दुसर्या बोगद्याने पुढे जाऊन कोकण बाजूला उतरते व मग पश्चिमवाहिनी वासिष्ठी नदीतून वाहत जाऊन अरबी समुद्रात जाते. म्हणजे नदीचा प्रवाह पूर्वेकडून पश्चिमेकडे उलटा फिरवलेला आहे. हे कोयना प्रकल्पाचे वैशिष्ट्य आहे. प्रचंड प्रमाणात औद्योगिकरण झालेल्या मुंबई आणि तिचा परिसर यांच्या विद्युत शक्तीच्या सततच्या वाढत्या मागणीमुळेच मुख्यत्वेकरून हा प्रकल्प आकारास आला. मुंबई शहर आणि भोवतालीचा भाग यांना बरीच वर्षे विजेचा तुटवडा भासत होता. दुसऱ्या महायुध्दानंतरच्या घडामोडीमुळे तोच विजेचा तुटवडा अधिकच तीव्र होत गेला. विद्युत



शक्तीची अत्यंत आवश्यकता होती. तसेच जागृत झालेल्या ग्रामीण भागाचा औद्योगिक विकास जिच्यावरच केवळ निर्भर आहे अशी स्वस्त विद्युत शक्तीची उपलब्धता अत्यावश्यक होऊन बसली होती. खरे पाहता टाटांचे कार्यालय की, ज्यांनी सन १९१५ मध्ये खोपोली येथे पहिले जलविद्युत केंद्र कार्यान्वित केले. त्यांनीच सन १९१० च्या सुमारास या प्रकल्पासंबंधी प्राथमिक पाहणी केली होती. सन १९१४ ते १९१८ च्या पहिल्या जागतिक युध्दानंतर सन १९३०-३१ मध्ये याच प्रकल्पाच्या पाहणीचे काम पुन्हा हाती घेण्यात आले. परंतु सन १९३९ ते १९४४ या कालावधीतल्या दुसऱ्या महायुध्दाने या कामास खीळ पडली. युरोप खंडात सन १९१० ते १९५० या मध्यंतरीच्या कालावधीत विद्युत केंद्र भूगर्भात उभारणे आणि उच्च दाबाच्या जलवाहिन्या वापरणे इत्यादी बाबींच्या तंत्रज्ञानात प्रचंड प्रगती झाली होती. म्हणून ज्यावेळी १९४५ साली मुंबईच्या ग्रीड डिपार्टमेंटने या विद्युत प्रकल्पाच्या आखणीचे काम हाती घेतले, त्या वेळी शासकीय अभियंत्यांनी भूगर्भातील विद्युत गृहाच्या रचनेच्यादृष्टीने आवश्यक ती सर्व तपशीलवार माहिती जमविली. सखोल अभ्यास केला आणि स्वित्झरलंडच्या तज्ञांच्या आणि इतर सल्लागारांच्या मदतीने कोयना प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची उभारणी सह्याद्रीच्या पोटात करण्याच्या प्रस्तावास सन १९५३ मध्ये प्रशासकीय मंजूरी मिळविली. या योजनेत कृष्णा व कोयना या नद्यांचे खोऱ्यात पसरलेल्या महाराष्ट्राच्या सीमेपर्यंतच्या क्षेत्रातील सिंचन योजना व शेती यासाठीही तरतूद करण्यात आली होती.

जलविद्युत केंद्रात आवश्यक असलेली अत्यंत अनुकूल भूरचना या क्षेत्राला लाभलेली आहे. अरबी समुद्रापासून केळव ५६ किलोमीटर म्हणजेच ३५ मैल अंतरावर असलेल्या पोफळी येथे पूर्वेच्या बाजूस सह्याद्रीच्या रांगांवरून वाहणा-या कोयनेचे पात्र समुद्र सपाटीपासून ५७९ मीटर (१९०० फूट) उंचावर आणि विद्युत केंद्रापासून बाहेर पडणारे पाणी समुद्राला मिळण्यासाठी पश्चिमेच्या बाजूला ५०० फुटाचा उतार अशा प्रकारच्या नैसर्गिक भूरचनेमुळे अत्यंत कमी खर्चात विद्युत निर्मितीसाठी फार महत्त्वाची असणारी जलस्तंभाची प्रचंड मोठी उंची प्राप्त झालेली आहे. ज्या खडकांमधून बोगदे खणावे लागणार होते ते लाव्हारसपासून बनलेले उत्कृष्ट प्रतिचे कातळ होते. म्हणून त्यांच्या या अत्यंत कठिणपणाचा आणि मजबूतीचा फायदा घेता आला आणि प्रचंड मोठया दाबाचे पाणी विद्युत गृहात आणण्यासाठी लागणा-या जलवाहिन्यांवर येणारा दाब काही प्रमाणात जलवाहिनीच्या पोलादी भागावर आणि उरलेला दाब खडकांवर विभागला गेला. त्यामुळे पोलादाच्या जाडीमध्ये तसेच त्यांची लांबी सुध्दा कमी झाल्यामुळे खर्चामध्ये भरघोस काटकसर झाली आणि निव्वळ काटकसरीसाठीच कोयना विद्युत गृहाची रचना भूगर्भात केली गेली. कोयना धरणाची रचना २७९६.५ दशलक्ष घनमीटर (१०५२५० दशलक्ष घन फूट) पाणी साठविण्याच्यादृष्टीने करण्यात आली आहे. यापैकी २ हजार ५०० दशलक्ष घनमीटर पाणी हे शेतीकरीता राखून ठेवले आहे. या प्रकल्पाच्या विस्तारासाठी चार टप्पे योजिले आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात मिळून पोफळी येथे जलविद्युत केंद्राची उभारणी केली असून ७० मेगावॅटचे एक असे चार आणि ८० मेगावॅटचे एक असे आणखीन चार अशा त-हेने एकूण आठ विद्युत निर्मिती संच कार्यान्वित केलेले असून हे एकूण ६०० मेगावॅटचे केंद्र ६० टक्के लोड फॅक्टरचे बेसलोड स्टेशन म्हणून कार्यरत आहे. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील विद्युत निर्मिती नंतरचे पाणी समुद्रसपाटीपासून १३३.२ मीटर (४३७ फूट) उंचीवर अवजल भूयारातून बाहेर पडते. समुद्रात विलीन होण्यापूर्वी या पाण्यातील शेष शक्तीचा उपयोग करून घेण्यासाठी वैतरणी नाल्याच्या पात्राशेजारीच असलेल्या कोळकेवाडी दरीमध्ये एक छोटे धरण बांधण्यात आले आहे. या कोळकेवाडी धरणाच्या पायथ्या लगतच्या भूगर्भात एक विद्युत निर्मिती केंद्र उभारून ८० मेगावॅटचे एक असे चार वीज निर्मिती संच कार्यान्वित केले आहेत. २४ टक्के लोड फॅक्टर असलेले हे केंद्र अत्याधिक विद्युत मागणीच्या वेळात चालविण्यासाठी योजिलेले आहे. कोयना जल विद्युत केंद्राच्या चौथ्या टप्प्यात २५० मेगावॅटचे एक अशी ४ जनित्रे बसविण्यात आली आहेत. चौथा टप्पा चालूकेल्याने पोफळीचे टप्पा १ व २ वीज निर्मिती केंद्र हे अत्याधिक विद्युत मागणीच्या वेळात चालविण्यासाठी रुपांतरीत करण्यात आले आहेत.

सर्वाधिक विजेची अपेक्षित वाढीव दैनंदिन गरज लक्षात घेऊन कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्याची आखणी ही काळाची गरज ठरली आहे. टप्पा ४ या योजनेत सध्याचेच पाणीवापराण्यात येत असल्याने त्यासाठी वेगळे धरण बांधण्याची गरज भासली नाही. या प्रकल्पाची उभारणी टप्पा १ व २ प्रमाणेच असून सह्याद्रीच्या कुशीतील कोळकेवाडी धरणाजवळ निर्माण करण्यात आले आहे. या वीजगृहात २५० मेगॅवॅट क्षमतेची ४ जनित्रे बसविण्यात आली असून त्यामुळे १००० मेगॅवॅट वीजनिर्मितीची क्षमता वाढली आहे. या विद्युतनिर्मितीसाठी उपयोगात आलेले पाणी कोळकेवाडी धरणाच्या जलाशयात सोडण्यात येते.

प्रकल्पाच्या या चौथ्या टप्प्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी नुकतीच भेट दिली. या प्रकल्पाविषयीची माहिती तेथील अभियंत्यांकडून जाणून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मुख्यमंत्र्यांना प्रकल्पाविषयीची उत्सुकता ही त्यांनी प्रकल्पातील ड्राफ्टट्यूब विषयी माहिती घेताना स्वत:च्या मोबाईलचा फ्लॅश लाऊन पाहणी केल्यावर दिसून आली. कोयना विद्यूत प्रकल्पाच्या आधुनिकीकरणासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी मदत करेल अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी दिली. कोयना विद्युतप्रकल्प हा महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामार्फत चालविला जातो. हा प्रकल्प महाराष्ट्रासाठी तसेच देशासाठी महत्त्वाचा प्रकल्प असल्याने या प्रकल्पाचे संरक्षण व प्रकल्पाची काळजी ही महाराष्ट्र शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या आधुनिकीकरण व विकासासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी मदतीसाठी खंबीर पणे उभे आहे.

**- प्रविण डोंगरदिवे**
**माहिती सहाय्यक विभागीय माहिती**
**कार्यालय कोकण विभाग, नवी मुंबई**

21 DEC TO 27 DEC 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 19/12/2020 9:15 PM Page 1



# भिवंडीत गर्भपात गोळ्यांचा अवैध धंदा तेजीत

## मेडिकल स्टोर बरोबरच वैद्यकीय क्षेत्राशी जोडलेल्या खासगी व्यक्तींकडून देखील विकल्या जातात गर्भपाताच्या गोळ्या; प्रशासनाचे दुर्लक्ष!

**भिवंडी/अभिजित हिरे**

गर्भलिंगनिदाना बरोबरच असुरक्षित गर्भपात करण्यास कायद्याने बंदी घातली असली तरी मेडिकल स्टोर बरोबरच वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित असलेल्या अनेक व्यक्तींनी सध्या गर्भपाताच्या गोळ्या विकण्याचा गोरखधंदा सुरु केल्याची खळबळजनक बाब भिवंडीत समोर आली आहे. विशेष म्हणजे या गोरखधंद्यावर वैद्यकीय विभागासह पोलीस यंत्रणा व प्रशासनाचे कोणतेही धाक नसल्याने सऱ्हास पणे गर्भपाताच्या गोळ्यांची विक्री भिवंडीत होत आहे. ३०० रुपयांपासून ते पंधराशे रुपयांपर्यंत या गर्भपाताच्या गोळ्या माणूस बघून विकल्या जात आहेत. एका दक्ष नागरिकाने केलेल्या स्टिंग ऑपरेशन मध्ये हि खळबळजनक बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे कायद्याची बंदी असतांनाही मेडिकल मध्ये डॉक्तरांच्या कोणत्याही लेखी प्रिस्क्रिप्शन शिवाय या गोळ्या मिळत असल्याने गर्भपाताच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. मात्र यावर शासकीय यंत्रणांचे कोणतेही नियंत्रण नसल्याने अवैध गोळ्या विक्री करणाऱ्यांवर कारवाई होणार का? याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.



विजय जाधव असे दक्ष नागरिकाचे नाव असून ते सामाजिक कार्यकर्ता म्हणून भिवंडीत काम करीत आहेत. भिवंडीत गर्भपाताच्या गोळ्या डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय मिळतात अशी माहिती मिळाल्या नंतर जाधव यांनी भिवंडीतील शास्त्री नगर परिसरातील एका मेडिकल दुकानात या गर्भपाताच्या गोळ्या खरेदी करतांना स्टिंग ऑपरेशन केले त्यात हि खळबळजनक माहिती समोर आली. भिवंडीतील अनेक मेडिकल मध्ये अशा प्रकारे अवैध रित्या गर्भपाताच्या गोळ्या डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय मिळत असल्याने यामुळे गर्भपात कायद्याचा सऱ्हासपणे उल्लंघन होत असून समाजात भ्रूण हत्या वाढण्याची शक्यता देखील जाधव यांनी वर्तविली असून या अवैध गोळ्या विकणाऱ्या मेडिकल चालकांसह खासगी इसमांवर कारवाई करावी अशी मागणी देखील जाधव यांनी केली आहे.

या गोळ्या स्त्री रोग तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच घेणे गरजेचे आहे . मात्र भिवंडीत चणे फुटाणे विकतात तशा पद्धतीने सऱ्हासपणे या गर्भपाताच्या गोळ्या विकल्या जात आहेत. डॉक्टरनचा सल्ला न घेता या गोळ्या खाल्ल्याने स्त्री ला भविष्यात गर्भपिशवीसंदर्भतील त्रास होऊ शकतो तर कधी कधी गोळ्यांमध्ये पूर्ण गर्भ पडत नसल्याने गर्भ पिशवी साफ करण्याची वेळ अथवा काढून टाकण्याची वेळ महिलेवर येते यामुळे महिलांच्या जीवाला देखील धोका निर्माण होण्याची शक्यता असते अशी माहिती स्त्री रोग तज्ञ डॉ. सुप्रिया अरवारी यांनी दिली आहे. भिवंडीत अनेक अवैध धंदे सुरु असतांना आता महिलांच्या जीवाशी खेळून अवैध गर्भपाताच्या गोळ्या विकणाऱ्या रॅकेटवर अन्न व औषध प्रशासन नेमकी काय कारवाई करणार याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

# इंधन दरवाढी विरोधात वाड्यात शिवसेनेची निदर्शने; मंत्री दानवे विरोधात घोषणाबाजी




**वाडा/प्रतिनिधी**

दिवसेंदिवस इंधन दरवाढ होत असून महागाईचा आगडोंब निर्माण करणाऱ्या मोदी सरकारचा निषेध करण्यासाठी वाडा तालुका शिवसेनेच्या वतीने वाड्यातील बस स्थानकासमोर शनिवारी निदर्शन करण्यात आले.तर केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी शेतकऱ्यांच्या विरोधात केलेल्या वक्तव्याबद्दल त्यांच्या विरोधात घोषणा देऊन निषेध व्यक्त केला. प्रसंगी मोदी सरकारच्याही विरोधात घोषणा देत आपला संताप व्यक्त केला. या वेळी शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख सुनील पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष निलेश गंधे, तालुका प्रमुख उमेश पटारे, तालुका समन्वयक प्रकाश केणे, उप तालुका प्रमुख तुषार यादव, तालुका सचिव निलेश पाटील, माजी तालुका प्रमुख प्रकाश पाटील, सदस्य अमोल पाटील, महिला आघाडीच्या विधानसभा संपर्क संघटक मनाली फोडसे, तालुका संघटक रेश्मा पाटील, नगराध्यक्षा गीतांजली कोलेकर, नगरसेवक जागृती कालन, युवती प्रमुख अलकनंदा भानुशाली, अर्चना पाटील, योगेश मलबारी याच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पुणे आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा घेतला आढावा

# विकासप्रकल्प कालबद्ध मर्यादेत पूर्ण करावेत-मुख्यमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी**

पुणे आणि नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या विविध विकासकामांचा आढावा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी येथे घेतला. विकासप्रकल्प पूर्ण करताना कालबद्ध मर्यादेत तो पूर्ण करावा, जेणेकरुन नागरिकांना त्याचा लाभ मिळेल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकांना उपमुख्यमंत्री अजित पवार, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, नागपूरचे पालकमंत्री डॉ. नितीन राऊत, मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह यावेळी उपस्थित होते.

पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणामार्फत ९६० कोटी रुपयांचा शिलकीचा अर्थसंकल्प मांडण्यात आला. एकूण निधीपैकी सुमारे ५३ टक्के निधी मेट्रोसाठी खर्च करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. प्राधिकरणाच्या हद्दीतील प्रकल्पांसाठी लागणाऱ्या जमिनींचे मूल्यांकन करण्यासाठी समिती नेमण्याचा निर्णय यावेळी झाला. त्याचबरोबर सामाजिक उत्तरदायित्व निधीतून प्रकल्प करण्याबाबत नियोजन करण्यासाठी सुकाणू समितीदेखील नेमण्याचा यावेळी निर्णय झाला. यावेळी प्राधिकरणाचे महानगर आयुक्त सुहास दिवसे यांनी सादरीकरण केले. नागपूर महानगर विकास प्राधिकरणाच्या कामांचे सादरीकरण महानगर आयुक्त शितल उगले यांनी केले. आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांसाठी बांधण्यात आलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेतील घरे पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. सध्या प्राधिकरणामार्फत सुमारे १५०० कोटी रुपयांचे विकास प्रकल्प सुरु असून त्यात विकासकामांसोबतच सौंदर्यी करणावरही भर देण्यात येत ...पान ६ वर

# पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या परीसरात वृक्षारोपण



**लातूर/प्रतिनिधी**

येथील ग्रीन लातूर वृक्ष टीम आणी लातूर जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या परीसरात वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे यांच्या हास्ते वृक्षारोपण करून वृक्षरोपण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पोलिस उपाधिक्षक प्रिया पाटील मॅडम, राखीव पोलिस दल निरिक्षक संजय धोंडगे, ग्रीन लातूर वृक्ष टीमचे समन्वयक डॉ. पवन लड्डा, इम्रान सय्यद, गंगाधर पवार, अॅड. वैशाली यादव-लोंढे यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय परीसरातील वृक्ष संपदा वाढावी, परिसर सुशोभीत व्हावा या करीता निखील पिंगळे स्वतः लक्ष देत आहेत. पोलिस अधिक्षक निखील पिंगळे यांनी स्वतः श्रमदान करुन ३० मोठी टर्मिनिलिया प्रजातीची झाडे लावली. तत्पुर्वी ग्रीन लातूर वृक्ष टीममार्फत श्रमदानातून परिसराची स्वच्छता करुन झाडांकरीता खड्डे खोदण्यात आले. लातूर जिल्ह्यात वृक्ष लागवड व वृक्ष संगोपन कार्यात ग्रीन लातूर वृक्ष टीम अग्रेसर असून टीमद्वारे दुष्काळग्रस्त, भुकंपग्रस्त, अवर्षनग्रस्त जिल्हा अशी ओळख पुसण्याचे कौतुकास्पद कार्य केले जात आहे असे गौरवोद्गार निखीलजी पिंगळे यांनी यावेळी व्यक्त केले. हा उपक्रम यशस्वी करण्याकरीता ग्रीन लातूर वृक्ष टीमचे रुषीकेश दरेकर, सुलेखा कारेपुरकर, प्रमोद निपानीकर, अॅड. सर्फराज पठाण, मनमोहन डागा, प्रसाद शिंदे, मोईझ मिर्झा, अॅड. व्यंकटेश बेल्लाळे, महेश गेल्डा, महेश कदम, सिताराम कंजे, सुहास पाटील, शिवशंकर सुफलकर, महेश भोकरे, संकेत कुलकर्णी, सुनिल नावाडे, आनंद सुर्यवंशी, अरविंद फड, मंगेश शिंदे, गोविंद शिंदे, खंडेराव गंगणे, भुषण पाटिल, प्रफुल्ल भोसले, आराधना जोशी, मिनाक्षी बोंडगे, कल्पना कुलकर्णी, दिपक नावाडे, वैशाली वागदरे, ...पान ६ वर

# भाजप पालघर जिल्ह्याच्या महिला आघाडी सरचिटणीसपदी मेघना पाटील



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा पंचायत समितीच्या माजी उपसभापती मेघना मंगेश पाटील यांची पालघर जिल्हाच्या महिला आघाडी सरचिटणीस पदी निवड करण्यात आल्याने भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यामध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. मेघना पाटील यांचे पती यांनीही वाडा पंचायत समितीच्या माजी उपसभापती उल्लेखनीय कार्य केले आहे, ते विद्यमान वाडा तालुका अध्यक्ष पदावर कार्यरत आहेत, तर मेघना पाटील यांनीही उपसभापती पद भूषविले आहे. त्यांना समाजकारण व राजकारणाची मनस्वी आवड असल्याने व ती कामगिरी त्या यशस्वी रित्या पार पाडत असल्याने त्यांची ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे मत मंगेश पाटील यांनी व्यक्त केले आहे. शुक्रवारी (दि.१८) मनोर येथे आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात प्रभारी जिल्हा अध्यक्ष आम्रपाली सावे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील, माजी आमदार पासकल धनारे, संघटन सरचिटणीस संतोष जनाठे, महिला अध्यक्ष जोती भोये, गटनेत्या सुरेखा थेतले व इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थितीत होते. दरम्यान माझ्यावर पालघर ...पान ६ वर

# 'शैक्षणिक बंद'ला उत्स्फुर्त प्रतिसाद




**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाने ११ डिसेंबर रोजी काढलेला अद्यादेश रद्द करावा व अनुदान पात्र शाळांना अनुदानाची तरतूद करावी यासाठी दि. १८ डिसेंबर रोजी पुकारण्यात आलेल्या शैक्षणिक बंद ला जिल्ह्यात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. जवळपास सर्वच संस्थांनी बंद पाळून याला पाठींबा दर्शविला. लातूर विभागातील नांदेड, उस्मानाबा द व लातूर जिल्ह्यातील सर्व संस्थाचालकांनी शिक्षकेतर कर्मचार्यांची पदे रद्द करण्याबाबतचा अद्यादेश मागे घ्यावा व अनुदानाची तरतूद करावी तसेच सर्व शाळांना वेतनेतर अनुदान अदा करावे म्हणून शुक्रवारच्या शैक्षणिक बंदमध्ये सर्व संस्थाचालकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षण संस्था महामंडळाचे विभागीय अध्यक्ष रामदास पवार, सचिव बाबूराव जाधव, कोषाध्यक्ष डी. एन. केंद्रे, पंडीतराव धुमाळ, वसंतराव पाटील, ओमप्रकाश साकोळकर, प्रा. गोविंदराव घार, डी. बी. लोहारे गुरुजी, मधुकर पात्रे, जब्बार सगरे, प्रभाकर बंडगर, भगवानराव पाटील तळेगावकर, बाबूराव जाधव, जळकोट, रामेश्वर कदम, प्रभाकर कापसे, प्रभाकर कुलकर्णी आदींनी केले होते. दरम्यान, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाने ११ डिसेंबर रोजी काढलेला अद्यादेश रद्द करावा व अनुदान पात्र शाळांना अनुदानाची तरतूद करावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण महामंडळाचे अध्यक्ष माजी मंत्री विजय नवल पाटील यांनी पुकारलेल्या या शैक्षणिक बंदला लातूर जिल्ह्यातील जुक्टा, मुख्याध्यापक संघटना, शिक्षकेतर कर्मचारी संघटनांनी पाठींबा देत बंद यशस्वी करण्याचे आवाहन केले होते. शासनाच्या शिक्षण व क्रीडा विभागाने काढलेला शिक्षकेतर कर्मचार्यांची पदे रद्द करण्याबाबतचा अद्यादेश मागे घ्यावा व अनुदानाची तरतूद करावी तसेच सर्व शाळांना वेतनेतर अनुदान अदा करावे यासाठी शुक्रवारी शैक्षणिक बंद पाळण्यात आला. या बंदला 'जुक्टा' संघटनेचे अध्यक्ष प्रा. शिवराम सूर्यवंशी, प्रा. मारुती सूर्यवंशी, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश देशमुख व सचिव बी. जी. चोले, माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष पांडुरंग देडे, जिल्हाध्यक्ष पांडुरंग चिंचोलकर, अमोल चामे, अनिल दरेकर, भागवत पवळे, अजय आरदवाड, सोमनाथ स्वामी, ओंकार पाटील, अमोल घुमाडे, भागवत पवळे, किरण पाटील, राजू लोणकर, सेलुकर, राजेश्र्वर चापुले आदींनी पाठींबा जाहीर केला होता. या बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

# शिवसेनेचे महारक्तदान शिबीर संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलेल्या आवाहनानुसार शिवसेना वाडा तालुकाच्या वतीने आज सोमवारी (दि.१४) प्रकाश केणे यांचे निवास स्थान येथे रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी उपजिल्हाप्रमुख सुनील पाटील ,पालघर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष निलेश गंधे, तालुका अध्यक्ष उमेश पठारे, जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण सभापती अनुष्का ठाकरे ,पंचायत समिती सभापती योगेश गवा, शहर प्रमुख प्रमोद घोलप, विक्रमगड विधानसभा संघटक मनाली फोडसे, नगराध्यक्ष गीतांजली कोलेकर, उप-नगराध्यक्षा वर्षा गोळे, पंचायत समिती सदस्य अमोल पाटील, तालुका समन्वयक प्रकाश केणे, तालुका सचिव निलेश पाटील, उपतालुकाप्रमुख तुषार यादव, युवा सेनेचे रोहित सोनवणे युवा अधिकारी वाडा शहर, आरपीआयचे रामचंद्र जाधव, नगरसेविका जागृती काळण उपस्थित होते. तालुक्यातील सर्व शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व अंगिकृत संघटना पदाधिकारी सहभागी झाले होते.

# लोक अदालतमध्ये तडजोडीत साडेसहा लाख रुपयांची वसुली

**वाडा/प्रतिनिधी**

दिवाणी व फौजदारी न्यायालय वाडा येथे शनिवारी (दि.१२) येथील दिवाणी न्यायाधीश मनोहर सैंदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय लोक अदालत घेण्यात आली. यावेळी विविध प्रकरणांमधील अनेक केसेस समजोत्याने निकाली काढण्यात आल्या. व तडजोडी अंती साडेसहा लाख रुपयांची वसुलीही झाली. बँकांचे थकित कर्जदार, विद्युत वितरण कंपनीचे थकित वीजबील ग्राहक तसेत ग्रामपंचायतीची थकित करवसुली यासाठी वारंवार नोटीसा बजावून सुद्धा त्याची दखल न घेणाऱ्या थकितदारांना न्यायालयाची नोटीस पाठवून आपली बाजू मांडण्याची संधी लोक अदालत मध्ये दिली जाते. या अदालतमध्ये तडजोड होऊन अनेक खटले




निकाली काढले जातात. वाडा येथील दिवाणी न्यायालयात आयोजित करण्यात आलेल्या लोक अदालतमध्ये विविध बँका, ग्रामपंचायती, विद्युत वितरण कंपनीचे एकुण १८०७ खटले ठेवण्यात आले होते. यामधील ७७ खटले कायमचे निकाली काढण्यात आल्याची माहिती येथील दिवाणी न्यायाधीश मनोहर सैंदाणे यांनी दिली. यालोक अदालत मध्ये विविध ग्रामपंचायतीचे करवसुलीचे ३६९ खटल्यांपैकी १८ खटले निकाली निघून तडजोडीत ३, ०५९७४ रुपयांची वसुली झाली. विद्युत वितरण कंपनीचे १०८५ खटल्यांपैकी १६ खटले निकाली निघून १८५९४० रुपयांची वसुली झाली. तर विविध बँकांच्या ७८ खटल्यांमधील १८ खटले निकाली निघून १,५०५३५ रुपयांची वसुली झाली. या लोक अदालत मध्ये २७५ सामान्य व गुन्हे (सिव्हील व क्रिमिनल) खटल्यांतील ५ खटले निकाली काढण्यात आल्याची माहिती येथील दिवाणी न्यायालयातील वरिष्ठ लिपिक सुचिता कथडे यांनी दिली. लोक अदालतमध्ये अशिलाला आपली पुर्ण बाजू मांडण्याची संधी दिली जाते. त्यामुळे लोक अदालत लोकांसाठी वरदान ठरत असल्याचे मत न्यायाधीश मनोहर सैंदाणे दिवाणी व फौजदारी न्यायालय वाडा यांनी व्यक्त केले.

# कर्जत-जामखेड पोलिसांना मिळालेली नवी वाहने गुन्हेगारी रोखण्यास उपयुक्त ठरतील -अनिल देशमुख

**मुंबई/प्रतिनिधी**

कर्जत-जामखेड पोलीस दलासाठी एकात्मिक विकास संस्थेमार्फत सामाजिक उत्तरदायित्व निधीतून मिळाली आहेत. ही वाहने या दोन्ही तालुक्यातील पोलीस यंत्रणा अधिक सक्षम होऊन गुन्हेगारी रोखण्यास तसेच सर्वसामान्यांना, माता भगिनींना दिलासा देण्यासाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वास गृहमंत्री अनिल देशमुख यांनी व्यक्त केला. कर्जत -जामखेड एकात्मिक विकास संस्थेमार्फत कर्जत-जामखेड येथील पोलीस बांधवांना देण्यात येणाऱ्या वाहनांचा लोकार्पण सोहळा मंत्रालय येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार रोहित




पवार, एडीजी जगन्नाथन, अहमदनगरचे पोलीस अधीक्षक मनोज पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. देशमुख म्हणाले, हा अत्यंत नाविण्यपूर्वक उपक्रम असून कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांच्या संकल्पनेने साकार होत आहे. या वाहनांमुळे पोलीस दलास अधिक बळ प्राप्त होऊन गस्तीसाठी ही वाहने उपयोगी पडतील. राज्यातील इतर आमदारांनी देखील अशाप्रकारचे उपक्रम ...पान ६ वर